PREMIUM QUALITY FOOD IN DHULE
• Dosas • Sandwiches • Pav Bhaji • Pulao • Frankie
• Pizza • Fries • Chopsuey / Noodles / Fried Rice
• Momos • Soup • Punjabi / Chinese / Continental
• Starters • Sizzler • Tandoor Starters • Chaap
• Main Course • Thali • Fresh Juices • Falooda
Milkshakes / Dessert JAIN FOOD AVAILABLE
FREE HOME DELIVERY
B'Live Restaurant — Also available on zomato SWIGGY
Below Card House, Lane No.5, Near Sonya Maruti, Dhule
93078 68768, 02562 236040


# आपला महाराष्ट्र

मूल्य २.००

संस्थापक - लोकमित्र भाई मदाने

WWW.APLAMAHARASHTRA.IN

POST REGD.No./DHL/53/24-26

संयुक्त वर्ष ६७ ■ अंक क्र.१८९ ■ रविवार १४ एप्रिल २०२४ ■ धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक आवृत्ती ■ पाने ८


मुंबई चष्माघर
आग्रारोड, धुळे.
☎-235222,मो.9021853108

## काँग्रेस पक्ष सत्तेत आल्यास जीएसटी मुक्त शेती! भंडाऱ्यातील सभेत खा.राहुल गांधींचे आश्वासन

**भंडारा, दि.१३- काँग्रेस पक्षाने जाहिरनाम्यात सर्वात महत्वाचे पाच मुद्दे दिले आहेत. हा जाहीरनामा खूप विचार करुन बनवला असून बंद खोलीत नाही तर देशभरातील लाखो लोकांना भेटून तो बनवला आहे. काँग्रेसचा जाहिरनामा खऱ्या अर्थाने जन की बात आहे. काँग्रेस सत्तेत आल्यास शेतकऱ्यांची कर्जमाफी केली जाईल, जीएसटीमुक्त शेती, स्वामिनाथन समितीच्या अहवालानुसार एमएसपीचा कायदा, अग्निवीर योजना बंद करणार असल्याचे आश्वासन काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी दिले आहे.**



पहिल्या टप्प्यातील महाराष्ट्रातील पाच मतदारसंघाच्या मतदानासाठी अवघे पाच दिवस शिल्लक राहिले आहेत. चंद्रपूर आणि नागपूरच्या कन्हान येथे पंतप्रधानांच्या दोन भव्य सभा नुकत्याच पार पडल्यानंतर आता काँग्रेस नेते आणि खासदार राहुल गांधी हे देखील मैदानात उतरले आहेत. भंडारा जिल्ह्यातील साकोली येथे राहुल गांधी यांची आज सभा पार पडली. यावेळी त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींसह भाजप सरकारच्या नीतींवर जोरदार हल्लाबोल केला.

**थाळ्या अन् टाळ्या**

राहुल यांनी पीएम मोदी यांनी देशामध्ये चेष्ठा लावल्याची टीका केली. कोरोनामध्ये हजारो माणसे मरत असताना थाळ्या, टाळ्या वाजवायला सांगितल्याची टीका त्यांनी केली. राहुल यांनी सत्तेत येताच अग्नीवीर योजना घोषणा रद्द करणार असल्याचेही सांगितले. देशातील उद्योगपतींचे कर्ज माफ होत असतानाच शेतकऱ्यांचे का होत नाही? अशी विचारणा करताना त्यांनी ज्या पद्धतीने आम्ही पहिली कर्जमाफी दिली त्या पद्धतीने कर्जमाफी देऊ, असेही सांगितले.

**२२ लोकांकडे सर्व संपत्ती**

राहुल म्हणाले की, गेल्या १० वर्षांत मोदीजी (पान ८ वर)

### विनम्र अभिवादन



भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन!
– संपादक, दै.आपला महाराष्ट्र

## ढगाळ हवामान

धुळे, दि.१३- शहरासह जिल्ह्यात कुठे कडक ऊन तर कुठे ढगाळ हवामान असे वातावरण अनुभवास येत आहे. शिरपूर, शिंदखेडा भागात अवकाळी पावसानेही हजेरी लावली आहे. यामुळे उकाड्यात वाढ झाली आहे.

## काँग्रेस जिल्हाध्यक्ष डॉ.शेवाळेंचा राजीनामा मंजूर श्रेष्ठींकडून सबुरीचा सल्ला; पण शामकांत सनेर ठाम

**धुळे, दि.१३- नाशिक जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष डॉ.तुषार शेवाळे यांचा पक्ष अध्यक्षपदाचा राजीनामा मंजूर करण्यात आला आहे. त्यांचे जागी प्रभारी जिल्हाध्यक्ष म्हणून शिरीष कोतवाल यांची निविड करण्यात आली आहे. आपण अद्यापही पक्षाचे कार्यकर्ते असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. धुळे जिल्हा अध्यक्ष शामकांत सनेर यांचा राजीनामा अद्याप मंजूर झालेला नसल्याचे काँग्रेसच्या राजकीय गोटातून समजते. नाशिक येथे शुक्रवारी एका इंजिनिअरींग कॉलेजमध्ये समझोता बैठक संपन्न झाल्याचे वृत्त असून धुळे तालुक्याचे आमदार देखील बैठकीस उपस्थित असल्याचे खात्रीलायक वृत्त आहे. काँग्रेसचा उमेदवार बदला या भूमिकेवर अद्याप आपण ठाम असल्याचे शाम सनेर यांनी सांगितले.**

धुळे लोकसभा (पान ८वर)

### खा.डॉ.भामरे विरोधकांची मंगळवारी दाभाडीला बैठक?

धुळे लोकसभा मतदार संघात खा.सुभाष भामरे यांना विरोध करणाऱ्यांची मंगळवारी दाभाडी येथे बैठक ठेवण्यात आली असल्याचे वृत्त आहे. या बैठकीचे आयोजन विलास बच्छाव, माजी आमदार तसेच काही लोकप्रतिनिधींनी केले असल्याचे समजते. या बैठकीस परिसरातील कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थिती लावणार असून काँग्रेसचे नाराज जिल्हा अध्यक्षांना खास आमंत्रित करण्यात आले आहे. आपण सदर बैठकीला जाणार का? असे विचारले असता शाम सनेर यांनी दुजोरा दिला. मात्र या बैठकीला जाणाऱ्या एका प्रमुख कार्यकर्त्याने मतांचे विभाजन झाल्यास डॉ.भामरे यांच्या निवडीस मदत होईल, असेही मत आमच्या प्रतिनिधीकडे व्यक्त केले आहे.



## टायर फुटल्याने पिकअप उलटून युवती ठार, एकोणाविस जखमी

**शिरपूर दि.१३ (का.प्र.)- भरधाव वेगातील पिकअपचा टायर फुटल्यामुळे झालेल्या अपघातात १५ वर्षीय युवती ठार झाली. हा अपघात १३ एप्रिलला दुपारी महामार्गावर दभाशी फाट्यावर घडला. मृत आणि जखमी मध्यप्रदेशातील बडवानी जिल्ह्यातील मजूर आहेत. १९ जण जपघातात जखमी असून त्यापैकी नऊ जणांना धुळे येथे उपचारासाठी रवाना करण्यात आले.**

कोलकी (जि.बडवानी) येथील मजूर मजुरीसाठी पुणे जिल्ह्यातील जुन्नर तालुक्यात दीड महिन्यापासून शेतात काम करीत होते. हंगाम आटोपून सर्वजण घरी जाण्यासाठी निघाले होते. पिकअप (एमपी ११, जी ४६३६) दुपारी दभाशी फाट्याजवळ आल्यानंतर तिचा टायर फुटला. चालकाचे नियंत्रण सुटून वाहन उलटले. जखमींना हायवे पोलिस व हायवे रुग्णसेवेच्या वाहनान उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले.

वैद्यकीय तपासणीत बानाबाई रामदास पावरा (वय १५) हिचा मृत्यू झाल्याचे (पान ८ वर)

### मुख्यमंत्र्यांचा आरोप
## कर्नाटकात पन्नास खोके प्रयोग?

बेंगलुरु, दि.१३- कर्नाटकमध्ये ऑपरेशन लोटस राबविण्याचा प्रयत्न केला जात आहे, असा आरोप कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी केला आहे. इंडिया टुडे टीव्हीला दिलेल्या मुलाखतीमध्ये काँग्रेस नेते सिद्धरामय्या यांनी हा खळबळजनक दावा केला आहे. काँग्रेसमधून बाहेर पडण्यासाठी आमदारांना पन्नास कोटींचे आमिष दाखविले जात असल्याचे सिद्धरामय्या यांनी सांगितले. लोकसभा निवडणुकीत काँग्रेसचा पराभव झाला तर त्यांच्या नेतृत्वाखालील काँग्रेस सरकार पाडण्याचा प्रयत्न केला जाऊ शकतो, (पान ८ वर)

## असलोद गावाजवळ कारचा अपघात नायब तहसिलदार ठार; दोघे जखमी

**शहादा, दि.१३ (प्रतिनिधी) - तालुक्यातील असलोद पोलीस दूरक्षेत्रा जवळ काल रात्री १० वाजेच्या सुमारास गाडी क्रमांक एमएच ०२ / डीझेड - ३७०८ हुंडाई क्रीयेटा गाडीला भीषण अपघात झाला. त्यात नायब तहसीलदार प्रदीप पाटील जागीच ठार झाले. तर दुसरे नायब तहसीलदार विजय साळवे व तळोदा येथील मंडळ अधिकारी शिरीष परदेशी गंभीर जखमी झाले आहेत. विशेष म्हणजे तिघे जण धुळे येथील विद्यावर्धिनी महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी आहेत.**



महसूल विभागातील कर्मचारीच्या मुलाच्या हळदी कार्यक्रमाला हजेरी लाऊन परत येत असताना असलोद पोलिस चौकी जवळील तीव्र वळणावर गाडी कठडे तोडून जम्प घेत झाडाला ठोस देत पलटी झाली. तिघे जण गाडीखाली दाबले (पान ८ वर)

## महिलेची फसवणूक दोघांवर गुन्हा

नंदुरबार, दि.१३ (प्रतिनिधी) - शहरातील दादा गणपती मंदिराजवळ राहणाऱ्या निवृत्त सरकारी महिलेच्या बँक खात्यातून १ लाख ७१ हजाराची रक्कम परस्पर बँकेतून काढल्याने मुंबईस्थित दोघांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. संध्या वामनराव यार्दी यांनी शहर पोलिसात फिर्याद दिली असून अंकिता आनंद पालव व केशन मंगेश पालव या दोघांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यार्दी यांच्या मोबाईल व एटीएमचा वापर करून कोटक महेंद्र बँकेच्या खात्यात वर्ग करण्यात आले. या संदर्भात पोलीस निरीक्षक वासुदेव देसले व पोलीस उपनिरीक्षक सागर आहेर यांच्याकडे तपास देण्यात आला आहे.



## पत्नीचा गळा चिरुन निर्घृण खून करणाऱ्या पतीला तात्काळ अटक

**धुळे, दि.१३- घरगुती भांडणातून पत्नीचा धारदार चाकूने गळा चिरुन खून करणाऱ्या पतीला प.देवपूर पोलिसांनी अटक केली. ही घटना शनिवारी भर दुपारी पांझरा नदी पात्रालगत असलेल्या समांतर रस्त्यावर छत्रपती हॉस्पीटलच्या पाठीमागे घडली.**

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार शहरातील फुले कॉलनीत राहणाऱ्या अनिता हिरा बैसाणे (वय ४०) या धुणी-भांडी करणाऱ्या महिलेचे पती हिरा वाल्मिक बैसाणे (वय ४९) यांच्याशी नेहमी कौटुंबिक वाद होत असत. शनिवारी दुपारी अनिता बैसाणे ह्या काम आटोपून दुपारच्या सुमारास घरी जात असताना पती हिरा बैसाणे याने त्यांना पांझरा नदीकिनारच्या समांतर रस्त्यावर असलेल्या छत्रपती हॉस्पिटलच्या पाठीमागे अडविले. यावेळी त्याने तिला मारहाण करुन चाकूने तिचा गळा चिरला. यात अनिता बैसाणे यांचा जागीच मृत्यू झाला. घटनेनंतर हिरा बैसाणे याने घटनास्थळावरुन पळ काढला. (पान ८ वर)

## अवकाळीने झालेल्या नुकसानीची खा.गावितांकडून पाहणी संकटग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा; अधिकाऱ्यांना सूचना

**नंदुरबार, दि.१३ (प्रतिनिधी) - अवकाळी पावसामुळे संकटात आलेल्या शेतकऱ्यांच्या भेटी घेऊन सांत्वन करण्यासाठी खासदार डॉ.हिना गावित यांनी आज सकाळी तातडीने शहादा तालुक्यातील हिंगणी, सारंगखेडा, वडाळी, बामखेडा, तोरखेडा, जयनगर व प्रकाशा परिसरात तातडीचा पाहणी दौरा केला. नुकसानग्रस्तांची भेट घेत व अधिकाऱ्यांना सूचना करीत दिलासा दिला.**



शहादा तालुक्यातील हिंगणी, सारंगखेडा, वडाळी, बामखेडा, तोरखेडा, जयनगर व प्रकाशा यांसह काही गावांना दि.१२ रोजी सायंकाळी अचानक आलेल्या अवकाळी पावसामुळे शेतीचे मोठे नुकसान झाले. सारंगखेडा व परिसरात कलिंगड, खरबूज, डांगरमळे उध्वस्त झाले. केळी, पपई, हरभरा, केळी पिकांचे अतोनात नुकसान झाले. ज्वारी काढण्यावर आली असताना, हे घडले. त्यामुळे शैतकरी चांगलाच हादरला आहे. निसर्गाच्या लहरीपणामुळे मागील तीन महिन्यात दुसऱ्यांदा शेतकऱ्याच्या अगदी हाता तोंडाशी आलेला घास जाण्याचा प्रसंग घडल्यामुळे शेतकरी कोलमडलेल्या अवस्थेत आले आहेत. दरम्यान शेतकऱ्यांवर आलेल्या या संकटाची दखल दखल घेत महायुतीच्या उमेदवार तथा भारतीय जनता पार्टीच्या खासदार डॉ हिना गावित यांनी तातडीने अवकाळी पावसाचा तडाखा बसलेल्या गावांना भेट दिली आणि शेतकऱ्यांच्या नुकसानीची पाहणी केली. उध्वस्त झालेल्या केळी बागा पपईची झालेली नासधूस आणि इतर (पान ८ वर)

## नंदुरबार जिल्ह्यात दोन अपघात दोन ठार

**नंदुरबार, दि.१३ (प्रतिनिधी) - जिल्ह्यात दोन आघाताच्या घटना घडल्या असून दोघांचा मृत्यू तर तिघे जखमी झाले आहेत.**

म्हसावद सुलवाडे मार्गावर ११ एप्रिल रोजी रात्री१ वाजेला म्हसावदकडून सुलवाडे गावाकडे जात असताना हिमांशु काशिनाथ पाटील याने मोटार सायकल क्रजी जे पाक एल एन १५४६ ने समोरून येणाऱ्या मोटारसायकलला धडक दिली. यात सागर मंगल नवरत रा.कलमाडी ता. शहादा हा ठार झाला. यात हिमांशु काशिनाथ पाटील ३५ व हर्शल कैलास पाटील हे जखमी झालेत. जखमींवर उपचार सुरु आहेत. याप्रकरणी हिमांशु काशिनाथ पाटील याच्या विरोधात म्हसावद पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोहेकॉ जितेंद्र पाडवी यांच्याकडे तपास देण्यात आला आहे. तर दुसरा अपघात वेडापावला गावाजवळ १२ रोजी दुपारी घडला. दुचाकी क्र.जीजे ०५ डब्लू १७५० हिचेवर शेख मकबुल शेख अब्दुल व शेख समद शेख अब्दुल हे डबल सीटजात असताना दुचाकी घसरली. यात शेख समद रा.लीम्बायात सुरात हा ठार झाला.

## धुळे बार असो.ची निवडणूक सव्वीस एप्रिलला मतदान

**धुळे, दि.१३- धुळे जिल्हा बार असोसिएशचे अध्यक्ष, दोन उपाध्यक्ष (पुरुष/महिला), तीन सचिव (दोन पुरुष/एक महिला) व अकरा कार्यकारिणी सदस्य (नऊ पुरुष/दोन महिला) यांच्या निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाला आहे.**

सन २०२४ ते २०२६ या कालावधीकरिता ही निवडणूक होत आहे. यानुसार मतदार यादी प्रसिद्धी १६ एप्रिल, मतदार यादी संदर्भात हरकती दि.१६ रोजी सायंकाळी पाच वाजेपर्यंत, मतदार यादी प्रसिद्धी दि.१७, उमेदवारी अर्ज विक्री दि.१७ ते १८ एप्रिल दुपारी तीन पर्यंत, उमेदवारी अर्ज स्विकारणे दि.१८ ते २० एप्रिल सायंकाळी पाच वाजेपर्यंत, अर्जांची छाननी दि.२२ रोजी सकाळी ११ वा., उमेदवारी यादी प्रसिद्ध दि.२२ रोजी दुपारी दोन वाजता, माघारीची मुदत दि.२३ रोजी दुपारी ३.३० पर्यंत, मतदान (पान ८ वर)

दिपक ज्वेलर्स
सोने- 22 K -66,700 रु.+3% GST
सोने- 24 K -72,700 रु.+3% GST
चांदी- 85,000 रु.+3% GST
तारगल्ली, सराफ बाजार, धुळे
फोन नं.२३३१०३/२३४१०३

भावपूर्ण
श्रद्धांजली



स्व. रंजना दाणे
मृत्यू दि.१४ एप्रिल २०२१
(तृतीय पुण्यस्मरण)

तु असतीस तर झाले असते
आहे त्याहुन हे जग सुंदर
चांदण्यात विरघळले असते
गगन धरेतील धुसर अंतर
- मंगेश पाडगावकर

श्रध्दावनत

सरस्वती दाणे — रमेश दाणे — प्रशांत दाणे (हैद्राबाद)
स्वाती भाटिया — अमरिश भाटिया (पुणे)
सीमाताई भदाणे — प्रदीप भदाणे (धुळे)
विजया पाटील — चंद्रशेखर पाटील (नोएडा)
सीमाताई पाटील — श्रीकांत पाटील (नोएडा)
पुष्पाताई अजबे — सुधाकर अजबे (खामगांव)
मालतीताई शिरसाठ — मधुकर शिरासाठ (धुळे)
नीताताई जसपालसिंह सिसोदिया — प्रा.जसपालसिंह सिसोदिया (धुळे)

राष्ट्र सेवा दल, सर्वोदय मंडळ, हरिजन सेवक संघ, धुळे
टिळक राष्ट्रीय विद्यालय परिवार, खामगांव
कॉलनी कट्टा, प्रमोद नगर सेक्टर-३, पू.साने गुरूजी मार्ग,देवपूर,धुळे

अनंत आठवणीचे २२ वर्षे



स्व. गणपतराव भिकाजी येलमामे
(स्वर्गवास- १४/४/२००२)

आपल्या आदर्शावरच आम्ही चालत आहोत,
आपल्या आत्म्यास चिरशांती लाभो हिच
ईश्वर चरणी प्रार्थना.

* शोकाकुल *
कमलाकर गणपतराव येलमामे — लक्ष्मीकांत गणपतराव येलमामे
रमेश गणपतराव येलमामे
जालंदर रामचंद्र भडागे — सौ. अल्का जालंदर भडागे
दिपकराव शंकरलालजी वराडे — सौ.मंदाकिनी दिपकराव वराडे
वसंतराव बाबुराव वराडे — सौ. संध्या वसंतराव वराडे
चि.पंकज, अमोल, प्रशांत, चेतन, राहुल, राजेश, तेजस,
समीर, आशिष, भुषण, पराग, केतन, मिताली, अबोली,
सोहमदादा, वरदभैय्या, श्लोक, स्वामी, उन्नती, श्री, रिशू

५ वा स्मृतिदिन



स्व.अमरचंदजी रामकरणजी वर्मा (बाबूशेठ)
(स्वर्गवास दि.१४/४/२०१९)

सुहास वदनी तुमची ही मुर्ती सदैव डोळ्यासमोर तरळते
आयुष्याशी लढता लढता तुमची आठवण सदैव येते
तुमच्या पावन स्मृतीस भावपूर्ण श्रध्दांजली व सुमनांजली.

* शोकाकुल *
समस्त वर्मा परिवार, धुलिया
-: फर्म :-
Sitara — धनराज अमरचंद वर्मा (टिनू वर्मा)
कृष्णा प्रॉपर्टी लॅण्ड डेव्हलपर्स

# भारत जोडो अभियानाची बैठक; मोदी सरकारविरोधात मोहीम

**शहादा, दि.१३ (का.प्र.)– येथे भारत जोडो अभियान कार्यकर्त्यांची नुकतीच बैठक संपन्न झाली. यात लोकसभा निवडणुक २०२४ संदर्भात नियोजन करण्यात आले. विविध जनसंघटनांचे कार्यकर्ते एकत्रितरित्या केंद्रातील मोदी सरकारच्या विरोधात निवडणूक रिंगणात उतरल्याने दहा वर्षांची सत्ता बदल होणार असल्याची प्रतिक्रिया बैठकीत उपस्थित भारत जोडो अभियानाच्या समन्वयक व कार्यकर्ते यांच्याकडून व्यक्त करण्यात आली आहे.**

काँग्रेसच्या कथीत भ्रष्टाचाराला कंटाळून २०१४ साली भाजपाच्या हातात देशाची सुत्रे दिली. मात्र दहा वर्षातच जनतेची घोर निराशा झाल्याने २०२४ च्या निवडणुकीत भाजपला धडा शिकवावा ह्या हेतूने राष्ट्रीय स्तरावरील विविध जन संघटना तसेच जन आंदोलनांनी एकत्र येऊन भारत जोडो अभियानाची निर्मिती केली. मोदी काळात झालेल्या संविधान विरोधी, शेतकरी विरोधी, महिला विरोधी, कामगार विरोधी, सरकारी कर्मचारी विरोधी निर्णयाचा लेखा जोखा जनतेसमोर मांडण्याचा निर्धार गेल्या एक वर्षापासून भारत जोडो अभियानाचे कार्यकर्ते रात्रंदिवस मेहनत करीत आहेत. जनतेने जनतेच्या हितासाठी जगले पाहिजे अशी भूमिका जनमानसात रुजवून आपला देश विकासात अग्रेसर व्हावा व देशांतर्गत कोणतीही धार्मिक दंगल घडू नये यासाठी भारत जोडो अभियानाचे कार्यकर्ते विविध प्रकारच्या सभा संमेलनांमधून जनतेला संबोधित करीत आहेत. धर्मनिरपेक्ष देशात हिंदूराष्ट्र निर्माण करण्याची भाषा ही केवळ द्वेषमूलक असून यातून केवळ सामाजिक ध्रुवीकरण होऊन देशात अस्थिरता निर्माण करण्याचे षडयंत्र मोदी सरकारद्वारे रचले जात आहे. याची जाणीव सुज्ञ लोकांना झाली आहे म्हणून २०२४ च्या निवडणूकीत समानता मानणारा सहिष्णू हिंदू माणूसच भाजपाच्या पराभवात अग्रेसर असेल असा ठाम विश्वास जनतेमध्ये निर्माण झाला आहे. देशातील संविधान मानणाऱ्या व लोकशाहीची कास धरणाऱ्या विविध पक्षांनी एकत्र यावे व लोकशाही नष्ट करु पाहणाऱ्या शक्तींना भारतातून हद्दपार केले पाहिजे. या उदात्त हेतूने भारत जोडो अभियानाचे कार्य संपूर्ण देश पातळीवर भारत जोडो अभियानाच्या माध्यमातून सुरू आहे. नंदुरबार जिल्ह्यात प्रत्येक तालुकावार कोऑर्डिनेटर नेमून जनतेच्या नेमक्या कोणत्या समस्या आहेत हे भारत जोडो अभियानाने जाणून घेतल्या आहेत. त्या समस्यांवर प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी हजारो कार्यकर्ते गावोगावी तयार केले आहेत. या समस्यांबाबत एक स्वतंत्र जाहीरनामा सुद्धा भारत जोडो अभियानाने तयार केलेला आहे. भारत जोडो अभियान म्हणजे चांगल्या भारतीयांचा नैतिक दबावगट आहे असे सर्वसामान्य माणसाला वाटले पाहिजे ही मूळ भूमिका या अभियानाची आहे.भविष्यात निवडणुकी पुरते भारत जोडो अभियान काम करणार नसून निवडून आलेल्या उमेदवारावर जनतेच्या प्रश्नांना सोडविण्यासाठी पुढाकार घेणार असल्याचे मत भारत जोडो अभियानाच्या महाराष्ट्र कमेटी सदस्य रंजना कान्हेरे, नंदुरबार जिल्हा समन्वयक डॉ.किशोर सामुद्रे, शहादा तालुका समन्वयक चुनिलाल ब्राम्हणे, गणेश वळवी, नंदुरबार तालुका समन्वयक निशा तांबे, वंदना सामुद्रे, पितांबर बि–हाडे, अरुण जगदेव, नवापूर तालुका समन्वयक शिरीष गावित, साक्री तालुका समन्वयक वासुदेव गांगुर्डे, अशोक सोनवणे, तळोदा समन्वयक तारा मराठे, संजय महाजन, अक्कलकुवा समन्वयक भारती वळवी,लक्ष्मी वळवी, धडगाव समन्वयक शिवाजी घोडराज, शिवाजी पावरा यांनी प्रतिक्रिया व्यक्त केली आहे.

# माहितीच्या प्रस्फोटामुळे विद्यार्थी सम्यक ज्ञानापासून वंचित
## डॉ.आंबेडकर व्याख्यानमालेत प्रा.डोंगरे यांचे प्रतिपादन

**धुळे, दि.१३– पूर्वी येथील व्यवस्थेने बहुजनांसाठी शिक्षणाची दारे बंद ठेवली होती. ब्रिटिशांच्या शिक्षण धोरणामुळे शिक्षणाची दारे खुली झाली. परंतु माहितीच्या प्रस्फोटामुळे अशी अवस्था झाली आहे की, तरुण पिढीला योग्य माहिती, संम्यक ज्ञान कसे मिळवावे याची दिशा मिळत नाही. त्यामुळे सध्याचा तरुण गोंधळावस्थेत आहे, असे प्रतिपादन कबचौउम विद्यापीठ जळगावच्या वाणिज्य व व्यवस्थापन शाखेचे अधिष्ठाताप्रा प्रा.डॉ.अनिल डोंगरे यांनी केले.**




डॉ.बाबासाहेब आंबेडकर व्याख्यानमालेत सामाजिक क्रांती व डॉ.आंबेडकरांच्या विचारांची प्रसंगीकता या विषयावर फुले, शाहू, आंबेडकर संबोधी प्रतिष्ठान व डॉ.आंबेडकर अकॅडमी यांनी आयोजित केलेल्या व्याख्यानमालेत डॉ.अनिल डोंगरे बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य बाबा हातेकर होते. डॉ.आंबेडकरांनी बुद्ध, कबीर, फुले यांना आपले गुरु मानले. तरीही त्यांच्यावर त्यांचे शिक्षक आणि विचारवंत असलेल्या जॉन ड्युई यांचा खूप मोठा प्रभाव होता, असेही डॉ.डोंगरे पुढे म्हणाले. मानवाने लावलेल्या भौतिक शोधांच्या सामाजिक परिणामांचा विचार करता त्यातील महत्त्वपूर्ण शोध हे सामाजिक क्रांतीचे टप्पे आहेत, असेही त्यांनी नमूद केले. आज जगात बोटावर मोजण्याइतके लोक सर्व लोकांना नियंत्रित करत आहेत. त्यासाठी ते आता ज्ञान आणि माहितीचा भडीमार करून लोकांना गोंधळात टाकून आजच्या पिढ्या पंगु बनवित आहेत असेही त्यांनी सांगितले. कार्यक्रमात परिचय संस्थेचे सचिव डॉ.संजय धोडरे व सूत्रसंचालन डॉ.बी.बी. गायकवाड आणि आभारप्रदर्शन डॉ.दीपक शेजवळ यांनी केले. याप्रसंगी अ‍ॅड.आनंद जगदेव, प्रा.विलास चव्हाण, राजेंद्र मोराणकर, गो.पी. लांडगे, प्राचार्य संजीव गिरासे, नितीन ठाकूर, डॉ. राजेश रामटेके, डॉ.ज्ञानेश्वर कांबळे, प्रा.विजय घोरपडे व सुरेखा नांद्रे आदी उपस्थित होते.



# वरवाडे येथे महात्मा फुलेंना अखिल भारतीय माळी महासंघातर्फे अभिवादन; मान्यवरांचे मार्गदर्शन

**शिरपूर, दि.१३– क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंती निमित्त वरवाडे येथे ११ एप्रिल रोजी अखिल भारतीय माळी महासंघ शिरपूर तालुका तर्फे महात्मा फुले पुतळ्यास मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.**

आमदार काशिराम पावरा, माजी नगराध्यक्ष भूपेशभाई पटेल, प्रांताधिकारी शरद मंडलिक, तहसिलदार महेंद्र माळी, भाजपा जिल्हा अध्यक्ष बबनराव चौधरी, उद्योगपती चिंतनभाई पटेल, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष तुषार रंधे, शि.व.न.पा. मुख्याधिकारी मा.प्रशांत सरोदे, शि.व.न.पा. प्रशासकीय अधिकारी संजय हासवाणी, अरुण धोबी, किशोर माळी, के.डी.पाटील, श्यामकांत ईशी, काशिनाथ माळी, मोतीलाल माळी, अ.भा.माळी महासंघ नाशिक विभागीय अध्यक्ष वासुदेव देवरे, प्रमुख अतिथी यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. जय ज्योती जय क्रांती..... नारा देण्यात आला.

याप्रसंगी दिपक माळी, संजय सोनवणे, दिलीप बोरसे, देविदास माळी, हिंगोणी मिलींद पाटील, भालेराव माळी, समता परिषद युवा अध्यक्ष जय माळी, उत्तमराव माळी, बाबुलाल माळी, समता परिषद तालुकाध्यक्ष पिंटु माळी, भटु माळी, श्रीराम माळी, उपाध्यक्ष संतोष माळी, गोकुळसिंग राजपूत, नितीन माळी, बिपीन तेले, वसंत माळी, सुनिल माळी, सुधाकर माळी, जी.व्ही. पाटील, आर.जे.सोनवणे, अधिकार माळी, किशोर माळी, भैय्या माळी, संदिप माळी, राहुल माळी, युवराज माळी, सतिष पाटील, विनायक कोळी, प्यारे मोहन, विनय माळी, जयवंत माळी, नारायण माळी, साहेबराव माळी, विजय बागुल, चंदु चौधरी, नाना माळी, किशोर ठाकरे, मोहन माळी, दत्तु माळी, कैलास माळी, गोपाल ठाकरे, कंचन माळी, धनराज माळी, दौलत कोळी, पप्पु बारी, शिवाजी माळी, प्रकाश देवरे, प्रभु माळी, डी.जे.पाटील, भटु जैन, भैय्या माळी, योगेश माळी, दाजभो माळी, जितेंद्र माळी, सर्व समाज बांधव उपस्थित होते. कार्यक्रमास अखिल भारतीय माळी महासंघ शिरपूर तालुका सर्व पदाधिकारींचे सहकार्य लाभले.

# धुळे महानगर व ग्रामीण टिडीएफची सभा उत्साहात संपन्न

**धुळे, दि.१३– कै. आप्पासाहेब भाल्डे शिक्षक भवन येथे धुळे महानगर व ग्रामीण शिक्षक लोकशाही आघाडीची (टिडीएफ) सभा जिल्हाध्यक्ष डि.जे.मराठे यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहात संपन्न झाली.**



सभेत मार्गदर्शक एस.के. चौधरी, नाशिक विभाग टिडीएफचे अध्यक्ष संजय पवार यांनी टिडीएफची पंचसूत्री, कार्य, महत्त्व व टिडीएफ कायम शिक्षकांसोबत असेल असे मत व्यक्त केले. सदर सभेस जिल्ह्यातील संजय पवार, निशांत रंधे, विजय दहिते, शुभांगी पाटील या इच्छुक उमेदवारांनी टिडीएफतर्फे उमेदवारी मिळावी म्हणून अर्ज सादर केले आहेत. टिडीएफ ही शिक्षकांसाठी लढणारी संघटना आहे. नाशिक विभाग शिक्षक मतदार संघात शिक्षकच आमदार असावा कारण शिक्षकांच्या समस्या फक्त शिक्षकच समजू शकतात.असे मत इच्छुक अर्जदार उमेदवारांनी व्यक्त केले. तसेच महाराष्ट्र शिक्षक लोकशाही आघाडीने नाशिक विभाग शिक्षक मतदार संघात जो उमेदवार जाहीर करणार त्या उमेदवाराच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणार असा ठराव सदर बैठकीत सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

सुत्रसंचालन आर.आर. साळुंके, व्हि.टी.गवळे यांनी केले तर दिलीप पाटील यांनी आभार व्यक्त केले. यावेळी व्ही.यु.कुंवर, एम.बी. मोरे, के. डी. बच्छाव, सतिष देसले, के. एस. पाटील, जे.बी.सोनवणे, मनोज एस.पाटील, ए.के. अन्सारी, कानिफनाथ सुर्यवंशी, संजय पाटील, डी.जी. पाटील, पी.टी.पाटील, एस.एन.पाटील, बी.जी.देसले, के.के. नांद्रे, एच.व्हि.नांद्रे, आर.डी.वेंदे, एस.एस.बाविस्कर, अविनाश भदाणे, एल.वाय.पाटील, रणजित शिंदे, चेतन पाटील, विकास सोनवणे, महेश पाटील, भरत सैंदाणे, मिलिंद पाटील, मनोज सी.पाटील, सचिन मोरे व पदाधिकारी, सदस्य व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मांगीरबाबांच्या मूर्तीची तरुणाकडून विटंबना

धुळे, दि.१३– साक्री तालुक्यातील गडी भिलाटी जवळील मराठी शाळेच्या मागे असलेल्या मांगीरबाबा देवाची दगडाची मूर्ती राजवीर रघुवीर परदेशी (२०) रा.रामजी नगर गडी भिलाटी या तरुणाने दगडाने फोडल्याने त्याच्या विरोधात दीपक अशोक खरात रा.साक्री यांनी पोलिसात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी घटनेचे गांभीर्य ओळखून आरोपीला ताब्यात घेतले आहे. पुढील तपास हेकॉ शिंदे करीत आहेत.

# शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी आश्वासित योजना आरंभ; संघटनेचे आवाहन

**धुळे, दि.१३– दिनांक चौदा मार्च २०२४ च्या शासन निर्णयानुसार महाराष्ट्रातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना दुसऱ्या लाभाची सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना लागू करण्यात आली आहे. सदर योजनेचा लाभ शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी घ्यावा असे आवाहन धुळे जिल्हा शिक्षकेतर कर्मचारी संघटनेने केले आहे.**

धुळे जिल्ह्यातील शिक्षकेतर कर्मचारी यांना दुसऱ्या लाभाची सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना लागू करून वेतन पडताळणी करून वेतन निश्चिती होण्यासाठी शिबिर आयोजित करणे बाबत निवेदन श्री.जोशी, लेखाधिकारी (माध्यमिक) लेखाधिकारी कार्यालय, धुळे यांना देण्यात आले.

यावेळी संघटना पदाधिकाऱ्यांशी या विषयावर सकारात्मक चर्चा होऊन लेखाधिकारी कार्यालयात जमा होणाऱ्या प्रस्तावांवर तात्काळ वेतन पडताळणी होऊन वेतन निश्चित करण्यात येईल. तसेच संबंधित कार्यालयात काही महत्त्वाचे काम असल्यास त्या सूचनेनुसार लेखाधिकारी कार्यालयात सादर केलेल्या प्रस्तावांवर त्वरित कार्यवाही करण्यात येईल व वेतन निश्चिती करून देण्यात येईल, असे आश्वासन लेखाधिकारी जोशी यांनी दिले. निवेदन देतांना व चर्चेत सहभाग जिल्हा शिक्षकेतर संघटनेचे ललित सिंग गिरासे (जिल्हाध्यक्ष), संजय साळुंखे (कार्याध्यक्ष), देवानंद ठाकूर (कार्यवाह), रवींद्र वाणी (खजिनदार), जिल्हा संघटक पुंडलिक सूर्यवंशी, योगेश ठाकरे, जिभाऊ महाजन, शैलेंद्र पाटील– ग्रंथपाल प्रतिनिधी आदी उपस्थित होते.

## रक्तदान हेच सर्वश्रेष्ठ दान



# विद्यापीठाच कुलगुरु प्रो.माहेश्वरी यांची नवापूर परिक्षा केंद्राला भेट

**नवापूर दि.१३ (प्रतिनिधी) – कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगांवचे कुलगुरु प्रोफेसर माहेश्वरी यांनी नवापूर येथील परिक्षा केंद्रावर अचानक भेट देऊन पाहणी केली. परीक्षा सुरळीत व शिस्तबद्ध पध्दतीने सुरु असल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले.**


कला, वाणिज्य व विज्ञान या विद्याशाखेतील पदवी स्तरावरील सत्र परीक्षा नवापूर महाविद्यालयात सुरु आहेत. शनिवारी या परीक्षा केंद्रावरील परीक्षा दालनात दुपारी सव्वाचार वाजता कुलगुरू प्रोफेसर माहेश्वरी यांनी अचानक भेट देऊन पाहणी केली. परीक्षेच्या आयोजनासंदर्भात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.ए.जी. जयस्वाल यांचेशी त्यांनी चर्चा करून अडीअडचणी जाणून घेत मार्गदर्शन केले. परीक्षा सुरळीत व शिस्तबद्ध पध्दतीने सुरु असल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले. वरिष्ठ बहिस्थ पर्यवेक्षक डॉ.राहुल ठाकूर, अंतर्गत वरिष्ठ पर्यवेक्षक प्रा.वाय.जी. भदाणे, अंतर्गत दक्षता पथकाचे सदस्य डॉ.एस.डी. पाटील व डॉ.सुरेखा बनसोडे, कु.मिना शहा या प्रसंगी उपस्थित होते.

प्रकाश में ता.१४ को इंटरनॅशनल क्रुक




धर्मेंद्र, सायराबानो, फिरोजखान, शेट्टी, शामकुमार, जगदीप

BOOKING OPENS
ज्योती सिनेमा 3D JYOTI
2K CHRISTIE DOLBY DIGITAL




ता. ११ से रोज ४ खेल टा. १२,३,६,९ बजे | बडे मिया छोटे मिया

| तिकीट दर | गोल्ड | सिल्वर | बाल्कनी |
|---|---|---|---|
| | ८० रु. | ८० रु. | १३० रु |

ONLINE TICKET BOOKING OPEN
bookmyshow my show my time my seat
9422789999/9823177599 Jyoticinemadhule.

||जय जिनेंद्र || ||जय जिनेंद्र||

कहो! क्या परदों से सुरज छुपता है ,क्या हाथों से दरिया रुकता है
हमें गर्व व अत्यंत उल्लास है कि प्रभु की क्रुपा से महावीर जयंती के पावन अवसर पर हमारी फिल्म 1080 द लिगेसी ऑफ जिनेश्वर को आपके समक्ष प्रस्तुत करने का अविस्मरणीय अवसर प्राप्त हुआ है!
निराधार प्रतिरोध के बावजुद अत:त सत्य की विजय हुई यह फिल्म आपको जैन परंपरा की अद्भुत व अनकही यशोगाथा के साथ जोडेगी!आईए इस महावीर जयंती को अविस्मरणीय बनाए और फिल्म देखने के लिये तैयार हो जाए

दी.१९को ज्योति सिनेमा में
रोजाना ४ शो टाईम १२,३,६, ९बजे




ति.रेट - बालकनी १३०गोल्ड ८०

MANOHAR CHITRA MANDIR, DHULE ता . 13 से 2 shows





बिग सिनेमास मनोहर नाट्य चित्रमंदिर: आग्रा रोड धुळे
Shaitaan (A) 12:15 & 6:15 pm

| Ticket | बाल्कनी | प्लेटिनियम | गोल्ड | सिल्वर |
|---|---|---|---|---|
| Ticket Rate | ₹ 150 | ₹ 112 | ₹100 | ₹100 |

www.facebook.com/ManoharBigCinemasIndia 8007232021 232021/233421
BookMyShow Paytm

MANOHAR CHITRA MANDIR, DHULE ता . 13 से 2 Show





मनोहर नाट्य चित्रमंदिर: आग्रा रोड धुळे
MAIDAAN (U/A) 2:55 & 9:15 pm

| Ticket | बाल्कनी | प्लेटिनियम | गोल्ड | सिल्वर |
|---|---|---|---|---|
| Ticket Rate | ₹ 150 | ₹ 112 | ₹100 | ₹100 |

www.facebook.com/ManoharBigCinemasIndia 8007232021 232021/233421
BookMyShow Paytm

### शब्दकोडे क्रमांक.१९०७



**आडवे शब्द :** १.राजे महाराजे पूर्वी युदधाच्या वेळी वापरायचे ते लोखंडी अंगरखा ४.श्याम वर्णीय ६.रोग ८.सुसर ९.स्वाद १०.कंडू ११.मारचे वण १३.रक्त १४.जव १६.सरकार १७.पंथ १९.कथेचा गाभा २०.पंजाबी हॉटेल २१.पगार २३.हिंदीत-काळजी २४.राज्यकर्त्यांच्या हाती असलेला प्रदेश वा अधिकार २५.दुग्ध व्यवसाय करणारा २६.चपाती भाजण्याचे साधन २८.पाण्याचा पिंप २९.युदध ३०.लोखंड घासण्याचे साधन ३२.अतुट ३३.व्यासपीठ ३४.बेलन ३६.एक प्रकारची मिठाई वा चवदार मासळी ३७.व्यवसाय ३८.हिंदीत-क्कंबर ४०.संगीतातील एक राग ४२.रेतीवर रेघोटया ओढून भविष्य पाहण्याची विदया ४४.आमीर खान,काजोल यांचा एक सिनेमा ४६.ग्रामीण बोलीत स्वप्न ४८.दोन डोंगरांमधील खोलगट जागा ४९.हुशार ५०.नायक ५१.मैल ५२.प्रियकर,सोबती

**उभे शब्द :** १.एक लहान आकाराचा पक्षी २.बंध ३.दुध आटवून तयार केलेला पदार्थ ४.दुधावरील मलई ५.वकीली ६.यश ७.होकार ९.फळांचा मुरांबा १२.विमानाची धावपटटी १५.वस्ती १६.कौतुकाची धाप १७.पशू १८.पायताण २२.मनाची घालमेल २७.वाटप २८.पायाच्या तळव्यातील उंच भाग २९.पायजमा ३०.दर्पण बनवण्यासाठी वापरतात ३१.मानाचा मुजरा,स्व.कवी मंगेश पाडगावकरांचा एक काव्य संग्रह ३२.जुन्या जुडवा सिनेमातील नायक फै त नाव ३३.समुद्र मंथनावेळी वापरला गेलेला पर्वत ३५.साल ३८.मनाचा ओढा ३९.बैठक ४१.तुफान ४३.जखमेवर लावावयाचे स्निग्ध औषध ४५.नाश करणारा ४७.भारतीय संस्कृतीनुसार जेवताना बसण्याचे एक लाकडी साधन ४९.मसा-उलट लिहा

**शब्दकोडे क्रमांक.१९०६ चे उत्तर**


| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| शि | र | का | व | | वि | ना | श | क | | त | रा |
| का | स | | ल | ग | | ला | | ल | पं | डा | व |
| र | | सा | य | | मा | य | ना | | जा | | स |
| | सा | व | | पा | | क | रा | ड | | ब | |
| क | | धा | व | प | टू | | य | | स | द | न |
| पा | व | न | | ड | | म | ण | का | | ना | ळ |
| ट | न | | उ | | सां | ज | | र | क | म | |
| | वा | द | ग्र | स्त | | ल | व | क | र | | मा |
| ल | स | | वा | न | र | | जी | | म | न | न |
| ट | | न | दी | | थ | रा | र | क | | र | व |
| प | ड | का | | म | | म | | स | ल | मा | |
| ट | | र | म | जा | न | | थो | र | | ई | रा |



“समता, स्वातंत्र्य, विश्वबंधुत्व या तीन तत्वांवर आधारित जीवनमार्ग म्हणजे लोकशाही”
–डॉ.बाबासाहेब आंबेडकर

आपला महाराष्ट्र
www.aplamaharashtra.in

# बहर





## संघर्ष यात्री

**डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना विनम्र अभिवादन!**

चौदा एप्रिल!
वंचितांचे मसिहा
बोधिसत्व डॉ. बाबासाहेबांचा,
आज जन्म दिवस!
परम भाग्याचा–सौख्याचा,
आनंदोत्सव साजरा करण्याचा–
दिवस!!
बाबासाहेब,
दिलेत तुम्ही महत्व–
शिक्षणाला–जागृतीला!
होता तुमचा समाज,
शिक्षणापासून कोसो दूर...
मात्र–दाखवलीत–तुम्ही अन्–
तुमचे महान गुरु–
महात्मा फुले यांनी,
शिक्षणाने उत्थानाची दिशा!
दिलीत अस्तित्वाची–
प्रखर जाणीव– अन्–
अस्मितेचे–बुध्दी प्रामाण्यवादाचे–
भान!
बाबासाहेब,
आपणास ज्ञात होतेच की,–
याशिवाय – उठणार नाही,
पेटून ही वंचित जनता–
गुलामागिरीच्या जोखडातून!
बाबासाहेब,
नव्हती तुम्हांस अभिप्रेत–
जात–व्यक्ती–धर्माची–
अधिसत्ता,
कोणत्याही प्रजासत्ताक
राष्ट्राला!
तुमच्या मते–
भारतीयत्व हेच राष्ट्रीयत्व,
संविधान–हाच धर्मग्रंथ!
त्यातील आज्ञांचे पालन–
हाच आहे खरा राष्ट्रधर्म!!
संघर्षयात्री बाबासाहेब
समता–न्याय–नीतिसाठी–
केलात तुम्ही संघर्ष–
आयुष्यभर!
न्याय– अर्थ–तत्वज्ञ–
राजकारणी–समाज सुधारक–
या नात्याने केलीत–
अष्टपैलू – अद्वितीय–अशी,
कामगिरी! अन्
दिलीत वंचित चळवळीस–
प्रेरणा–!
दिलेत संरक्षण–समर्थन,
महिला कामगारांच्या–
हक्कांना!
भारतीय स्त्रियांनो,
यावे लागले रस्त्यावर–
आपल्या हक्कांसाठी–
परदेशातील स्त्रियांना, मात्र–
द्रष्टे बाबासाहेबांनी दिलेत,
न मागता – आपल्या–
भारतीय स्त्रियांना–
श्रेष्ठ संविधानातून,
मानाचे–स्वाभिमानाचे
हक्कांचे जिणे!
तशी –आहेच आपली–
‘राज्यघटना’
श्रेष्ठ–विधायक! मात्र,
गरज आहे ती–राबविणारे
लोक असावेत लायक!
व्हावी मानवतावादी दृष्टीने–
तिची अंमलबजावणी!
नाही तर...
सापडेल आपले स्वातंत्र्य,
घोर संकटात! अन्
अंती जावे लागेल–
हुकूमशाहीच्या मार्गाने!
भारतरत्न बाबासाहेब,
तुम्ही आदर्श–तुम्हीच प्रेरक!
तुमच्या अथक अशा–
परिश्रमांमुळेच,
गात आहोत आम्ही–
आज प्रकाशाची गाणी!
अन् –कृतज्ञतापूर्वक–
नतमस्तक होत आहोत.
परम–पवित्र–तवचरणी!!
जयभिम

–प्रा.प्रभा निकुंभे, धुळे

---

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे भारतीय स्त्रियांसाठी योगदान व त्यांचा जागतिक प्रभाव

**▶ राजेंद्र संभाजी वाघ, साक्री, मो.७५०७८५६९९०**

**भारतात प्राचीन काळापासून पुरुषप्रधान संस्कृती होती, या संस्कृतीत स्त्रियांना दुय्यम स्थान होते. म्हणून हिंदू कोड बिल स्त्रियांना सक्षम व त्यांना सशक्त करण्यासाठी बाबासाहेबांचे एक पुढचे पाऊल होय.**


डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर हे महिला मुक्तीचे पक्के समर्थक होते,यात अतिशयोक्ती नाही. कारण गौतम बुद्ध व महात्मा फुले यांचा प्रचंड प्रभाव होता. बाबासाहेबांच्या मते गौतम बुद्ध हेच स्त्रियांच्या स्वातंत्र्याचे आद्य पुरस्कर्ते होते. त्याचप्रमाणे भारतीय महिला मुक्तीची खरी वैचारिक बैठक गौतम बुद्धांच्या गौतम बुद्धांच्या भक्कम अशा समतावादी तत्त्वज्ञानाच्या पायावर उभी असल्याचे दिसते.

डॉ.बाबासाहेबांच्या मते कोणत्याही समाजाचे मूल्यमापन त्या त्या समाजातल्या स्त्रियांच्या आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक व राजकीय परिस्थिती कशी आहे यावरून ठरते. म्हणूनच समाजाने स्त्रियांच्या सर्वांगीण विकासाकडे, प्रगतीकडे लक्ष केंद्रित करणे गरजेचे आहे. अशी बाबासाहेबांची आग्रहाची भूमिका होती. ही समग्र प्रगती फक्त पुरुषांचीच नव्हे तर स्त्रियांची ही प्रगती होणे गरजेचे आहे. याची जाणीव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना विद्यार्थी दशतच झाली. म्हणून त्यांनी औरंगाबाद येथे मिलिंद महाविद्यालयाची स्थापना केली व मुलींना प्रवेश दिला.

खान कामगार, स्त्रियांना शासकीय– खाजगी क्षेत्रात प्रसूती भत्ता कोळसा खाणीत काम करणाऱ्या स्त्रिया कामगारांना पुरुषांनी इतकीच मजुरी त्याचप्रमाणे बहुपत्नीत्वाच्या प्रथेला पायबंद, मजूर व कष्टकरी स्त्रियांसाठी २१ दिवसाची किरकोळ रजा, एका महिन्याची हक्काची रजा, दुखापत झाल्यास नुकसान भरपाई आणि वीस वर्षे सेवा झाली तर निवृत्ती वेतनाची तरतूद इत्यादी महत्त्वाचे निर्णय बाबासाहेबांनी घेतले.स्त्रिकामगार शासकीय नोकरी करणाऱ्या स्त्रियांना प्रसूती रजा मिळवून देणारे डॉ.बाबासाहेब आंबेडकर ही जगातील पहिली व्यक्ती ठरली आहे. भारतानंतरच अनेक वर्षांनी इतर देशातील महिलांना प्रसूती रजा मंजूर झाल्या आहेत.

डॉ.बाबासाहबीती १९४७ साली भारताचे कायदा मंत्री असताना हिंदू संहिता विधेयक अर्थात हिंदू कोड बिल प्रस्ताव मांडला होता. अस्पृश्यतेचे उच्चाटन, श्री पुरुष समानता, स्त्रियांना काडीमोड घेण्याचा अधिकार, वारसा हक्काचे लाभ स्त्रियांनाही देण्याची तरतूद यात समावेश होता. बाबासाहेबांच्या मते पुरुषांना जसे अधिकार आहेत त्याचप्रमाणे स्त्रियांना सुद्धा अधिकार असले पाहिजे तरस सामाजिक न्यायाचा लढा यशस्वी होईल. या विधेयकाला प्रथम भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू पाठिंबा होता परंतु काँग्रेस मधल्या सनातनी मंडळींचा याला विरोध झाला. तसेच तत्कालीन काळात निवडणूक येऊ घातल्यामुळे नेहरूंना पाठिंबा देता आला नाही त्यामुळे त्यांना माघार घ्यावी लागली.

ज्या मतदानाच्या अधिकारासाठी युरोप सारख्या देशात स्त्रियांना संघर्ष करावा लागला तोच मतदानाचा अधिकार भारतीय स्त्रियांना/ महिलांना न मागता बाबासाहेबांनी दिला. कुटुंबाचे योग्य नियोजन स्त्रियांशीच निगडित असल्याने स्पष्ट भूमिका घेतली. आपल्या चळवळीतील स्त्रियांना आवर्जून सहभागी करून घेतले. महाड चवदार सत्याग्रह,१९३० नाशिक काळाराम मंदिर सत्याग्रह व १९४२ नागपूर महिला परिषदेत मोठ्या संख्येने स्त्रियांचा सहभागी होत्या. लग्न मुलींवर लादली जाऊ नये, पती पत्नी समान अधिकार असावे,पतीची गुलामी असं डॉ. आंबेडकर म्हणत असे. पत्नी कशी असावी याविषयी जसे पुरुषांचे मत घेतले जाते त्याप्रमाणे स्त्रियांचे सुद्धा मत घेतले पाहिजे.



भारतीय स्त्रियांनीसुद्धा आपले हक्क व अधिकार मिळवण्यासाठी स्वतःही पुढे आले पाहिजे. हा विचार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मांडला. तसे पाहता त्यांचा श्री विषयक दृष्टिकोन व्यापक होता परंतु भारतातील अनेक उच्चभू, उच्चवर्णीय दलित बहुजन समाजाच्या स्त्रिया बाबासाहेबांच्या कार्याविषयी अनभिज्ञ आहेत. त्यांना याविषयी अजिबात माहित नाही आणि ते जाणून घ्यायलाही तयार नाहीत. याबाबत काही अभ्यासक व चळवळीतील उच्चवर्णीय –दलित स्त्रियांनीच योगदानाची दखल घेतली. त्यांनी भारतातील समस्त स्त्रियांच्या समस्या मांडल्या. तरी हिंदू कोड बिलात महिलांसाठी सुचवलेल्या उपाययोजना पुढे कायद्याच्या रूपाने अमलात आणल्या त्याचा लाभ सर्व भारतीय स्त्रियांना झाला आज सर्व भारतीय स्त्रिया घेत आहेत. तसेच दलित बहुजन स्त्रियांनपेक्षा उच्चवर्णीय स्त्रियांनाच अधिक फायदा झाला.भारतात प्राचीन काळापासून पुरुषप्रधान संस्कृती होती, या संस्कृतीत स्त्रियांना दुय्यम स्थान होते. म्हणून हिंदू कोड बिल स्त्रियांना सक्षम व त्यांना सशक्त करण्यासाठी बाबासाहेबांचे एक पुढचे पाऊल होय. भारत स्वतंत्र झाला तेव्हा पुरुष–महिलांना घटस्फोटाचा अधिकार नव्हता. पुरुषांना एकापेक्षा अधिक लग्न करण्याचा अधिकार होता. विधवा महिलांना दुसरे लग्न करण्याचा अधिकार नव्हता व त्यांना संपत्ती पासून व वारसा पासून अलिप्त ठेवण्यात आले. मात्र संविधानात डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी सर्व भारतीय महिलांना अधिकार प्राप्त करून दिले. ’ दायभाग’ व ’मिताक्षरा’ या संस्कृत ग्रंथात वारसा हक्काप्रमाणे संपत्ती मुलाकडेच हस्तांतर होत असे परंतु याला फाटा देत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महिला व मुलींना बरोबरीचा दर्जा देऊन पती मयत झाल्यानंतर संपत्ती वारस हक्काने महिलांकडे आली व तिला संपत्ती विकण्याचा अधिकार प्राप्त झाला. तसेच बहुपत्नीत्व प्रथेला पायबंद लागला व एक पत्नीत्वाचा पुरस्कार करण्यात आला.

बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय स्त्रियांना कायद्याने हक्क, दर्जा, प्रतिष्ठा प्राप्त करून दिला. तसेच तसेच स्त्रियांच्या महत्वाच्या विषयावर न्यायालयाच्या तराजूत सर्वांना एकाच मापात तोलले. हिंदू कोड बिल, घटस्फोट, द्विभार्या या कलमांना सनातनी वृत्तीच्या लोकांनी तीव्र विरोध केला. या बिलासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शेवटी कायदामंत्रीचा राजीनामा दिला म्हणून तत्कालीन नवशक्ती या वृत्तपत्रात हिंदू कोडबिलाचा खून अशी बातमी प्रसारित झाली होती. या बिलाच्या आधारेच पंडित नेहरूंनी चार कायदे अमलात आणले. यात हिंदू विवाह कायदा, हिंदू अज्ञान व पालकत्व कायदा आणि पोटगी कायदा. यामुळे भारतीय न्यायव्यवस्थेला व कायदा न्यायव्यवस्थेला इतिहासातील क्रांतिकारक पर्व म्हणून ओळखले जाते. या कायद्यामुळे भारतीय स्त्रियांच्या जीवनात मोठे परिवर्तन झाले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा प्रभाव भारतातच नव्हे तर जगभरात समता लढ्यांमध्ये दिसतो. त्याचे तत्त्वज्ञानातून इतर शोषित देशातील लोकांना प्रेरणा मिळते, जसे जपानमध्ये 'बुराकू' नावाची एक शोषित जमात आहे. या जमातीतील अभ्यासकांनी, नेत्यांनी बाबासाहेबांचा तत्त्वज्ञानाचा अभ्यास केला व त्यातून ते प्रभावित झाले आणि त्यांच्या तत्त्वज्ञानाचा अभ्यास करीत ते बाबासाहेबांना आपले प्रेरणास्थान मानतात.तसेच नेपाळमधील दलित ही डॉ. आंबेडकरांपासून प्रभावित झाले ते त्यांना मुक्तिदाता मानतात. त्याचबरोबर युरोपमधील हंगेरी देशातील जिप्सी लोकांचे नेते जानोस ओरसोस याच्यावरही त्याचा प्रभाव पडला. त्यांनी बाबासाहेबांचे तत्वज्ञान जिप्सी लोकांमध्ये घडवून आणले. हंगेरियन लोकांनी सन २००७ मध्ये 'साजोकाजा' गावात डॉ. आंबेडकर हायस्कूल नावाची शाळा सुरू केली. हंगेरी देशात डॉ.आंबेडकर नावाने तीन महाविद्यालय सुरू करण्यात आले आहे. तेथे डॉ.आंबेडकरांचे धडे शिकवले जातात. त्याच्यामध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा शिक्षणासाठीचा संघर्ष, जातीविरोधी चळवळी व भारतीय संविधान निर्मितीतील योगदान या बाबी शिकवल्या जातात. या शाळेत बाबासाहेबांचा अर्धकृती पुतळा स्थापित करण्यात आला आहे. जो हंगेरीतील जय भीम नेटवर्कने शाळेत भेट दिला होता.

---

# अन् पुतळा बोलू लागला....

**▶ विमल प्रकाश पाटकरी, मो.९०२८०५५९११**

महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती ११ एप्रिलला साजरी झाली. घरातील बैठकीत असलेल्या या महान महात्म्याच्या तसविरिला अभिवादन करुन घरापासून थोड्याच अंतरावर असलेल्या बागेत फिरायला जाण्यासाठी मी नेहमीप्रमाणे घराबाहेर पडले. आज बागेत गेल्यावर बागेत न फिरता बागेच्या मध्यभागी असलेल्या महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पुर्णाकृती पुतळ्याजवळ मी आले. त्यांना हार अर्पण केला आणि अभिवादन करून पुतळ्यासमोरच एका मोठ्या झाडाखाली असलेल्या बाकावर मी बसले. बसल्या बसल्या पुतळ्याकडे पाहून महात्मा फुलेंच्या कार्याबद्दल अनेक पुस्तकांमधून, वक्त्यांच्या भाषणांमधून ऐकलेलं त्यांचं महान कार्य आठवून त्यांचे मनोमन आभार मानत असतांना माझ्या मनाला वाटू लागलं की ,खुप सारे कष्ट, त्रास, छळ, अपमान हे सारं काही सहन करुन, पचवून सर्वच क्षेत्रात क्रांती घडवून साऱ्या मानव जातीला मानवधर्म शिकवण्याचं एवढं महान कार्य या थोर महात्म्याने केलेलं आहे. असं मनाशी म्हणून मी बागेत फिरण्याचा विचार केला पण जाण्यापूर्वी परत एकदा नतमस्तक होवून या क्रांतिसूर्याला अभिवादन करावं असं वाटल्यामुळे मी पुतळ्याजवळ जाण्यासाठी उठले अन पुतळा माझ्याशी बोलू लागला....

अगं ए ताई बस ना गं तू या बाकावरच.मला कळलय की तू मला परत नमन करण्यासाठी उठलीस ते.अगं पण मी पाहीलंय ना आज तू बागेत न फिरता माझ्याकडेच आलीस. मला हार घालून अभिवादन सुद्धा केलस. अन मग आता परत का अभिवादन करतेस मला ? तसं पाहिलं तर मी काही केलेलं नाही बरं का. तर मी माझ्या कृतीतून फक्त माणसाला माणुसकीचं दर्शन घडविण्याचं काम केलय बघ.

अहो,नाही नाही ज्योतिबा.तुम्ही असं का म्हणताय ? मी पुढं काही म्हणणार तोच अगं ताई,तू जरा बस तरी या बाकावर.आज मला तुझ्याशी खूप खूप बोलायचं आहे बघ.

असं म्हणून त्यांनी मला बाकावर बसायला सांगितलं आणि ते परत माझ्याशी बोलू लागले.

हे बघ ताई, सन १८२७ हे वर्ष माझ्यासाठी खुपच भाग्याचं आहे असं मी समजतो. कारण ११एप्रिल १८२७ रोजी मला सर्वश्रेष्ठ असा मानवजन्म मिळाला अन त्यामुळे मी आजही परमेश्वराचे मन:पूर्वक आभार मानतो.मी जन्माला आल्यामुळे माझ्या आई वडिलांना खूप आनंद झाला. त्यांनी त्याकाळीही माझं बारसं करायचं ठरवलं. तू म्हणशील तुम्हाला जणू हे कळत होतं काय तेव्हा? तर तसं नाही गं ताई. हे मला माझ्या आईने नंतर सांगितलं होतं बरं का. हं तर मग बारशाचा दिवस जवळ आल्यावर मोठ्या आनंदानं आणि उत्साहानं ’ ज्योती ’ नामकरणानं माझ्या बारशाचा सोहळा साजरा करण्यात आला. मायपित्याच्या ममतेच्या छायेत मी सुखानं वाढू लागलो. माझं कोडकौतुक होवू लागलं. पण पुढं अशा आनंदात मी वाढणं कदाचीत नियतीला मान्य नसल्यामुळे क्रूर काळाने माझ्या आईला माझ्यापासून हिरावून नेलं.माझी आई मला सोडून देवाघरी निघून गेल्यानं मी आईविना पोरका झालो.पण आईनंतर माझ्या वडिलांनी मला आईच्या मायाममतेनंच वाढवलं. मी शाळेत जावं,खूप शिकावं असं वडिलांना खूप खूप वाटत होतं. म्हणून त्यांनी माझं नाव शाळेत दाखल केलं.मी शाळेत जावू लागलो.मला शिक्षणाची आवड असल्यामुळे मी शिक्षकांच्या शिकवण्याकडे लक्ष देवू लागलो.परीक्षेत प्रथम क्रमांक मिळवू लागलो. हे सारं पाहून वडिलांना खुप आनंद होत असे. पण त्यावेळच्या



काही सनातनी लोकांना माझं शाळेत जाणं पसंत नव्हतं. मी शाळेत जावू नये म्हणून त्यांनी मला अनेक प्रकारे त्रास देणं सुरू केलं. त्रास सहन करुनही मी शाळेत जाणं बंद करीत नाही हे पाहून त्यांनी माझ्या वडिलांना ’ ज्योतीला शाळेत पाठवण्याचे परिणाम चांगले होणार नाहीत ’ अशा प्रकारे धमकावलेही. अन मग दुसऱ्या दिवसापासून वडिलांनी माझं शाळेत जाणं थांबवलं. पण यामुळे मला आणि त्यांनाही खूप वाईट वाटलं. मग मी वडिलांबरोबर मळ्यात,शेतात कामं करु लागलो.एके दिवशी मी असाच मळ्यात काम करीत असतांना तिथं ’ लेजिट ’ साहेब आलेत.त्यांनी मला शिक्षणाविषयी, शाळेत जाण्याविषयी विचारले असता मी त्यांना सर्व हकीकत सांगितली. त्यांनाही खूप वाईट वाटले.मग त्यांनी मला ’ शिक्षण सोडू नकोस.शाळेत जावून शिक्षण पुर्ण कर.’ अशा प्रकारे शिक्षणाची चालना दिली. पुढे मी मोठा झाल्यावर मला उच्चवर्णीयांच्या मिरवणुकीत जावसं वाटल्यामुळे मी त्या मिरवणूकीत सामील झालो. पण मिरवणुकीतील लोकांनी मला तुच्छ लेखून तुच्छतेच्या शाब्दिक बाणांनी अपमानीत केलं. हा माझा एकट्याचा अपमान नसून साऱ्या मानव धर्माचाच अपमान आहे असं मला वाटू लागलं आणि मग रवी,सरिता,पवन,धरा हे तर साऱ्यांनाच समान वागवतात पण मग मानवानच या जातीधर्माची अशी वाच्चता का करावी ? असा प्रश्न माझ्या मनात निर्माण झाला.त्याकाळी होणारी विधवांची कुचंबणा आणि शुद्रांची झालेली केविलवाणी दशा पाहून माझं मन सुन्न होत असे. म्हणूनच समाजातील ही सामाजीक गुलामगिरी नष्ट करुन साऱ्या जनतेला मानवधर्म शिकवण्यासाठी मी माझी अधिकारी पदाची चाकरी लाथाडण्यासाठी सज्ज झालो.

पुढे सन १८४८ ला मी मुलींसाठी पहिली शाळा सुरू केली आणि सनातनांच्या पोटात गोळा उठला. त्यांनी शाळा बंद करण्यासाठी अनेक प्रकारची कारस्थानं सुरू केलीत. तरीही मी न डगमगता मुलींची शाळा सुरुच ठेवली.

इतक्यातच परगावाहून आलेल्या मुलांची सहल बागेत दाखल झाली.बागेत गोंगाट सुरू झाला.सारी मुलं बागेत फिरुन सहलीचा आनंद घेवू लागलीत.थोड्याच वेळात शिक्षकांनी सर्व विद्यार्थ्यांना पुतळ्याजवळ बोलावलं. त्यांना शिस्तीत उभं रहायला सांगून शांत केलं. आणि हे बघा मुलांनो,आज ११ एप्रिल. आज या महान क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती आहे. अशी सुरुवात करुन महात्मा फुलेंच्या कार्याविषयी थोडक्यात माहिती सांगितली.नंतर सर्वांनी पुतळ्याला अभिवादन केलं आणि सारे जाण्यासाठी वळणार तोच मी सहल प्रमुखांना अहो सर,आपण मला आपला थोडा वेळ दिला तर मी ही आपल्या विद्यार्थ्यांना महात्मा फुलेंबद्दल काही माहिती सांगू इच्छिते. असं मी विचारल्यावर सरांचा होकार मिळताच

हे बघा विद्यार्थी मित्रांनो,आत्ताच तुमच्या सरांनी महात्मा फुलेंच्या कार्याविषयी माहिती सांगितली. महात्मा फुले यांनी माणसातील माणुसकी जागवण्यासाठी अनेक क्षेत्रात क्रांती घडवून आणली. त्याचप्रमाणे शिक्षण क्षेत्रातही काहीतरी बदल घडवून आणावा असं त्यांना नेहमी वाटत असे. साऱ्याच जनतेनं साक्षर व्हावं म्हणून

**विद्येविना मती गेली! मतीविना नीती गेली!**
**नीतीविना गती गेली! गतीविना वित्त गेले!**
**वित्तविना शूद्र खचले! इतके अनर्थ एका अवीद्येने केले!**

असा हा त्यांचा विचार ते साऱ्यांना सतत सांगत असत आणि म्हणूनच अविद्देमुळे होणारा फार मोठा अनर्थ टाळण्यासाठी त्यांनी शिक्षणक्षेत्रात स्वत:ला झोकून घेतलं.त्यांच्या या कार्यात त्यांना त्यांच्या पत्नी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी मोलाचं सहकार्य केल्यामुळे आज तुमच्या या शैक्षणिक सहलीसाठी तुम्हा विद्यार्थ्यांसोबत विद्यार्थिनी आणि शिक्षकांसोबत शिक्षिकाही येवू शकल्यात. आणि मी सुद्धा सरस्वतीच्या विद्यामंदिरात ज्ञानदानाचं पवित्र कार्य करुन माझी शिक्षण सेवा अत्यंत उत्तम प्रकारे पूर्ण करु शकले.अशा या महान क्रांतिसूर्य आणि क्रांतिज्योती या दोघांच्या कार्यामुळेच आम्हा स्त्रीजन्माचे सार्थक झाले आहे. हे आपण आजन्म लक्षात ठेवायला हवं.आपण मला आपला वेळ दिल्याबद्दल धन्यवाद सर.

मॅडम,आपणही आमच्या विद्यार्थ्यांना बहुमोल अशी माहिती सांगितल्यामुळे आम्ही सारे आपले आभारी आहोत.येतो मॅडम आम्ही. लांब जायचंय आम्हाला.

हो सर.या आपण.आपला प्रवास सुखाचा होवो.बाय मुलांनो.

बाय मॅडम असं म्हणून सारे मागे वळले. शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या रांगा केल्या आणि परत एकदा टाटा बायबाय करुन सहल परतीच्या प्रवासासाठी प्रवेशद्वाराच्या दिशेनं निघाली.सहलीच्या विद्यार्थ्यांकडे मोठ्या कौतुकानं पाहत असतांना मलाही माझ्या शाळेतील अनेक शैक्षणीक सहली आठवू लागल्या.जणू मी माझ्या शाळेतील अनेक विद्यार्थ्यांसोबत असल्याचा सुखानंद उपभोगत असतांनाच ताई ए ताई असा आवाज आल्यामुळे मी वळून पुतळ्याकडे पाहिलं तर पुतळ्याच्या चेहऱ्यावरील प्रसन्न भाव मला दिसल्यावर मी पुतळ्याकडे पाहतच राहिले.आणि मग बाकावर बसण्यासाठी मागे न वळता पुतळ्याकडे बघत बघतच चार सहा पावलं मागं जावून बाकावर बसले.अन पुतळा परत माझ्याशी बोलू लागला....

अगं ए ताई,आज सहलीसाठी आलेल्या विद्यार्थ्यांना त्यांच्या शिक्षकांनी आणि तू ही माझ्या कार्याविषयी माहिती सांगितली.तू तर माझ्या कार्यात मला माझ्या सावित्रीने केलेल्या सहकार्याची माहिती सांगून मला तिच्याबद्दल वाटणाऱ्या अभिमानात भर घातल्यामुळे मी तुझा आभारी आहे गं ताई.


अहो ज्योतिबा,आपण माझे आभार का मानताय? आपण तर क्रांतीसूर्य आहात !

अगं ताई,असं काही नसतं बघ.तसं पाहिलं तर आपण सारे समान आहोत.मुळातच श्रेष्ठ–कनिष्ठ असा भेदभाव करणं मला कधी जमलंच नाही बघ.हं .तर सावित्रीबद्दल सांगायचं म्हणजे माझं तिच्याशी लग्न झालं त्या काळी मुलींनी शिक्षण घेणं म्हणजे महापाप समजलं जात असे. म्हणून माझी सावित्री देखील निरक्षरच होती.मी तुला मघाशी सांगितल्याप्रमाणे सन १८४८ ला सुरू केलेली मुलींची शाळा नियमीतपणे सुरू होतीच.बघता बघता पुढे शाळेतील मुलींची संख्या वाढू लागली.ही वाढती संख्या पाहून त्यांचे पुढील शिक्षणकार्य झेपावण्याची चिंता मला वाटू लागली.एके दिवशी **(पान ५ वर)**



विलास कुडके
मो.९२७१६५०४७९

## दुर्मिळ पुस्तके




# पाण्यातले दिवस

## लेखक - प्रल्हाद जाधव

'पाण्यातले दिवस' हे प्रल्हाद जाधव यांचे हे अवघ्या ६५ पृष्ठांचे राजहंस प्रकाशनने प्रकाशित केलेले ललित सुंदर व दुर्मीळ पुस्तक! प्रकाशनाचा काळ दिलेला नाही. तेव्हाची किंमत होती रुपये ३०.

निसर्गातल्या प्रत्येक गोष्टीला अंगभूत सौंदर्य असते. बाह्यत्कारी सौंदर्याचा आस्वाद नजरेने घेणे ही सुखद बाब आहे, त्याहीपेक्षा आंतरिक सौंदर्याचा आस्वाद घेणे हा स्वर्गीय आनंदाचा ठेवा आहे. मात्र त्यासाठी जसा पाण्यात डोळे उघडे ठेवण्याचा सराव हवा, तसाच कल्पनेचा एक डोळा उघडा ठेवण्याचा सराव असणे आवश्यक आहे. असा कल्पनेचा डोळा उघडा ठेवून नदी, मासे, मासेमारी आणि अन्य जलचरांच्या संगतीत घालवलेले पाण्यातले दिवस असे सार मलपृष्ठावरील ब्लर्बजमध्ये व्यक्त झालेले आहे. Give a man a fish, and you feed him for a day. Teach a man to fish and you feed him for a lifetime ही चिनी म्हण सुरुवातीला असून हे पुस्तक आईला ;झर्यावरच्या धुक्याला अर्पण केलेले आहे.अर्पण पत्रिकेत एक वेगळेपण आहे. या पुस्तकातील ललित लेखांना एक, दोन, तीन अशी आठपर्यंत शीर्षके दिली आहेत.

पहिल्या ललित लेखात लेखकाचा मासेमारीशी आता काहीही संबंध राहिलेला नसला तरी काही क्षण त्यांना भूतकाळाच्या काठावर ओढून नेतात आणि मासेमारीसंबंधीच्या आठवणीत चिंब भिजवून टाकतात. मग त्यांना लहाणपणीचा प्रसंग आठवतो. तू मोठा झाल्यावर आंगठेबहाद्दूर होणार की सहीबहाद्दूर? असे त्यांना आजोबा विचारतात तेव्हा ते आंगठेबहाद्दूर असे उत्तर देतात. घरातली मंडळी खो खो हसतात. मी तुला मासे मारायला शिकवीन असे आजोबा म्हणतात पण आजोबांकडून त्यांना मासेमारी शिकण्याची संधी मिळाली नाही पण त्या क्षणी त्यांच्या मनावर मासेमारीचा संस्कार झाला. तो पहिला धडा मनाच्या पाटीवर कोरला गेला. त्यातूनच त्यांना मासेमारीचा छंद लागला. बालपणाची ८-१० वर्षे या छंदात गेली. अजूनही त्या दिवसांची नशा उतरलेली नाही. रायगड जिल्ह्यातील पोलादपूर हे त्यांचे गाव. तेथे ते जेव्हा जेव्हा जातात तेव्हा सावित्री नदीवर फेरफटका मारतात. या सावित्री नदीचे मोठे हदयंगम वर्णन या लेखात आहे. त्यांची आई सावित्रीचा उल्लेख 'गंगामाई' अशी करायची. 'सारे काही त्या गंगामाईलाच ठाऊक आहे' असे ती गूढ बोलायची. दक्षिणेकडून उत्तरेकडे वाहात जाणारी ती एकमेव नदी आहे. सावित्रीने पोलादपूरला आपल्या कुशीत जागा दिली आहे असे ते सुंदर वर्णन करतात. तिच्यातील डोह, तिला मिळणारा ओढा, 'गाढववळण', 'बेडकी 'संगम, 'जुटा' बेट, 'हंडी 'डोह,' कोंडी 'डोहाची विविध प्रकारच्या माशांच्या आकर्षणास कारणीभूत ठरलेली विलक्षण अंतर्गत रचना, तेथे मासेमारी करणे कसे आव्हान असते त्याचे ललित सुंदर वर्णन यात आहे. पोलादपूरला त्यांचे आज्या आले की ते त्यांना वांबी मारण्यासाठी घेऊन जात. त्यांच्या सोबतचे क्षण म्हणजे त्यांना असीम सुखाचा ठेवा वाटतो. 'हंडी' डोहाचे वर्णन आहे. बेडकी, उंबराची फुगी, बामणाचा पाणवठा, हत्तीमहाल, चिखलीची बाग, गंगाबायचा घाट यांचे अंगभूत सौंदर्य आहे. त्यांचा आस्वाद घेण्यासाठी कल्पनेचा एक अंत:चक्षू उघडा करता येण्याचा सराव हवा असे लेखक सांगतो. सावित्रीत डुंबण्यात आणि मासेमारी करण्यात त्यांचे बालपण गेले. त्या ओल्या दिवसांच्या आठवणी त्यांचे जीवन व्यापून उरल्या आहेत. सावित्रीच्या पाण्यात उडी मारुन बाहेर पडल्यावर जे सुख अंगावरुन निथळत राहते त्याला कुठेही तोड नाही असे ते सांगतात.

दुसर्या ललित लेखात लहानपणी घरात अवती-भवती असलेले मासेमारीचे वातावरण, माशांच्या शिकारीच्या सुरस व चमत्कारिक कथा, त्या वातावरणाचा त्यांच्यावर हळूहळू पडलेला प्रभाव यात वर्णन केला आहे. लहानपणी एकदा रामचंद्र तात्या त्यांना पाठीवर बसवून वांबी मारायला घेऊन जातात. तात्यांच्या गळ्याभोवतीचा हात सुटून ते पाण्यात कोसळतात व तळालाच जातात व एका आंतरिक प्रेरणेने ते पाण्यावर पहिला हात मारतात. त्या क्षणी त्यांच्यात जो आत्मविश्वास निर्माण होतो आणि जो आनंद मिळतो तसा त्यांना नंतर केव्हाही मिळाला नाही असे ते सांगतात. त्या क्षणापासून त्यांची सावित्रीशी कायमची दोस्ती झाली.आजोबांनी आहीर मारल्याची गोष्ट लेखकाला आजही आठवते. अंगाला अतिशय बळकी असलेला हा मासा. त्याची शिकार करायला फार मोठा अनुभव व कसब लागते. गावातल्या कोंबड्या गायब व्हायला लागल्या तसे गावकरी संभ्रमात पडले. आजोबांनी कोंबडीचोर आहीर शोधला व त्याला पकडून घरी आणले. मासेमारीच्या वेगवेगळ्या पध्दती, कोलंबी जिला काळीज नसते व खेकडे , कोलंब्या पकडण्यासाठी आजोबांनी सांगितलेली सोपी युक्ती, माशांचे विविध प्रकार, मासेमारीच्या विविध पद्धती यात वर्णन केले आहे. मासेमारीचे पारंपरिक शास्त्र हे सूक्ष्म निरीक्षणावर, मासेमारांच्या स्वानुभवावर आणि त्यांच्या दांडग्या मेहनतीवर आधारलेले आहे असे लेखक सांगतात. जगात माशांच्या सुमारे २१,००० जाती आहेत. त्यातील दीड हजारहून अधिक जा-तीचे मासे भारतात सापडतात. ठाणे, रायगड आणि रत्नागिरी पट्ट्यात, सांगली, सातारा, कोल्हापूर, नाशिक, औरंगाबाद, जळगाव येथील धरणांच्या मोठ्या संख्येमुळे आढळणारी मासे, चवीच्या क्रमवारीनुसार मासे याचे मोठे रंजक वर्णन यात आहे.

तिसऱ्या* ललित लेखात गळाला कोणकोणत्या प्रकारचे आमीष (आवीस) लावले जाते याचे रंजक वर्णन केले आहे. त्यामध्ये गांडूळ, लहान लहान कोलंब्या, मळ्याचा मासा, भिंगुर्डा, पितुर्डी, बेडूक, हिरवा टोळ असे आमिष लावलेल्या गळाचे विविध प्रकार कळतात. माश्यांच्या सवयी, मासेमारीच्या पध्दती यांचे ललित सुंदर वर्णन यात आहे.

चौथ्या* ललित लेखात गळाने मासे मारणे हा काहींचा छंद आहे तर त्यावरही उपजीविका करणारे मासेमार आहे याबाबत वर्णन आहे. गळाने मासेमारी करणारा माणूस हा जवळजवळ समाधी अवस्थेप्रत पोहोचलेला असतो आणि त्याच्यात आणि निसर्गात अद्वैत निर्माण झाले असते असा सुंदर विचार मांडला आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष, नेपोलियन यांची उदाहरणे याठिकाणी दिलेली आहेत. गळाने मासे मारायची साधने यांचे अगदी बारकाईने वर्णन केले आहे. गळाने मासे मारणे ही साधना आहे आणि नशीबाचाही भाग आहे. त्यातील डावपेच आणि मासोळींच्या चाली. मासा आणि माणूस यातील संघर्ष अशा अनेक पैलूंचे यात ललित सुंदर वर्णन केलेले आहे.

पाचव्या* लेखात गरवणे या मासेमारीच्या अवघड पध्दतीबद्दल वर्णन आहे. पाण्यात बुडी मारुन माशाच्या निवासस्थानाचा शोध घेऊन आमीष थेट माशाच्या तोंडासमोरच खेळवणे व त्याने त्यावर चावा टाकताच त्याला फारुन बाहेर काढणे अशी ही पध्दत असते. आहिराच्या शिकारीसाठी शेराच्या झाडाचा चीक मारणे, डोहात तिसळाचे (तिरफळाचे) कूट टाकून मासेमारी करणे, पागाने मासे मारणे, कंडाळ पाण्यात सोडणे, मत्स्यसंवर्धन, बांधण घालणे, खवल मारण्यासाठी पालवणे ही पध्दत, गॅसची बत्ती खांद्यावर घेऊन नदीच्या काठाने मासे मारायला जाणे, पर्या आटवणे, वल्गन लागणे अशा विविध पध्दतींचे वर्णन केलेले आहे.

सहाव्या* लेखात आहीर या दुर्मीळ आणि शक्तिशाली माशाच्या शिकारीसाठी वापरात असलेल्या चीक मारणे या पध्दतीबाबत वर्णन आहे. आहिराच्या शिकारीची साधने, आहिराचे मर्मस्थान कल्ला, सुसरीची शिकार यांचे यात वर्णन आहे. केवळ गळाच्या साहाय्याने सुसरीची शिकार करणारे त्यांचे आईचे वडील, खेडजवळ भोस्ते हे लेखकाचे आजोळ. तिथल्या नदीत सुसरी फार असत.

सातव्या* लेखात पेटलेल्या टायरच्या प्रकाशात खेकडी पकडायला जाण्याचा रोमहर्षक अनुभव , खेकड्याच्या जाती खेकडी पकडण्याच्या पद्धती, कोईण टोपली, मुठे पकडणे, खेकडी भरडणे खेकडे नांगवणे,नदी अवधीला येणे इ. बारकाईने रंजक वर्णन केलेले आहे.

आठव्या* प्रकरणात माशाचे डोळे सदैव उघडे असतात. त्याच्या डोळ्यांना पापण्याच नसतात. डोळे उघडे ठेवूनच त्याला झोप घ्यावी लागते. माशाच्या पोटातील पिशवी, तिचा ध्वनी काढण्यासाठी होणारा उपयोग, माशांच्या मनातील भाव-भावनांची देवाण-घेवाण डोळ्यांनी होते, ट्यूना नावाचा गाणारा मासा, भावना व्यक्त करण्यासाठी मासे रंग बदलतात, माशांचे गंधज्ञान, त्यांची वाढ कधीही खुंटत नाही, वजनदार मासे, माशांचे प्रजनन, माशांच्या जगतातील वैचित्र्य, तिलापिया, समुद्रकडी, डॉक्टर मासा, लचूक अशी आश्चर्यकारक व रंजक माहिती यात दिलेली आहे. मासे स्वतःची वीज स्वतः निर्माण करु शकतात. मत्स्यावतार, मत्स्यकन्या, मछींद्रनाथ, मनू आणि मासा इ. अनेक उल्लेख या ललित लेखात आलेले आहेत.

दिनकर गांगल ह्यांनी थोरो, दुर्गा भागवत आणि प्रल्हाद हा लेखकावर थिंक महाराष्ट्र पोर्टलवर लिहिलेला लेख आवर्जून वाचावा असा आहे. त्यात त्यांनी प्रल्हाद जाधव यांची लेखणी अतिशय हळूवार व तरल असल्याचे व त्यांच्या लेखणीत जरुर तेव्हा नाट्यत्मक्ता येते तसेच त्यांचे विषयवैविध्य विस्तृत आहे असे नमूद केलेले आहे. १३ नाटके, ९ एकांकिका, रानभूल, तांबट, आनंद नक्षत्र, आनंदाची मूळाक्षरे, गॅलरीतली रातराणी, प्रसिध्दी आणि प्रतिमा, हिमाक्षरे इ. त्यांची विपुल साहित्य संपदा आहे. पाण्यातले दिवस हे त्यातले ललित सुंदर आणि रंजक असे पुस्तक आहे!

---



डॉ.कांचन परांजपे
मो.८६२३००९२४४

## आरोग्यवर्धिनी


आंबा हा सगळ्यांचे आवडते फळ आहे पण आंब्या बद्दल अनेक गैरसमज आहेत.लोकांना वाटते की आंबा खाल्ला की वजन वाढेल किंवा रक्तातील साखर वाढेल.म्हणूनच आंब्याबद्दल शास्त्रीय माहिती असणे गरजेचे आहे आणि मगच ठरवावे की आंबा खायचा की नाही.

१०० ग्राम आंबा = ६०-७० कॅलरिज

Glycemic Index 56 आहे जो मध्यम स्वरूपाचा आहे म्हणजे आंब्यामुळे शुगर पटकन वाढत नाही पण एकाच वेळी ४ आंबे खाल्ले तर मात्र शुगर वाढणार. १०० ग्राम आंबा म्हणजे मध्यम आकारच्या अर्धा आंबा. आंब्यातून कोणती पोषणमूल्य मिळतात हे माहिती असणे महत्वाचे आहे

विटामिनस- सगळ्या प्रकारची विटामिनस आहेत उदारणार्थ

# आंबा किती, कधी, कसा खावा?



आपल्याला दिवसभरात लागण-ारे निम्मे विटामिन उ आंब्यातून मिळते. ज्यामुळे आपली प्रतिकारशक्ती वाढते व शरी-रात लोहाचे शोषण व्हयला मदत होते.आपल्याला विटामिन - सुध्दा आंब्यातून मिळते ज्यामुळे प्रतिकारशक्ती वाढते,डोळ्यांचे आरोग्य चांगले राहते व त्वचा चांगली राहयला मदत होते. आंब्यात कॅलशियम,लोह व फायबर्स असतात.आंब्यामध्ये फायबर्स बऱ्याच प्रमाणात असल्यामुळे वजन कमी करताना फायदा होतो.तसेच anti-oxidant पण असतात जे हृदयाच्या आरोग्याला महत्वाचे आहेत आणि कर्करोगाला प्रतिबंध करायला मदत करतात.समतोल आहारात आपल्याला सगळ्या प्रकारची विटामिनस, मिनरल्स, प्रोटीन्स, कर्बोदके व फॅटस मिळायला पाहिजेत त्याचे उत्तम उदाहरण म्हणजे आंबा.जेव्हा आंब्याचा सिजन असतो तेव्हा आंबा खायला हरकत नाही. रोज १ आंबा खायला काही हरकत नाही जर वजन स्थिर राहत असेल तर. मधुमेह असेल तर हेच प्रमाण ठेवावे. आणि आंबा खाल्ल्यावर २ तासांनी शुगर चेक करावी व शुगर जास्त प्रमाणात वाढत नसेल तर आंबा खायला काही हरकत नाही.२-३ वेळा शुगर चेक करावी आंबा खल्ल्यावर म्हणजे समजेल की आंबा खायचा की नाही. आंबा हा पोषक आहे मग का घाबरायचे आंबा खायला.पण आंबा प्रमाणात खा म्हणजे वजन व मधुमेह पण आटोक्यात ठेवायला मदत होईल.आंबा खायची इच्छा पूर्ण झाल्यामुळे समाधान मिळते व आपले शरीर पण चांगला प्रतिसाद देते. किती प्रमाणात आंबा खातो त्यावरूनच ठरेल की आंबा हे औषध ठरते आरोग्य चांगले ठेवायला की त्याच्यामुळे औषध घ्यावे लागेल. आंबा औषध म्हणून खायचा असेल तर प्रमाणात खा आणि स्वस्थ रहा.



---




राज न्यूयॉर्कहुन मुंबईला आला आणि तो पुण्याला जाण्यासाठी कॅबची वाट बघत होता. मंत्रमुग्ध करणाऱ्या अतिशय गोड आवाजाने राजचे लक्ष वेधून घेतले. राजने वळून बघितले, कुणीही दिसत नव्हते परंतु गोड आवाजातील बोलणे मात्र चालुच होते. फोनवर बोलता बोलता भल्या मोठ्या पिलर मागून ती बाहेर आली आणि राज तिच्याकडे बघतच राहिला. गव्हाळ वर्ण, सडपातळ बांधा, मध्यम ऊंची, लाल रंगाचा स्लीवलेस टॉप, काळ्या रंगाची पॅन्ट, खांद्यावर विसावलेले मोकळे केस आणि हाय हिल्स. निव्वळ अप्रतिम सौंदर्य! तिची कॅब आली आणि ती निघून गेली. केवळ काही क्षणांचे दर्शन पण राज पुरता घायाळ झाला.

राजला पुण्याला येऊन दोन दिवस झालेत. तो अजिबात घराबाहेर पडला नाही आणि अगदी कमी बोलत होता. राज तु बेचैन दिसतोस, जरा बाहेर जाऊन ये, तेवढाच फ्रेश होशील, आई म्हणाली. रीना चा दोनदा फोन आला तिला भेटून ये. केवळ आईच्या आग्रहास्तव राज रीनाकडे जायला तयार झाला. रीनाने राजचे मोठ्या प्रेमाने स्वागत केले. राजने आणलेला परफ्युम तिला खूप आवडला. तेवढ्यात रीनाचा फोन वाजला आणि त्यानंतर रीना फोनवर बराच वेळ बोलत होती. राजला फोनवरील मधुर आवाज ओळखीचा वाटला. कालची ती सौंदर्यवतीच तर नसेल ना? रीना, कोणाचा फोन होता? किती गोड आवाज आहे ना? राजने अधीरतेने विचारले. माझ्या मैत्रिणीचा, नेहाचा फोन होता. काय करते नेहा? राजचा पुढचा प्रश्न. नेहा डॉक्टर आहे. तिचे क्लिनिक कुठे आहे? राजने विचारले. डेक्कनला, पण राज तुला तिच्याकडे नाही जाता येणार, ती चाइल्ड स्पेशालिस्ट आहे, रीना म्हणाली. दुसऱ्या दिवशी राजने नेहाचे डेक्कन वरील क्लिनिक शोधले. नेहा तर चाईल्ड स्पेशालिस्ट, मग तिच्याकडे कसे जायचे? राज विचार करत होता.

सिग्नलपाशी मोगऱ्याचा गजरा विकणारा मुलगा पाय घसरून पडला आणि त्याच्या पायाला खरचटले. किती लागले याला! राज जोरात म्हणाला आणि याला डॉक्टरकडे घेऊन जातो म्हणत त्या मुलाला राजने पटकन उचलून घेतले आणि डॉक्टर नेहाकडे घेऊन गेला. याला खूप लागलंय, डॉक्टर आहेत ना? याला आत घेऊन जाऊ का? एका दमात राजने रिसेप्शनिस्टला विचारले. होकार मिळताच राज पटकन डॉक्टरच्या केबिनमध्ये शिरला आणि काय तो सुखद धक्का! एअरपोर्टवर दिसलेली ती सुंदर तरुणी म्हणजेच डॉक्टर नेहा होती. मलमपट्टी करता करता, अहो, किती थोडंसं लागलंय, एवढी धावपळ करायची काय गरज होती? डॉक्टरांनी आश्चर्याने विचारले. प्रथम त्या मुलाच्या साध्या आणि फाटलेल्या कपड्यांकडे बघत आणि त्यानंतर ब्रॅण्डेड कपडे घातलेल्या आणि रुबाबदार पर्सनॅलिटी असलेल्या राजकडे पाहत डॉक्टरांनी विचारले, हा तुमचा कोण? म्हटलं तर कोणीही नाही, राज म्हणाला. सिग्नल पाशी मी याला पडताना बघितले आणि घाईघाईने तुमच्याकडे घेऊन आलो. फी किती द्यायची? राजने विचारले. अहो तुम्ही एवढी समाजसेवा करतात मग काय पैसे घेणार मी तुमच्याकडून? डॉक्टर, फी नाही पण निदान हा मोगऱ्याचा गजरा तरी घ्या, धैर्य एकवटून राज म्हणाला. गजरा घेताना दोघांची दृष्टादृष्ट झाली आणि दोघेही गोड लाजलेत. डॉक्टर एक सांगू? राजने विचारले. बोला बोला काय सांगायचे ते सांगून टाका, नेहा म्हणाली. तुम्ही डॉक्टर होण्यापेक्षा गायिका बनायला हवे होते, तुमचा आवाज खूपच गोड आहे, राज म्हणाला. थँक्स फॉर कॉम्प्लिमेंट्स. मला वरदही नेहमी हेच म्हणत असतो, नेहा म्हणाली. हा वरद कोण? राजचा प्रश्न ओठातल्या ओठात. राज, उद्या माझ्या वाढदिवसानिमित्त एक पार्टी मी अॅरेंज केली आहे. तू नक्की ये, रीनाचा फोन आला. तू परवा चौकशी करत होतास ना ती डॉक्टर नेहा देखील येणार आहे. नेहा निळी साडी नेसणार आहे, तू पण बघ तुझ्याकडे निळा शर्ट असल्यास तोच घाल.

राज बराच आधी पोहोचला निळा शर्ट आणि राखाडी कलरची पँट घालून. डेकोरेशन मध्ये त्याने मनापासून मदत केली. सर्व काही अगदी व्यवस्थित झाले होते. सर तुम्ही इकडे कसे? मोठ्या आश्चर्याने निळी साडी परिधान करून आलेल्या नेहाने विचारले. म्हणजे तुम्ही एकमेकांना ओळखतात? रीनाने आश्चर्याने विचारले. रीना, अगं परवाच हे एका लहान मुलाला घेऊन आले होते माझ्या क्लिनिकमध्ये, तेव्हा भेटलो. राज तू आणि लहान मुलाला घेऊन? रीनाला आश्चर्य वाटले आणि तितकेच राजच्या चालाखीचे कौतुकही. ऑफिसच्या मित्रांच्या स्वागतासाठी रीना पुढे गेली. डॉक्टर, वरद सर आले नाहीत? राजने विचारले. वरद आय स्पेशालिस्ट आहे आणि तो दिल्लीला राहतो, नेहाने सांगितले. काय राज? मला सांगितले सुध्दा नाहीस नेहाला भेटल्याचे? मी सांगणारच होतो असे म्हणताना राज लाजला. वरद आणि नेहा एकत्र का राहत नाहीत? राजने विचारले. अरे व्वा, खूपच माहिती आहे तुला नेहाची! रीनाने राजला चिडविले. नेहा आवडलेली दिसते! पण हा वरद कोण असेच ना? काळजी करू नकोस, वरद हा नेहाचा मोठा भाऊ. पार्टी छान रंगली, रीनाने राजला गाणे म्हणण्याचा आग्रह केला. राजचे गाणे सर्वांना आवडले. वन्स मोर, वन्स मोर मागणी आली. वन्स मोर ऐवजी वन मोर असे म्हणत राजने एक द्वंद्व गीत सादर केले, नेहाच्या मदतीने. नेहा नाही म्हणत असताना देखील राजने तिचा हात धरून तिला स्टेजवर आणले. नेहा आणि राजची केमिस्ट्री खूपच छान जमली. मॅचिंग कपडे, सुंदर आवाज, रुबाबदार पर्सनॅलिटी. साहजिकच दोघेही कार्यक्रमाचा केंद्रबिंदू बनले. कार्यक्रम सुरू असताना नेहाने रीनाला एकटीला गाठले आणि विचारले हा राज तुझा कोण? कधी पासून ओळखतेस तू राजला? नेहा, तुला सिग्नल क्लियर आहे, राज माझा मावस भाऊ आहे. दोघीही खळखळून हसल्यात. तेव्हढ्यात राज तेथे आला. नेहा, राजने अमेरिकेत एम टेक केलेय आणि तिथेच काम करतो. रीना म्हणाली. मी तिथे खुप मोठ्या कंपनीत, अगदी छोट्या पोस्टवर आहे, सुटी घेऊन आलोय. नेहाला राजचा मोकळेपणा आवडला. आताशा नेहा आणि राजचे रीनाकडे येणे वाढले, बऱ्याचदा दोघे एकाच वेळी येऊ लागले. हा योगायोग होता की जाणून बुजून आणि ठरवून केलेला प्रयास? आता अहो संबोधनाची जागा ए ने घेतली होती. वाढदिवसाच्या दिवशी काढलेले फोटो छान आलेत आणि त्यातल्या त्यात नेहा आणि राजचे फोटो अप्रतिम आ-लेत. त्यांच्या गाण्याची व्हिडिओ क्लिप रीनाने तिच्या काही मित्रांना पाठविली. रीना, अगं माझी परत जाण्याची वेळ जवळ आली. मला परवा परत अमेरिकेला जायचेय. राजच्या आवाजात नाराजी होती. राज, नेहात जीव अडकतोय, खरे ना? रीनाने विचारले. मुक्काम थोडे दिवस वाढव, रीना म्हणाली. अग पण आई-बाबांना काय कारण सांगू? राजने विचारले. एवढेच ना? रीनाकडे प्रत्येक प्रश्नाचे उत्तर होते. पुढच्या आठवड्यात माझ्या बाबांचा ६१वा वाढदिवस साजरा करायचा आहे त्यासाठी म्हणून थांब आणि त्या कार्यक्रमाचे नियोजन तु आणि नेहाने करायचे. कशी वाटते माझी आयडिया? राज आणि नेहा मोठ्या उत्साहाने कामाला लागले आणि रीनाच्या बाबांच्या वाढदिवसाचा प्रोग्रॅम त्यांनी अतिशय व्यवस्थित प्लॅन केला. एकत्र येणे वाढले, मैत्री वाढली, प्रेम वाढले, भेटीतील गोडवा वाढला. द्वंद्व गीताची तयारी करण्यासाठी म्हणून दोघे एकमेकांच्या खूप जवळ आले. प्रोग्रॅम छान झाला, दोघांच्या गीतांना उपस्थितांकडुन खूप दाद मिळाली. २ दिवसांनी राजला परत जायचे होते. रीनाने राज आणि नेहा दोघांनाही तिच्या घरी बोलावले. आज राज आणि नेहा फारशा चांगल्या मूडमध्ये नव्हते. रीनाला बाय करून दोघेही जायला निघ-ाले. राज मला तुझ्याशी काही बोलायचे आहे असे म्हणत रीनाने राजला थांबविले. नेहा अगं लिफ्टने जा, जिना नुकताच धुतला आहे. तु हाय हिल्स वापरतेस, निसटलीस तर तुझ्यासाठी डॉक्टर शोधायला लागेल. नेहा ग्राउंड फ्लोअरला लिफ्ट मधून बाहेर पडणार तोच एका अवाढव्य माणसाने तीला लिफ्टमध्ये ढकलत, लिफ्टमध्ये प्रवेश केला. अहो काही मॅनर्स? नेहा चिडून म्हणाली. १ ल्या मजल्यावर बाहेर पडताना त्याने नेहालाही बाहेर ओढले. नेहा, घाबरू नकोस. तुला मी रीनाच्या घरीच नेतो आहे. तुम्ही मला आणि रीनाला कसे ओळखतात? नेहाला उत्तर मिळण्याच्या आतच ती आणि तो माणूस रीनाच्या घरात शिरलेत. या सर, या ना, तुमचे पाय माझ्या घराला लागलेत हे माझे भाग्यच! म्हणात रीनाने त्याचे स्वागत केले. हे सर मोठे प्रोड्युसर आहेत, तुमच्या गाण्याची व्हिडिओ क्लिप मी त्यांना पाठविली होती. तुमच्या द्वंद्व गीतांचा अल्बम त्यांना काढायचा आहे. त्यासंदर्भातच मी त्यांना येथे बोलावले आहे, रीनाने सांगितले. राज , नेहा तुम्ही आज आणि उद्या प्रॅक्टिस करा, नंतर ३ दिवस उटीला शुटींग करु. प्रोड्यूसर साहेब शूटिंगचे डिटेल्स सांगत होते. हे सर्व शक्य होईल जर राज आणि नेहा तुम्ही वेळ देऊ शकाल. काय राज आणि नेहा चालेल ना? राज कुणाशीतरी फोनवर बोलत होता. आम्हा दोघांनाही चालेल नेहा म्हणाली. नेहा, अगं राजशी बोलुन ठरवू या, रीना म्हणाली. मी मेसेज करुन त्याला विचारले, आम्हा दोघांनाही चालेल नेहा म्हणाली. नेहा तू आणि राजने मला चक्क बायपास केले, रीना लटक्या रागाने म्हणाली. सर, शूटिंगला मी देखील येणार रीना म्हणाली. रीना, मी या दोघांचे तिकीट बुक करायला आत्ताच सांगितले. म्हणजे सर, तुम्हीही मला बायपास केले, इति रीना.

आमच्याशी न बोलता तू अल्बम प्लॅन केलास म्हणजे बायपास ची सुरुव-ात तूच तर केलीस रीना, नेहा आणि राज एक सुरात म्हणालेत. आपण सर्वच बायपास झालोत. मग अल्बमला नांव बायपास द्यायचे का? प्रोडूसर साहेबांनी विचारले. मनसोक्त हसत आणि टाळ्या वाजवत सर्वांनी होकार दिला. मी अजून २ आठवडे पुण्याला राहणार आहे असे राज सांगेल तेव्हा नक्कीच आई बाबांना आश्चर्य वाटुन त्यांनाहीबायपास झाल्याचे जाणवेल. वरदला काहीच न सांगता नेहाची एवढी मोठी झेप! बायपास केल्याचा राग विसरून तो नक्कीच नेहाचे अभिनंदन करेल कारण नेहाने गायन करावे अशी त्याचीही इच्छा होती. या बायपासच्या चक्रात राज आणि नेहाने एकमेकांना केव्हा पास केले ते कोणालाही समजले नाही.

-दिलीप कजगांवकर
पुणे, ७७७००२५५९६

******

---

# माझे आरोग्य, माझा हक्क


जागतिक आरोग्य दिनाच्या निमित्ताने संपूर्ण जगाला आरोग्याचा संदेश देणाऱ्या जागतिक आरोग्य संघटनेने यावर्षीचे घोषवाक्य ठरविले आहे.. माझे आरोग्य माझा हक्क.

खरेच माझे आरोग्य उत्तम राखणे हा माझा हक्क आहे आणि हा हक्क मला मिळवून देणे हे शासनाचे धोरण आहे. रुग्णाचे आरोग्य उत्तम राखणे हा रुग्णाचा हक्क. आणि यासाठी रात्रंदिवस कार्यरत असणारा सार्वजनिक आरोग्य विभाग आणि त्यातील सर्व अधिकारी आणि कर्मचारी. या सर्वांवर आपल्या हक्कासाठी अधिकार गाजविणाऱ्या सर्वसामान्य नागरिकाला हा हक्क प्राप्त करताना स्वतः च्या कर्तव्याचे भान देखील ठेवले पाहिजे. सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत विविध राष्ट्रीय कार्यक्रमातून भारतातील आणि महाराष्ट्रातील जनतेसाठी निरनिराळ्या सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात. या सुविधांचा उपभोग घेत असताना रुग्ण व त्यांचे नातेवाईक यांनी कर्तव्याचे भान ठेवले पाहिजे. रुग्णाला सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत देण्यात येत असणाऱ्या सुविधा आणि या सुविधांचा लाभ प्राप्त करून घेताना रुग्ण व त्यांचे नातेवाईक यांनी ठेवायचे 'आरोग्यास्तव कर्तव्याचे भान' यावर केलेली एक कविता जागतिक आरोग्य दिनाला जोडून आलेल्या गुढीपाडव्याच्या शुभ मुहूर्तावर आपणा सर्वांना नूतन वर्षाच्या आणि जागतिक आरोग्य दिनाच्या शुभेच्छा सहित सप्रेम सादर करीत आहे.

**माझे आरोग्य -माझा हक्क**

**माझे आरोग्य - माझे कर्तव्य**
**गुढी उभारू आरोग्याची**
**हाती घेऊनी स्वहक्काची**
**मनी ठेवूनी जाण मित्रहो**
**नित्य आपुल्या कर्तव्याची .१.**
**अहर्निश रुग्णालय झटते**
**वसा घेऊनी रुग्णहिताचा**
**स्वच्छ ठेवू 'आरोग्यमंदिरा '**
**मूलमंत्र हा 'आरोग्याचा' .२.**
**औषध गोळ्या सुई सलाईन**
**हेच सत्य जाणी ' संजीवन '**
**नियमिततेने घ्यावे औषध**
**शतायुषी हे व्हाया जीवन .३.**
**सोनोग्राफी करू हक्काने**
**निदान करण्या गर्भवतीचे**
**लिंगनिदाना करू प्रतिबंधित**
**भान ठेवू ' स्त्रीभ्रूणहत्येचे ' .४.**
**'लोहयुक्त 'या खाऊनी गोळ्या**
**संस्थेतच ही प्रसूती व्हावी**
**मातेच्या सकस आहाराची**
**जबाबदारी आपण घ्यावी .५.**
**'सुदृढ बालक 'व्हाया आपुले**
**' लसीकरण ' हे करू नियमाने**
**'जागरूक पालक' होऊनी बनवू**
**कुटुंब छोटे नियोजनाने .६.**
**तिशीनंतर बीपी शुगर**
**करू तपासणी नियमित आपण**
**हृद् विकार मधुमेह नी कॅन्सर**
**स्वयत्नाने आणू नियंत्रण .७.**
**ताणतणावे ग्रासित ' मन ' हे**
**'योगाभ्यासे ' बनवू सक्षम**
**मानसिक आरोग्य राखूया**
**निदान उपचाराने उत्तम .८.**
**रुग्णालयी राखू ' गुणवत्ता '**
**'लक्ष्य' गाठूया रुग्णहिताचे**
**'कायाकल्प ' हा करुनी बनवू**
**मंदीर आपुल्या आरोग्याचे .९.**

**-डॉ.प्रसाद भंडारी**
**भावनाग्रज, अस्थिरोग तज्ञ वर्ग १ , जिल्हा रुग्णालय ठाणे.**





सौ.सुमती पवार
मो.९७६३६०५६४२

गाव माझे सुंदर

# कापडणे
# असे होते व्यवस्थापन

हे लिहिण्यापूर्वी मला ही वाटले नव्हते की माझ्या मनाच्या तळाशी इतक्या गोष्टी साचून पडून आहेत.जसजशी लिहिते आहे तस तसे मला ही आश्चर्य वाटते आहे.आज शिकलेल्या लोकांकडे मॅनेजमेंट इव्हेंट नावाचा प्रकार असतो. त्या साठी खास प्रशिक्षित लोक असतात. मला नवल वाटते माझ्या लहानपणी दोन अडाणी, (शाळेत न गेलेल्या विधवा बायका आमच्या अर्ध्या गावातील कापूस वेचणी पासून सर्वच गोष्टींचे इव्हेंट मॅनेजमेंट करत होत्या हे कुणाला सांगूनही खरे वाटणार नाही.

पूर्वी लग्नाचे वय नऊ ते अकरा. अकराची ही घोडनवरी ठरत असे.बाल मृत्युचे प्रमाणही लक्षणिय होते.त्यातून पटकी कॉलरा मलेरिया देवी प्लेग यांचे थैमान चालू असे.अक्षरश: प्रेतं पोहोचवायलाही माणसं मिळत नसत इतक्या वेगात कॉलरात माणसे मरत असत. मला आठवते, एकदा मी लहान असतांना आमच्या घरी घाई घाईत माणसे आली व म्हणाली.. भाऊ भाऊ चला लवकर, हगवणीने माणसे मरत आहेत.वडिलांनी घाई घाई कपडे केले नि निघाले. शाळेत बरेच लोक जमा केले. पटापट खाटा बोलावल्या व रूग्ण दाखल होऊ लागले. गावातले डॉक्टर होतेच पण भाऊंनी धुळ्याहून सिव्हिल मधून डॉक्टर्स व नर्सेसची टीम बोलावली व भराभर रूग्णांवर उपचार सुरू झाले. अशा वेळी गावात कोलाहल माजून एकच हल्लाकल्लोळ उठत असे. भाऊ हाच एक आधार लोकांना उरत असे. वडिलांचे व्यक्तिमत्व व कामाचा झपाटा एवढा जबरदस्त होता की पटापट यंत्रणा हलत असे. बरीच पडझड होऊन कॉलरा परतत असे. रूग्णाच्या पोटातले पाणी कमी होऊन रूग्ण मान टाकून गतप्राण होत असे त्यामुळे अडाणी गांवकरी व स्त्रिया या साथीला मानमोडी उनी असे म्हणत असत.एवढी सगळी मॅनेजमेंट वडिल एकटे सक्षमपणे यंत्रणा राबवत बघत असत.जणू गावाचा देवदूत म्हणून त्यांचा वावर असे.साक्षात परमेश्वरच म्हणाना! एवढे गांवकरी त्यांच्यावर विसंबून असत.काही ही झाले की चला भाऊंकडे!

ही झाली वडिलांची मॅनेजमेंट पण मघाशी मी वर म्हटल्या प्रमाणे दोन बालविधवा आत्या त्याही, शाळेत न गेलेल्या(पण अनुभव व कठोर सामाजिक वास्तवात भाजून निघालेल्या) दोघी शेतातील कापूस वेचणी पासून ते निंदणी पर्यंत साऱ्या कामांची इव्हेंट मॅनेजमेंट या दोघी विधवा महिला सांभाळत होत्या. म्हणजे उद्या आम्हाला कापूस वेचणीला दहा बायका हव्या असतील तर मी संध्याकाळी जाऊन सांगत असे, उद्या भाऊंकडे कपाशी वेचायला दहा बायका हव्या. तर बरोबर दहा बायका आमच्या शेताच्या रस्त्याला लागायच्या व शेतात पोहोचायच्या.आणि अशा अनेक शेतांवर बायका रवाना व्हायच्या. आणि एक आठवड्या नंतर सर्व महिला आत्याच्या घरी जमून त्या सर्वांचा हिशोब होऊन प्रत्येकीचा आठवड्याचा पगार मिळायचा. अनुभवाच्या व व्यवहाराच्या शाळेत शिक्षण लागत नाही व त्यांचे काही अडतही नाही. माझा शाळेचं तोंड न पाहिलेला ड्रायव्हर पैशांचा हिशोब मी चुकते पण तो चुकत नाही.तशाच या बायका प्रत्येकीचा हिशोब करून तेवढे रूपये त्यांना बरोबर देत असत. एक दिवस आमच्याकडील पैसे घेऊन मी तिथे हजर होते व सर्व गंमत पाहिली होती. जोडीला एक थोडे लिहिता वाचता येणारी बाई बसलेली असे व कोणाला किती पैसे दिले तेवढे ती लिहून घेत असे. म्हणजे दिलेले पैसे तरी लक्षात ठेवायला नकोत. त्या काळी अकाली विधवा होऊन मुली भावाकडे रहात असत. पुनर्विवाहाची सोयच नव्हती. तो विचारच नव्हता. उभे आयुष्य असे काढायचे. विधुराने मात्र तेराव्या दिवशी बोहोल्यावर उभे रहायचे.

पुरूषप्रधान संस्कृतीत स्त्रियांच्या बाबतीत समाज इतका कठोर का होता? हे मला न उलगडणारे कोडे आहे. केवळ दास्यत्व वा दासी म्हणून व केवळ एक भोग्यवस्तू एवढीच स्त्रिची किंमत का होती? का तिला इतका जांच व खालचा दर्जा होता. वास्तविक वयात आल्या पासून स्त्रियांना अनेक नकोशा समस्यांचा सामना करावा लागतो. पण प्राक्तन म्हणून तिने हे सारे स्वीकारल्यानंतर थोडी तरी सहानुभूतीची नजर ? छे! ते तर दुरच पण किमान मन असलेला माणूस म्हणूनही तिचा कधी विचार झाला नाही किंबहुना टिळकांनी उघड्या डोळ्यांनी पाहून डोळ्यावर कातडे ओढून मूग गिळून बसले व या प्रश्नावर कधी तोंडतर उघडले नाहीच पण जाणिवपुर्वक दुर्लक्ष केले की काय अशीही शंका यावी इतपत ही मंडळी बेफिकिरीने वागली, ह्याला काय म्हणावे? घरोघर खेडोपाडी स्त्रियांची स्थिती अत्यंत दयनिय होती. कापडणे ही याला अपवाद नव्हते. बऱ्याच घरात बालविधवा होत्या व अशी कामे शेतीवाडी दळणकांडण अंगावर घेऊन माहेरी दिवस कंठत होत्या. अर्थात नवरा-तरी माहेरी दिवस काढणे सोपे का आहे? आणि भावजयीलाही आपल्या संसारात कायमची अडचण नकोच असते. तिचीही बाजू बरोबरच असते ना? काही काही घरात अत्यंत वाईट सासवा मी पाहिल्या ज्यांनी सुनांनी नांदूच दिले नाही अशा ही केसेस खूप आहेत.माझ्या सासूने मला त्रास दिला ना? मग हिला कसे सुखात राहू द्यायचे? दिवसाकाठी सुनेला मार बसला की त्यांचा आत्मा शांत होत असे. ह्या विधवांही दिवस काढत असत बिचाऱ्या, शेतात निंदणी खुरपणीला जाऊन मदत करत असत.ह्या ज्या मजुरांचे व्यवस्थापन बघणाऱ्या आत्या होत्या त्यांना मात्र व्यवस्थापनाचे पैसे मिळत असत,

प्रत्यक्ष शेतात कामावर न जाता. कारण त्यांना मजुर वाटपाचे मोठे काम असे.आणि त्या शेतावर व्हिजिटलाही जात असत. ह्या दोन आत्यांपैकी एक आत्या मोठी गमतीशीर होती मात्र.अतिशय खानदानी असलेल्या या बायकांची मुलेबाळे व्यवस्थित होती. त्यांना घरातही मान होता कारण लहान वयातच नवरा गेल्यानंतर मोठ्या कष्टातून एकट्याने त्यांनी मुलांना मार्गी ही काही फार सुख देत होता अशातला भाग नव्हता. वरून सासवा नणंदांचा जाच होताच. कसलं नशिब घेऊन येतात हो बायका?

आमचे लग्न १९६८ ला झाले. बघा त्या वेळी सुद्धा आमच्या शेजारी दोन कुटुंबात बायकांना अमानुष मारझोड होत असे. शेजारून आवाज आला की माझा जीव पाणी पाणी होत असे. (एकदा फार वर्षांनंतर एका लग्नात ते शेजारचे गृहस्थ भेटल्यावर इतक्या वर्षांनी सुद्धा तो विषय काढून मी त्यांना फटकारलेच, हो आता माझी भीड चेपली होती ना? काही बोलले नाही ते, गप्प बसले).पण मी पडले नविनच लग्न होऊन माजघरात वावरणारी सुन, मी काय करू शकणार होते?

मोठेच कानाडोळा करत त्यात मी तर नविनच! असे सामाजिक वास्तव इतक्या उशिराही होते तर बघा जुन्याकाळी काय स्थिती असेल? खरे तर स्त्रियाच स्त्रियांच्या जास्त शत्रू होत्या व आजही आहेत ही वस्तुस्थिती नाकारून चालणार नाही.त्या सुनेची सासू मुलगा सुनेला मारत असतांनाही आवरत नसे, पेटवत असे. शेजारी पाजारी मिरवत असे.सुनेकडून दिवसभर ढोर मेहनतीचे काम करवून घेत असे. जाऊ द्या, मॅनेजमेंट इव्हेंटवरून विषय निघाला पण हे ही बोलायलाच हवे ना? मी काय बघितले ते! तर त्या दोन्ही आत्यांनी फार वर्षे हे काम केले. ते ही बरेच झाले ना? दिवस कामात गुंतुन राहिल्यामुळे वेळ ही छान गेला नि त्या कुणावर भार झाल्या नाहित ! एरव्ही भाऊ किती ही चांगला असला लावले होते.त्या मुळे घरात त्यांचा शब्द प्रमाण होता व समाजातही त्यांना खूप आदराचे स्थान होते. त्यांना ताई, बायजा या नावाने संबोधले जात असे.काही काम नसेल तेव्हा ही आत्या नकला खूप छान करत असे.विशेष म्हणजे दुपारी पुरूष माणसे घरात नसतांना पुरूषी वेषात ह्या नकला होत असत. त्या मुळे धम्माल होत असे. मी लहान असल्यामुळे मला फार काही समजत नव्हते तरी जी गंमत व हास्य कल्लोळ चालत असे त्या वरून कळते की त्या आजुबाजुच्याच लोकांच्या नकला असाव्यात.घरभर धुमाकुळ व बघ्यांची गर्दी असे. नाही तरी पूर्वी मनोरंजनाची साधने कुठे होती? कीर्तन भजन कलापथके तमाशा अशीच साधने होती फक्त. आमच्या घरी रेडिओ येण्यापूर्वी वडिलांनी ग्रामोफोन आणला होता. त्या चौकोनी आकाराच्या ग्रामोफोनला हिज मास्टर्स व्हॉईसचे चित्र व कान लावून गाणे ऐकणाऱ्या कुत्र्याचे चित्र लावलेले मोठे मजेशिर दिसत असे.एक गोल काळी बांगडी, काळ्या रंगाची, त्याच्यावर सुई असलेला वाकडा दांडा टेकवला की व हॅन्डलने हवा भरली की गाणे वाजायला सुरूवात व्हायची. जुनी गाणी, सैगलच्या काळातील, लोकांना खूप आवडत असत. राज कुमारी, टुणटुण, गीता दत्त,रफी अशा गायकांच्या त्या कॅसेट होत्या. मला त्या वेळी ऐकलेलेराधा ना बोले ना बोले ना बोले रे हे गाणे चांगलेच आठवते.त्यातला तबला मी आज मोठा आवाज करून मुद्दाम ऐकते. मी चवथी पाचवित असेन तेव्हा आम्ही शिवण शिकवणाऱ्या बाईंकडे जात असू तेव्हा हे गाणं समोरच्या घरात तेव्हा मोठ्याने वाजतांना आम्हाला ऐकू येत असे. धुळ्याला राहणारी ती मंडळी होती, बोरसे मला वाटते.मला मी त्या बाईंच्या ओट्यावर नव्या कापड्याच्या तुकड्यावर हेम टीप घालतांना व त्याच वेळी समोरच्या घरातून जाळीच्या दारातून ह्या गाण्याचे बोल ऐकतांना आता ही डोळ्यांसमोर स्पष्ट दिसते.

असा एकूणच सुखाचा व शांततेचा तो काळ होता असे म्हणायला काहीच हरकत नाही. गाणी इतकी दुर्मिळ होती की जीवाचा कान करून आम्ही ऐकायचो. कधीतरी मी धुळ्याला गेले की आग्रा रोडला कहीं दीप जले कहीं दिल चे लताचे आर्त सूर कानावर पडत. मला माहित नाही का? पण मला लहानपणापासूनच गाण्याचा कान आहे. त्या मुळे जीवाचे कान करून ते स्वर मी ऐकायचे इतक्या लहानपणी! आज ही तितक्याच तन्मयतेने ते गाणे मी ऐकते.ह्या गाण्याच्या आधी लताचा आवाज खोकल्यामुळे खराब होता असे म्हणतात. तरी खूप वेळा गाऊनही त्यांचे समाधान होत नसल्या मुळे खूप रिटेक झाले व एका रिटेकलाच संगीतकाराने ते फायनल करून टाकले असे ते माझे आवडते गाणे आजही तेवढेच आवडते आहे.खूप गप्पा माराव्याशा वाटतात तुमच्याशी..! जाऊ मग आता? भेटू पुढच्या रविवारी, आपला महाराष्ट्र मध्ये! धन्यवाद मंडळी..

# अन् पुतळा बोलू लागला....

(पान ३ वरुन) मी असाच सायंकाळी याच विचारात असताना अहो,आज तुम्ही कसल्यातरी विचारात दिसताय.काय आणि कसला विचार करताय तुम्ही एवढा ? मला सांगा तरी काही. मी मघापासून बघतेय तुमचा चिंतातूर चेहरा.तुम्ही काहीच का बोलत नाहीत?

तिचं हे बोलणं ऐकूनही मी काहीच बोलत नाही हे पाहून तिनं मला परत विचारल्यावर अगं सावित्री हे बघ मी मुलींसाठी सुरू केलेल्या शाळेतील मुलींची संख्या वाढत आहे. पुढे इतक्या साऱ्या मुलींना कोण शिकवणार ? याचीच काळजी वाटतेय बघ मला. तू शिकवणार का मुलींना ? यावर हं काहीतरीच तुमचं.मी शिकलेली नाही हे तुम्हाला चांगलंच ठाऊक आहे.अन मग तरीही तुम्ही असं का विचारताय मला ? अगं सावित्री,हे बघ मी तुला आधी मुळाक्षरं,बाराखडी,अंक हे सारं काही शिकवेन आणि मग तुझं शिकून झाल्यावर तू मुलींना शिकवायचं. असं मी तिला सांगितल्यावर तीनं लागलीच स्वत: शिकण्याची तयारी दाखवली.अन मग दुसऱ्या दिवसापासून मी सावित्रीला शिकवायला सुरुवात केली. तीचं शिकून झाल्यावर ती मुलींना शिकवण्यासाठी शाळेत जावू लागली. तीचं हे मुलींना शिकवणं काही कर्मठ लोकांना सहन होत नसल्यामुळे ती शाळेत जात असतांना रस्त्यात गाठून ते तीला अचकट विचकट बोलत असत.पण ती त्याकडे दुर्लक्ष करीत असे.हे पाहून मग ते तिच्या अंगावर शेणगोळे, दगडगोटे यांचा मारा करू लागले. तेही ती सहन करुन तुम्ही माझ्या अंगावर शेणगोळे, दगडगोटे फेकत नसून जणू फुलंच उधळीत आहात असंच मला वाटतय.कारण मी तुमच्या आणि माझ्या भगिनींना शिकवण्याचं काम करतेय. असं नम्रपणे सांगून शिकवण्याचं कार्य तीनं सुरुच ठेवलं होतं बघ. तिला अधिक त्रास होवू लागल्यावर शाळेत जाताना ती एका पिशवीत एक लुगडं सोबत घेवून जावू लागली. शेणगोळ्यांनी माखलेलं लुगडं शाळेत बदलवून सोबत आणलेलं लुगडं नेसून मुलींना शिकवण्याचं काम झाल्यावर परत खराब झालेलं लुगडं नेसून ती घरी जात असे.एवढा महतत्रास सहन करुनही तीनं शिकवण्याचं काम सुरुच ठेवलं होत. हो ना ज्योतिबा तुम्ही सुरू केलेल्या शिक्षण कार्यास हातभार लावून,स्त्री शिक्षणाची शारदा होवून विद्यादानाचं हे पवित्र कार्य सावित्रीबाईंनी केल्यामुळेच आजची स्त्री चूल अन मूल ही संसारातील संयुक्त अशी जबाबदारी उत्तम प्रकारे सांभाळूनही सर्वच क्षेत्रात अग्रेसर आहे. हो गं ताई.मला याबद्दल तिचा सार्थ अभिमान आहे आणि म्हणूनच ' एक पुरुष शिकला तर तो एकटाच शहाणा होतो पण एक स्त्री शिकली तर संपुर्ण कुटुंब शहाणं होतं.' हा माझा विचारही मी सार्थपणे पूर्ण करु शकलो. अशा प्रकारे मानवमाता साक्षर केल्यानंतर मला शुद्रांची चिंता भासल्यामुळे साऱ्या मानवधर्माला साक्षर करण्याची प्रतिज्ञा मी माझ्या मनाशी करून सन १८५२ ला नानापेठेत शाळा सुरू केली. त्यामुळे साऱ्याच पददलितांना आनंद झाला. इतकंच नाही तर यानंतर मी अस्पृश्य मुलींसाठीही शाळा सुरू केली.अगं ताई, 'पाणी म्हणजे जीवन ' हे ठाऊक असूनही स्पृश्य-अस्पृश्य भेदामुळे लोकांना दारोदार फिरुनही पाणी मिळत नव्हतं आणि मिळालंच तर ते अतिशय तुच्छतेनं मिळत असे.हे पाहून मी माझा स्वत:चा पाण्याचा हौद सर्वांसाठी खुला करुन मानवधर्म जोपासण्याचं कार्य केलं.दीनदलीतांना सर्व दृष्टीने चालना मिळावी म्हणून मी नवे विचार माझ्या ' दिनबंधू ' या वृत्त पत्रामधून व्यक्त केलेत.शेतकरी बंधुंसाठी राष्ट्रीय सभेत जनजागृती केली.माझ्या कार्यामुळे पुढे कर्मवीर शिंदे यांनी मला ' जनतेचा जागा शेर ' म्हणून गौरविले. यानंतर महत्वाचं सांगायचं म्हणजे अनेक अनाथ बालकांचा सांभाळ करून वात्सल्य सागरातील एक छोटासा बिंदू होण्याचाही मी प्रयत्न केला. या कार्यात सुद्धा मला माझ्या सावित्रीने पुरेपूर आणि मोलाचं सहकार्य केल्यामुळे आम्ही माय-बाप होण्याचं सदभाग्य आम्हाला लाभलं. पण आमचं हे कार्य ही काही लोकांना सहन होत नसल्यामुळे त्यांच्याकडून तर मला ठार मारण्याचा कट ही रचण्यात आला होता. एके रात्री बाहेर नीरव शांतता असतांना हातात पाजळलेल्या फरशा घेवून दाराआड उभे असलेल्या मारेकऱ्यांची अस्पष्ट छाया मला दिसल्यावर ' कोण तुम्ही ? इथं का आलात ? ' असं मी त्यांना विचारल्यावर आम्ही खुनी.तुमचा खून करण्यासाठी इथं आलोत. असं त्याचं बोलणं ऐकून मला ठार मारून तुम्हाला काही लाभ होणार असेल, तुमचं भलं होणार असेल तर मग मला खुशाल मारा.पण त्या आधी तुम्हाला माझी एक विनंती आहे की,मी गेल्यावर या साऱ्या अनाथ बालकांचा सांभाळ तुम्ही करा.असं म्हणत मी दिव्याची वात पुढे करताच दिव्याचा उजेड खोलीभर पसरला आणि साऱ्या अनाथ बालकांना सांभाळण्याचं मुर्तिमंत वात्सल्यदर्शन मारेकऱ्यांना घडताक्षणीच त्यांच्या हातातील पाजळलेल्या फरशा आपोआप खाली गळून पडल्यामुळे त्या मारेकऱ्यांनी माझ्यासमोर हात जोडून तुम्ही अनाथांचे नाथ आहात. आम्ही चुकलो.आम्हाला क्षमा करा. असं म्हणत माझी क्षमा मागून मला आलिंगन ही दिले. आणि मग पुढे या मारेकऱ्यांनाही शिकवण्याचे काम मी पूर्ण केले. ज्योतिबांचं हे बोलणं ऐकून माझ्या अंगावर काटे आलेत.स्वत:ला ठार मारण्यासाठी आलेल्या मारेकऱ्यांनाही आपलेसे करुन त्यांना शिकवण्याचं महान कार्यही महात्मा फुलेंनी केलय.या विचारांनी मी अवाक झाले. डोळे मिटून मी शांत बसले असता या महान महात्म्याकडून अजुनही त्यांचं काही कार्य ऐकत रहावसं वाटत असतांनाच बागेचा माळी आणि रखवालदार दोघंही मोठ्यानं बोलत पुतळ्याकडे आलेत. मला बाकावर पाहून मॅडम,आज तुम्ही बागेत फिरलाच नाहीत.आल्या पासून इथंच बसलेल्या आहात. बाग बंद करण्याची वेळ झालीय मॅडम आता. अजून किती वेळ थांबणार आहात आपण ? असं त्यांनी विचारलं असता अरे हरी,सदा आता निघणारच होते रे मी घरी जाण्यासाठी. हे बघा,आज ११एप्रिल. या महान महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती आहे आज.यांनी मोठ्या कष्टानं,विचारानं सर्वच क्षेत्रात खूप मोठी क्रांती करून साऱ्या मानवधर्माला समता-बंधुता आणि एकतेची शिकवण दिलेली आहे.हे आपण सदैव लक्षात ठेवलं पाहिजे. हो मॅडम अगदी बरोबर आहे तुमचं म्हणणं. असं त्या दोघांनी म्हटल्यावर आम्ही तिघांनी क्रांतीसूर्याच्या पुतळ्याला अभिवादन केलं आणि घरी जाण्यासाठी बागेच्या बाहेर पडलो.



विकास कपोले
मो.९४०३४२५७७७

पिवळे पान-नवे भान

# आनंदाची साठी

वयाच्या ४५/५५/६५ नंतरचा काळ आनंदात घालवायचा असेल तर..त्यासाठी १२ नियम तयार केले आहेत. हे नियम तयार करत असताना अनेक मंडळींची मदत झाली आहे. यातील काही नियम आपल्याला ठाऊक असतील. काही नवीन असतील. तर काही नियम कशाला महत्व द्यावे हे सांगणारे असतील.

हे नियम सगळ्यांनीच नीट वाचावेत, लक्षात ठेवावेत व आचरणात आणण्याचा प्रयत्न करावा.

१) तुम्ही आत्तापर्यंत कष्ट, मेहेनत व काटकसर करून जे काही पैसे वाचवले आहेत किंवा गाठी मारले आहेत त्याचा उपभोग घेण्याची वेळ आता येऊन ठेपली आहे. है पैसे मुलाबाळांसाठी, नातवंडांसाठी मागे ठेवण्याएवढा दुसरा मोठा धोका नाही. कारण यांना तुम्ही हा पैसा गोळा करण्यासाठी किती कष्ट घेतले आहेत याची काहीच किंमत किंवा जाणीव नसते.✻

धोक्याची सूचना:- ही वेळ कोणत्याही प्रकारच्या गुंतवणूकीसाठी पण योग्य नाही. मग गुंतवणूकीची योजना कितीही भव्य-दिव्य, आकर्षक किंवा 'फुल फ्रूफ' असो. त्यामूळे कदाचीत तुमच्या समस्या व टेन्शन्स वाढायची शक्यता आहे. तुम्हाला टेन्शन विरहीत व शांतपणे आयुष्य जगायचे आहे हे विसरू नका. त्यामूळे या वयात गुंतवणुक करू नये.

२) तुम्ही तुमच्या मुलाबाळांच्या किंवा नातवंडांच्या आर्थिक परिस्थितीची अजीबात चिंता करू नका. तुमचे पैसे स्वतःसाठी खर्च करायला मुळीच कमीपणा मानू नका. तुम्ही तुमच्या मुलाबाळांना इतकी वर्षे संभाळले, त्यांना अन्न-वस्त्र-निवारा दिलात. चांगले शिक्षण दिलेत. आता त्यांना लागणारे पैसे त्यांना कमवू द्यात.

३) आपले आरोग्य चांगले कसे राहील याची काळजी घेत चला. यासाठी झेपेल एवढाच व्यायाम नियमीतपणे करा. उगीचच्या उगीच जिमला जाणे, तासंतास पळणे, तासंतास योगासने करणे किंवा प्राणायाम करणे यासाखे अघोरी व्यायाम करू नका. चांगले खा, भरपूर झोप काढा. नियमीतपणे वैद्यकीय तपासणी करून घेत चला व आपल्या डॉक्टरच्या संपर्कात रहा. तसेच आपल्याला लागणारी नियमीत औषधे सतत जवळ बाळगत चला. कारण नसताना डॉक्टर्सच्या जाळ्यात अडकू नका किंवा औषधांच्या व्यसनात गुरफटू नका.✻

४) तुमच्या जोडीदाराची काळजी घेत चला. त्यांच्यासाठी उत्तमोत्तम वस्तु व प्रेझेन्ट्स आणत जा. कारण एक ना एक दिवस तुमच्यातील एकजण आधी जाणार आहे याची जाणीव ठेवा. हाती असलेला पैसा दोघांनी मिळून इन्जॉय करा. कारण एकट्याने पैसा इन्जॉय करणे कठीण असते.

५) छोट्या छोट्या गोष्टींवरून उगीच डोक्याला त्रास करून घेऊ नका. तुम्ही आयुष्यात पुष्कळ उन्हाळे पावसाळे बघीतले आहेत. तुमच्या मनात काही सुखी आठवणी आहेत तर काही दु:खी, मनाला यातना देणार्या आठवणी पण आहेत. पण लक्षात ठेवा, तुमचा 'आज' सर्वात महत्वाचा आहे. त्यामूळे भूतकाळातील वाईट आठवणींमूळे, तसेच भविष्यकाळातील चिंतेमुळे तुमचा 'आज' खराब होऊ देऊ नका. छोट्या छोट्या गोष्टी आपोआप सरळ होतील.

६) तुमचे वय काहिही असो, प्रेम करायला शिका. तुमचा जोडीदार, तुमचे कुटुंब, तुमचे शेजारी, तुमचे आयुष्य यावर प्रेम करायला लागा. लक्षात ठेवा जोपर्यंत माणसाची बुद्धी शाबूत असते व मनात प्रेमाचा ओलावा असतो तोपर्यंत माणूस वृद्ध होत नसतो.

७) स्वत:विषयी अभीमान बाळगा. तो अंतरबाह्य असुदे. वेळच्यावेळी कटींग सलूनमध्ये जाऊन केस कापून घ्या. डेन्टिस्टकडे जा. आवडत्या पावडरी, पर्फ्युम्स वापरायला संकोच करू नका. कपडे निटनेटके ठेवा. बाहेरून तुम्ही जितके चांगले रहाल तेवढे आतून समाधानी असाल.

८) तुम्हाला फॅशन करायची असेल तर खुषाल करा. वृद्ध मंडळींसाठी नवीन फॅशन्स काय आहेत हे जाणून घेण्याचा प्रयत्न करा. तुम्ही थोडे फॅशनेबल राहिलात तर तरुणांना सुद्धा आवडाल.

९) आपले ज्ञान व माहिती अद्ययावत ठेवा. वर्तमानपत्रे वाचत जा. टि. व्ही. वरील बातम्या बघत जा. सोशल नेटवर्कींग साइटचे सभासद व्हा. तुम्हाला कदाचीत तुमचे जुने मित्र किंवा मैत्रीणी परत भेटतील. कनेक्टेड रहा. यामधे पण मोठा आनंद आहे.

१०) तरुणांचा व त्यांच्या मतांचा आदर करा. कदाचीत तुमच्या व त्यांच्या विचारात फरक असू शकेल. पण तेच उद्याचे भविष्य आहेत. त्यांना सल्ला द्या, मार्गदर्शन करा आणि ते सुद्धा त्यांनी मागीतले तरच. उगीच च्या उगीच त्यांचेवर टिका करू नका किंवा त्यांचे दोष काढत बसू नका. कालच्या शहाणपणाला आजच्या जगातही तेवढेच महत्व आहे याची त्यांना जाणीव करून देत चला.

११) 'आमच्या वेळी असे होते, आमच्यावेळी तसे होते' असे शब्दप्रयोग अजीबात करू नका. कारण तुमची वेळ आत्ताची आहे, कालची नव्हे. त्यामूळे काल काय घडले हे सतत तोंडावर फेकून मारत जाऊ नका. आत्ताचे आयुष्य आनंदात कसे घालवायचे याचा विचार करा.

१२) बहुतेक मंडळी वृद्धत्व आले म्हणून रडत बसतात. फारच थोडी मंडळी वृद्धत्वाचा आनंदाने स्विकार करतात. आयुष्य फार छोटे आहे. त्यामूळे असे करू नका. नेहमी आनंदी लोकांच्या संगतीत रहाण्याचा प्रयत्न करा. त्यामूळे तुम्हालाही आनंद वाटेल. निराश, दु:खी, रड्या लोकांपासून दूर रहा. लक्षात ठेवा दु:खी व रडी माणसे कोणालाच आवडत नसतात. आनंदी व चिअरफूल माणसेच लोकांना आवडत असतात..

**(संकलित लेख)**





नरेंद्र नेरपगार (CA)

अर्थवेध

# हिंदू अविभक्त कुटुंब (HUF) म्हणजे काय? व त्याची आयकर गणना

पूर्वीपासूनच भारतात एकत्र कुटुंब पद्धती अस्तित्वात आहे. एकत्र कुटुंब पद्धतीत व्यवसाय सुद्धा केला जात असतो किंवा कुटुंबाच्या नावाने स्थावर मालमत्ता किंवा गुंतवणूक देखील असते. त्या व्यवसाय, मालमत्ता किंवा गुंतवणुकीतून येणारे उत्पन्न हे कुटुंबातील कोणत्या एका सदस्याचे किंवा व्यक्तीचे नसते तर ते संपूर्ण कुटुंबाचे असते. त्यामुळे असे उत्पन्न एका व्यक्तीच्या उत्पन्नात गृहीत धरून त्यावर आयकर लावणे योग्य ठरणार नाही. त्यामुळे आयकर कायद्याने १९२२ पासून ब्रिटिश कॉलोनीयल नियमांतर्गत हिंदू अविभक्त कुटुंबाला वेगळा करदात्याचा दर्जा दिला. त्यानंतर आयकर कायदा १९६१ मध्ये देखील हिंदू अविभक्त कुटुंबाला स्वतंत्र अस्तित्व देण्यात आले आहे. त्यानुसार हिंदू अविभक्त कुटुंबाने मिळवलेले उत्पन्न हे हिंदू अविभक्त कुटुंबाच्या उत्पन्नातच करगणना करण्यासाठी ग्राह्य धरले जाईल. त्याला कुटुंबातील कोणत्याही सदस्याच्या उत्पन्नात ग्राह्य धरले जाणार नाही व कुटुंबातील सदस्याच्या वैयक्तिक करगणनेवर त्याचा परिणाम होणार नाही.

आयकर कायदा १९६१ नुसार आयकर लावताना करदात्यांचे विभाजन हे सात स्वरूपात केले जाते ते म्हणजे वैयक्तिक करदाता, भागीदारी संस्था, कंपनी, व्यक्तींचा समूह किंवा गट किंवा ट्रस्ट, हिंदू अविभक्त कुटुंब, कृत्रिम न्याय संस्था आणि स्थानिक प्रशासन वरील गटात हिंदू अविभक्त कुटुंबाला वेगळ्या करदात्याचा दर्जा देण्यात आलेला आहे. त्याला वैयक्तिक सदस्यांव्यतिरिक्त एक वेगळा करदाता मानला जातो. त्यामुळे हिंदू अविभक्त कुटुंबाच्या नावाने वेगळे पॅन कार्ड असते. व बँक अकाउंट देखील वेगळे असते. आयकर कायद्याची मूलभूत सूट मर्यादा हिंदू अविभक्त कुटुंबाला देखील वेगळी असते. म्हणजेच जसे व्यक्तीला अडीच लाखापर्यंत उत्पन्नावर आयकर लावला जात नाही त्याचप्रमाणे हिंदू अविभक्त कुटुंबाला देखील अडीच लाखापर्यंत उत्पन्नावर आयकर लावला जात नाही इतर वजावटी ज्या काही वैयक्तिक करदात्याला मिळतात त्या सर्व हिंदू अविभक्त कुटुंबाला देखील मिळत असतात. हिंदू अविभक्त कुटुंबाच्या मुख्य व्यक्तीला कर्ता असे म्हटले जाते साधारणता कुटुंबातील जेष्ठ पुरुष हा हिंदू अविभक्त कुटुंबाचा कर्ता असतो. तो या हिंदू अविभक्त कुटुंबाचा मुख्य मानला जातो परंतु हिंदू अविभक्त कुटुंबातील इतर सदस्यांना देखील सर्व अधिकार असतात. जेव्हा वडिलांचा दुर्दैवाने मृत्यू होतो आणि तिला भाऊ नसतो तेव्हा स्त्री देखील कर्ता असू शकते. त्या स्थितीत मुलगी किंवा आई कर्ता असू शकते.

हिंदू अविभक्त कुटुंब (HUF) तयार करण्यासाठी तुम्हाला ज्या अटी पूर्ण कराव्या लागतील त्या येथे आहेत-

हिंदू अविभक्त कुटुंब (HUF) तयार करण्यासाठी सर्व कुटुंब लागत असते एक व्यक्ती एच यु एफ तयार करू शकत नाही.

विवाह झाल्यावर ते कुटुंब हिंदू अविभक्त कुटुंब (HUF) तयार करण्यास पात्र होते शंभर रुपयांच्या स्टॅम्प पेपरवर एच यु एफ डीड तयार करून घ्यावा लागतो.

हिंदू अविभक्त कुटुंबा (HUF) मध्ये सामान्यता, पूर्वज, वंशज, अविवाहित मुली आणि मुले त्यांच्या बायका यांचा समावेश होतो.

क्ष्ग्ऋ हिंदू, शीख, जैन आणि बौद्ध धर्मातील लोक देखील तयार करू शकतात.

हिंदू अविभक्त कुटुंबाचा (HUF) डिड तयार झाल्यानंतर पॅन कार्ड, बँक खाते हे सर्व ओपन करू शकतात. आणि एच यु एफ (HUF) मध्ये व्यवसाय करू शकतात.

HUF (एच यु एफ) मध्ये प्रत्येक सदस्य त्याच्या उत्पन्नातून कॉर्पस म्हणजेच भांडवल जमा करू शकतात.

कुटुंबातील व्यक्तीच्या वैयक्तिक कलेने मिळवलेले उत्पन्न हे हिंदू अविभक्त कुटुंबातील उत्पन्नात ग्राह्य धरले जात नाहीत जसे अभिनय, गायन, सिंगिंग, डान्स, खेळाडू किंवा वैयक्तिक कला यातून आलेले उत्पन्न हिंदू अविभक्त कुटुंबात घेतले जाऊ शकत नाही. कारण ते कुटुंबातील सदस्याच्या वैयक्तिक कले मधून आलेले असते.

हिंदू अविभक्त कुटुंब (HUF) तयार करण्याचे कर फायदे काय आहेत?

प्राप्तिकर लाभ: क्ष्ग्ऋ ही सभासदांची एक वेगळी कायदेशीर संस्था असल्याने आणि स्वतंत्र पॅन धारण करत असल्याने, ते उत्पन्न मिळवू शकते, स्वतःचा व्यवसाय चालवू शकते आणि शेअर्स, मालमत्ता इत्यादींमध्ये गुंतवणूक करू शकते. यासोबतच, ते याचा लाभ घेऊ शकते. मूळ सूट मर्यादा २.५ लाख.

निवासी घर : हिंदू अविभक्त कुटुंबाच्या नावाने निवासी मालमत्ता घेऊ शकता.

लाइफ इन्शुरन्स: ज्याप्रमाणे व्यक्ती विशिष्ट योजनांमधील गुंतवणुकीवर आणि जीवन विमा प्रीमियम्सवर ८०C अंतर्गत रु. १,५०,००० च्या कपातीचा लाभ घेऊ शकतात, त्याचप्रमाणे HUF देखील कलम ८०C अंतर्गत रु. १,५०,००० चा लाभ घेऊ शकतात.

गुंतवणूक: एक क्ष्ग्ऋ एङ्डड सारख्या कर-बचत योजनांमध्ये देखील गुंतवणूक करू शकतो आणि कलम ८०C अंतर्गत रु. १,५०,००० पर्यंत कर लाभ मिळवू शकतो. आयकर कायद्याच्या कलम ८० सी अंतर्गत कर लाभ मिळवण्यासाठी एचयूएफला कर-बचत मुदत ठेवी आणि इक्विटी-लिंक्ड बचत योजना मध्ये गुंतवणूक करण्याची परवानगी आहे. जरी एचयूएफ स्वतःच्या नावाने सार्वजनिक भविष्य निर्वाह निधी (पीपीएफ) खाते उघडू शकत नसला तरी, तो हिंदू अविभक्त कुटुंबाद्वारे त्याच्या सदस्यांच्या संबंधित पीपीएफ खात्यांमध्ये जमा केलेल्या रकमेवर कर कपातीचा दावा करू शकतो.

आरोग्य विमा: कलम ८०ऊ अंतर्गत तुमच्या कुटुंबासाठी भरलेल्या आरोग्य विमा प्रीमियमवर तुम्हाला वार्षिक रु. २५,००० ची वजावट मिळते. तथापि, वाढत्या प्रीमियममुळे ही वजावट अपुरी वाटू शकते. एक क्ष्ग्ऋ रु. २५,००० च्या अतिरिक्त कपातीचा दावा करू शकतो, ज्यामुळे एकूण आरोग्य विमा प्रीमियम वजावट रु. ५०,००० होईल.

सरकारी नोकरी करणाऱ्या व्यक्तींना व्यापार व्यवसाय करण्यास ज्यावेळेस काही कायदेशीर बंधने असतात त्यावेळेस हिंदू अविभक्त कुटुंब स्थापित करून त्यामध्ये व्यवसाय सुरू करता येतो. कायदेशीर रित्या टॅक्स नियोजन करून कुटुंबातील व्यक्तींचा कर वाचवता येतो.


**हिंदू अविभक्त कुटुंबाच्या माध्यमातून कायदेशीर मार्गाने कर बचती चे नियोजन :-**

हिंदू अविभक्त कुटुंबाच्या माध्यमातून आपण आपला आयकर वाचवू शकतो जसे की आपल्याला वारस हक्काने मिळणारी स्थावर मालमत्ता किंवा वारस हक्काने मिळणारी गुंतवणूक ही आपण कुटुंबातील सदस्यांच्या वैयक्तिक खात्यात न घेता किंवा कुटुंबातील सदस्यांच्या नावाने न करता तिला आपण हिंदू अविभक्त कुटुंबाच्या नावाने घेतली तर त्या मालमत्ता आणि गुंतवणुकीतून येणारे उत्पन्न हे हिंदू अविभक्त कुटुंबाच्या उत्पन्नात गणले जाईल. आणि त्यावर अडीच लाखाची आयकर कायद्याची मूलभूत सूट मिळू शकेल. त्याचा कोणताही कर कुटुंबातील सदस्याला वैयक्तिक भरावा लागणार नाही.

हिंदू अविभक्त कुटुंबाच्या नावाने जर गुंतवणूक असेल आणि त्याच्यातून उत्पन्न येत असेल तर हिंदू अविभक्त कुटुंबाच्या नावाने देखील आयकर विवरणपत्र भरणे आवश्यक असते.



# साप्ताहिक भविष्य



हर्षल धर्माधिकारी, नाशिक मो.९२२६९११९८२७ दि.१४ ते २० एप्रिल २०२४

**मेष राशी**- आयुष्यातील उच्च दर्जाची महानता अनुभवण्यासाठी तुमचे आयुष्य उदात्त बनवा. चिंता करणे विसरून जाणे हे त्यादृष्टीने टाकलेले पहिले पाऊल असेल. पैश्याची किंमत तुम्ही चांगल्या प्रकारे जाणतात म्हणून तुमच्या द्वारे वाचवलेले धन तुमच्या खूप कामी येऊ शकते आणि तुम्ही कुठल्या मोठ्या अडचणींमधून निघू शकतात. तुम्हाला मदतीचा हात देण्यास तुमचे नातेवाईक तयारी दर्शवतील. तुमच्या आयुष्यावर प्रेमाचा वर्षाव होणार आहे. आजुबाजूला काय घडत आहे याची जाणीव ठेवा. कामाच्या ठिकाणी तुम्हाला प्रत्येकाचे प्रेम आणि सहकार्य लाभेल. ज्या नात्याला तुम्ही महत्व देतात त्यांना वेळ देणे ही तुम्हाला शिकावे लागेल अथवा नाते तुटू शकतात. तुमचा/तुमची जोडीदार तुम्हाला आश्चर्याचा सुखद धक्का देणार आहे.

**वृषभ राशी**- अन्य लोकांच्या यशाबद्दल त्यांचे कौतुक करीत तुम्ही तो आनंद साजरा कराल. जर तुम्ही कुणाकडून आपली उधारी मागत असाल आणि तो काही कारणास्तव तुमच्या गोष्टीला टाळत असेल तर, तो न बोलता तुम्हाला पैसे परत करेल. तुमचा फुरसतीचा वेळ हा निस्वार्थी कामासाठी द्या. त्यामुळे आपल्या आणि कुटुंबियांच्या आनंदात मोलाची भर पडेल. तुमची प्रिय व्यक्ती वैतागल्यामुळे - तुमच्या मनावर दबाव येईल. तुम्हाला व्यक्त होण्यासाठीचा चांगला काळ आहे. क्रिएटीव्ह स्वरूपाच्या प्रकल्पावर काम करा. कुणाला माहिती नसतांना तुमच्या घरात कुणी दूरच्या नातेवाइकांचे आगमन होऊ शकते ज्यामुळे तुमचा वेळ खराब होऊ शकतो. तुमचा/तुमची जोडीदार तुमची गरज भागवू शकणार नाही, त्यामुळे तुमची चिडचिड होईल.

**मिथुन राशी**- आरोग्य चांगले राहील. दीर्घकालीन फायद्यासाठी शेअर बाजार आणि म्युच्युअल फंडातील गुंतवणूक फायदेशीर ठरेल. मित्र आणि कुटुंबातील सदस्यांबरोबर तुमचा बराच वेळ व्यतीत होईल. प्रेमाचा आनंद घेता येईल. समाधानकारक परिणामांसाठी सर्व कामचे नीट आयोजन करा. कार्यालयीन कामकाज मार्गी लावताना तुमच्यावर ताण तणावाचे मळभ असेल. तुमचा रिकामा वेळ मोबाइल आणि टीव्ही पाहण्यात खर्च होऊ शकतो. यामुळे तुमच्या जीवनसाथीला खिन्नता होईल कारण, तुम्ही त्यांच्या सोबत बोलण्यात काही ही आवड दाखवणार नाही. तुमचे वैवाहिक आयुष्य सुखी करण्यासाठी तुम्ही जे प्रयत्न करत होतात, त्याचे अपेक्षेपेक्षा चांगले परिणाम दिसून येतील.

**कर्क राशी**- स्वत:मध्ये प्रगती करणारे प्रकल्प हाती घेतलेत तर त्याचा दुहेरी फायदा होईल - तुम्हाला चांगले वाटेल आणि तुम्ही अधिक आत्मविश्वास बाळगू शकाल. आर्थिक आघाडीवरील सुधारणा तुम्हाला गरजेच्या वस्तूंच्या खरेदीसाठी सोयीस्कर ठरतील. घराच्या सुशोभीकरणाऐवजी मुलांच्या गरजांकडेदेखील लक्ष देणे महत्त्वाचे आहे. शिस्तबद्ध पण मुलं नसलेलं घर निर्जीव ठरते. मुलं घराचं औदार्य आणि आनंद देणारी असतात. तुमच्या आयुष्यापेक्षाही तुम्ही ज्या व्यक्तीवर अधिक प्रेम करता ती व्यक्ती भेटेल. तुमचा सहकार्याचा दृष्टिकोन आणि विश्लेषण कौशल्य यामुळे तुम्ही लक्ष वेधून घ्याल. तुम्ही रिकाम्या वेळेत आपल्या आवडीचे काम करणे पसंत कराल. तुम्ही असेच काही काम करण्याचा विचार कराल परंतु, कुठल्या व्यक्तीचे घरात येण्याने तुमचा हा प्लॅन विस्कळीत होऊ शकतो. तुमचा जोडीदार रिवाइंडचं बटण दाबणार आहे आणि तुमचं सुरुवातीच्या दिवसातलं प्रेम आणि रोमान्स जागा होणार

**सिंह राशी**- कामामध्ये मर्यादेपलिकडे स्वत:ला खेचू नका, योग्य ती विश्रांती घेण्याची आठवण ठेवा. जर प्रवास करत असाल तर आपल्या महत्वाच्या वस्तूंची काळजी घ्या. जर तुम्ही दुर्लक्ष केले तर सामान चोरी होण्याची शक्यता आहे. जुने मित्र आधार देतील आणि मदत करतील. तुमच्या प्रियकर/प्रेयसीने केलेल्या शेरेबाजीवर तुम्ही खूप संवेदनशील बनाल - तुमच्या भावनांवर नियंत्रण ठेवा आणि परिस्थिती अधिक बिघडतील असे कृत्य करणे टाळा. तुमच्याकडे तग धरून राहण्याची क्षमता असेल आणि तुमची पैसे कमावण्याची ताकद किती आहे याचीही माहिती तुम्हाला मिळेल. कुठल्या ही स्थितीमध्ये तुम्हाला आपल्या वेळेची काळजी घेतली पाहिजे लक्षात ठेवा जर वेळेची कदर केली नाही तर, यामुळे नुकसान होईल. तुमच्या जोडीदारामुळे तुम्हाला नुकसान सहन करावे लागेल.

**कन्या राशी**- अन्य लोकांच्या यशाबद्दल त्यांचे कौतुक करीत तुम्ही तो आनंद साजरा कराल. दीर्घकालीन दृष्टीकोन डोळ्यासमोर ठेवून गुंतवणूक करणे गरजेचे आहे. दूरवर राहणा-या नातेवाईकांकडून अनपेक्षितपणे गोड बातमी मिळाल्याने संपूर्ण कुटुंबासाठी आनंदाचा दिवस ठरेल. प्रेमातील असीम आनंद अनुभवण्यासाठी कोणाचा तरी शोध घ्या. तुम्ही एखादे अवघड काम पूर्ण केल्यामुळे सर्व मित्र तुमची स्तुती करतील. या राशीतील वृद्ध जातक आपल्या जुन्या मित्रांशी रिकाम्या वेळात भेटायला जाऊ शकतात. एका मिठीचे आरोग्यावर होणारे चांगले परिणाम तुम्हाला माहीतच असतील. तुमच्या जोडीदार तुम्हाला या परिणामांची अनुभूती अनेकदा देणार आहे.

**तुळ राशी**- तुमच्यातील उच्च आत्मविश्वास चांगल्या कामासाठी वापरा. धावपळीचा सप्ताह असला तरी तुमची ऊर्जा टिकून राहील. तुम्हाला आपल्या संतानमुळे आर्थिक लाभ होण्याची शक्यता दिसत आहे यामुळे तुम्हाला बराच आनंद होईल. तुमच्या ज्ञानलालसेपोटी नवीन मित्र जोडाल. लवमेट तुमच्या कडून कुठल्या गोष्टीची डिमांड करू शकतो परंतु, तुम्ही त्याला पूर्ण करू शकणार नाही ज्यामुळे तुमचा लवमेट तुमच्याशी नाराज होऊ शकतो. तुमचा बॉस तुमच्याशी नेहमी उद्धटपणे का वागतो या मागचे सत्य तुम्हाला कळेल. त्यामुळे निश्चितच तुम्हाला बरे वाटेल. टीव्ही, मोबाइलचा वापर चुकीचा नाही परंतु, आवश्यकतेपेक्षा अधिक याचा उपयोग करणे तुमच्या गरजेचा वेळ खराब करू शकते. तुमचा/तुमची जोडीदार तुम्हाला त्याची/तिची सुस्वभावी बाजू दाखवेल.

**वृश्चिक राशी**- सप्ताहाची सुरवात तुम्ही योग साधनेने करू शकतात. असे करणे तुमच्यासाठी फायदेशीर असेल आणि पूर्ण तुमच्यात ऊर्जा राहील. दुस-यांच्या शब्दावर विसंबून तुम्ही गुंतवणूक केलीत तर आर्थिक तोटा होण्याची शक्यता आहे. तुम्ही वेळीच योग्य ती मदत केल्याने एखाद्याचे नशिबाचे भोग टळतील. प्रेमाचा प्रवास मधुर पण क्षणकाल टिकणारा असेल. कामातील प्रगतीमुळे जुजबी तणाव संभवतो. घरातील लोकांसोबत बोलणी करते वेळी तुमच्या तोंडातून काही शब्द निघू शकतात ज्यामुळे घरातील लोक नाराज होऊ शकतात. यानंतर कुटुंबियातील लोकांना मनवण्यात तुमचा बराच वेळ खर्च होऊ शकतो. तिऱ्हाईत व्यक्ती तुमच्यात आणि तुमच्या जोडीदारामध्ये भांडण लावून द्यायचा प्रयत्न करेल, पण तुम्ही दोघेही सांभाळून घ्याल.


**धनु राशी**- अवघडेलपण, असुविधा तुम्हाला मानसिक त्रास देऊ शकतात, पण मित्रांच्या भरपूर मदतीमुळे तुमच्या अडचणी दूर होतील. तणाव दूर घालविण्यासाठी एखादे छानसे संगीत ऐका. घराच्या दृष्टीने केलेली गुंतवणूक फायदेशीर ठरेल. आपल्या घरातील वातावरण बदलण्यापूर्वी तुम्हाला सर्वांचा होकार असल्याची खात्री करा. आपल्यावर प्रेम करणा-या व्यक्तीच्या निष्ठेवर शंका घेऊ नका. संधी येण्याची, काहीतरी घडण्याची वाट पाहत बसू नका, त्याऐवजी स्वत:हून नव्या संधींचा शोध घ्या. प्रवास आणि शैक्षणिक सहली यामुळे जागरूकतेत वाढ होईल. तुमचा जोडीदार किती रोमँटिक होऊ शकतो, हे तुम्हाला पाहायला मिळेल.

**मकर राशी**- जुन्या मित्रांबरोबरील भेटीगाठी तुमचा उत्साह द्विगुणित करतील. तुम्ही मादक पदार्थांचे सेवन करू नका. नशेमध्ये तुम्ही काही किमती वस्तू हरवू शकतात. कंटाळवाण्या आणि धीम्या अशा दिवशी मित्र आणि जीवनसाथी तुम्हाला आराम आणि आनंद मिळवून देतील. आपल्या प्रियजनांबरोबर वेळ जाता जाणार नाही. कला व नाट्य क्षेत्रांशी संबंधित व्यक्तींना नवीन संधी मिळतील आणि त्यांना त्यांची कलात्मकता उत्कृष्टपणे दाखविता येईल. ज्या नात्याला तुम्ही महत्व देतात त्यांना वेळ देणे ही तुम्हाला शिकावे लागेल अथवा नाते तुटू शकतात. तुम्हाला तुमच्या जोडीदारासमवेत शृंगार करायला भरपूर वेळ मिळेल, पण प्रकृतीवर परिणाम होण्याची शक्यता आहे.

**कुंभ राशी**- वाद, संघर्ष टाळा, अन्यथा तुमच्या आजारात भर पडेल. पैश्याची किंमत तुम्ही चांगल्या प्रकारे जाणतात म्हणून तुमच्या द्वारे वाचवलेले धन तुमच्या खूप कामी येऊ शकते आणि तुम्ही कुठल्या मोठ्या अडचणींमधून निघू शकतात. मुलांना त्यांचा गृहपाठ पूर्ण करण्यासाठी मदत करा. त्यासाठी वेळ काढा. तुमच्या तीव्र भावनांना आवर घाला, नाहीतर तुमचे प्रेम प्रकरण धोक्यात येऊ शकते. भागीदारीतील प्रकल्पातून सकारात्मक फळ मिळण्यापेक्षा अनेक प्रश्न निर्माण होतील. दुस-यांना आपल्या स्वभावाचा फायदा घेऊ दिल्याबद्दल तुम्ही स्वत:वर विशेष रागावलेले असाल. आपल्या कामापासून आराम घेऊन तुम्ही काही वेळ आपल्या जीवनसाथी सोबत ही व्यतीत करू शकतात. जर तुम्ही कुणालातरी भेटण्याची योजना तुमच्या जोडीदाराच्या प्रकृती अस्वास्थ्यामुळे बारगळली तरी तुम्ही एकमेकांसोबत चांगला काळ घालवाल.

**मीन राशी**- वजयोत्सव साजरा केल्याने तुम्हाला अतीव आनंद मिळेल. मित्रमंडळींसमवेत हा आनंद साजरा करा. मोठ्या समुदायाशी संलग्न होण्यामुळे तुम्हाला आनंद, मनोरंजन लाभेल, पण तुमचा खर्च वाढता असेल. तुमच्या ज्ञानलालसेपोटी नवीन मित्र जोडाल. रोमान्ससाठी अत्यंत उत्तेजनापूर्ण दिवस आहे. काही तरी खास योजना आखा, अन्य देशांतील लोकांशी व्यावसायिक संपर्क प्रस्थापित करण्यासाठी सध्याचा काळ अतिशय योग्य आहे. जे लोक बऱ्याच दिवसापासून खूप व्यस्त होते त्यांना स्वत:साठी वेळ मिळू शकतो. तुमचा/तुमची जोडीदार तुमची प्रशंसा करेल आणि पुन्हा एकदा तुमच्या प्रेमात पडेल.

# अंधार कोठडीची शिक्षा



विनोबांना इंग्रजानी अंधाऱ्या कोठडीची शिक्षा दिली ,ज्यात अगदी छोट्या खोलीत फक्त एकवेळ पहारेकरी जेवण घेऊन येई आणि जिथे प्रकाशही नसेल .ते खचतील त्यांची प्रकृती खालावेल,ते निराश होऊन माफी मागतील ही सरकारची अपेक्षा होती पण आठवडे,दिवस जसे जायला लागले तसे विनोबा अजून तजेलदार, सशक्त दिसू लागले तो जेलरही अचंबित झाला.

विनोबांनी २४ तासांचं नियोजन केलं, रोज ते जितके मैल चालत होते, त्या खोलीची लांबी मोजून साधारण रोजचं अंतर चालायला किती पावलं चालावं लागेल हे अंतर काढून तेवढे तास ते त्या खोलीत चालत,,याशिवाय ध्यानधारणेचा वेळ त्यांनी वाढवला ,याशिवाय जो पहारेकरी त्यांना जेवण घेऊन यायचा त्याच्या आयुष्यात काही दुःख आहे का हे विचारून त्याला योग्य सल्ले दिल्यामुळे त्या जेल मधले इतर पहारेकरी आपापली गाऱ्हाणी घेऊन विनोबांकडे येऊ लागले ,त्यामुळे संध्याकाळचा वेळ सगळा लोकसमस्या निवारणात जाऊ लागला. जे काही कच्च भरड अन्न मिळायचं तेही विनोबा =ऋ समाधानाने चावून खायचे ,व्यायाम तर होताच रोजचा .झोपही शांत लागत होती.

जेलर (इंग्रज) हे बघून थक्क झाला की सायंकाळी इतकी लोकं त्यांच्याकडे येत आहेत, आणि एकदा तो स्वतः बोलायला गेला आणि त्याने विनोबांना ही सभा रोज घेण्यासाठी जेलमध्ये स्वतंत्र वेगळी जागा दिली . यापुढे जाऊन =ऋाचनासाठी काही पुस्तकं मागावून घेतली, पुढे तर जेल मध्ये गीतेच्या प्रवचनांचे कैद्यांसाठी वर्ग सुरू झाले.. सगळं किती थक्क करणारं आहे !!!

मुद्दाम आज आठवलं, आपल्याला तर अंधारी कोठडी नाही घरात रहायचंय, आपल्याबरोबर आपले नातलग आहेत ,मनोरंजनासाठी असंख्य गोष्टी आहेत. पर्याय कित्येक आहेत सकारात्मकतेने विचार करणार मन हवं आहे फक्त ,नाही का?

**-साभार गोष्टी विनोबांच्या**
कथाविश्व तुमचे माझे आपले
आवडते कथपान..

# ऋतुराज वसंत



मंगला राजपूत, मो.८२७५२५४६ ३५

**आला आला वसंत ऋतू आला**
**वसुंधरेला हसवायला**
**सजवित नटवित लावण्याला**
**आला वसंत ऋतू आला**

निसर्गातील झाडे वेली शिशिर ऋतू मध्ये आपली जीर्ण पाने टाकून देऊन चैत्र महिना सुरू होताच त्यांना नवीन पालवी फुटते जणू त्यांनाही वसंत ऋतू मध्ये नवीन वस्त्र परिधान करायचे असतात. पिंपळाची पोपटी लुसलुशीत कोवळी पालवी मन मोहून टाकतात. कडूलिंबालाही सुरुवातीला कोवळी हिरवी पाने येतात नंतर संपूर्ण झाड हिरव्यागार पानांनी बहरून जाते . आंब्यालाही छान कोवळी पालवी फुटते अगदी बोडके झालेल्या सर्वच झाडे व वेलींना पालवी फुटते जणू वसंताच्या आगमनाने ते मोहरून जातात. तसेच आंबा व कडू लिंबाला छान मोहरही येतो त्यानंतर कडुलिंबाला लिंबोळ्या व आंब्याला कैऱ्या लागतात तर गुलमोहरही आपल्या केसरी फुलांनी डवरून जातो, चाफा, मोगरा, मधुमालती यांना खूप फुले येतात, मधुमालतीची तर हिरवी पाने आणि त्यावर लाल फुलांचे हिरवे घोष फार सुंदर दिसतात. काटेसावर, पांगारा यांनाही छान फुले येतात बाभळीलाही सुंदर पिवळे फुले येतात त्यामुळे अगदी भर उन्हाळ्यातही बघून खूप आनंददायी वाटते तसेच पळसालाही लाल भडक फुले येतात त्यामुळे जंगलात छान वाटते व म्हणून पळसाला फ्लेम ऑफ फॉरेस्ट म्हणतात. बहावाला तर सुंदर अशा पिवळ्या फुलांचे घोष येतात व ते खाली जणू झुंबरं प्रमाणे लटकल्यासारखी दिसतात त्यावर इंदिरा संतांनी एक छान कविता केलेली आहे. तप्त भवताल विसरून जावं, स्वतः गारवा होऊन जगावं ,अगदी बहाव्यासारखं, हसून फुलावं, फुलून हसावं ,अगदी बहाव्यासारखं,बेभान बहरून यावं, हासर डोलत रहावं, अगदी बहाव्यासारखं, मोहक होऊन जगावं अगदी बहाव्यासारखं. खरंच छान बोधप्रद आहे कविता.

**चारो ओर हरियाली है**
**सरसो के फूल लगे लहराने**
**वसुधा लगी मुस्कुराने**
**दुल्हन सी सजी धरती**
**सबका मन हर्षाया है**
**देखो वसंत आया है**

सर्व झाडे, वेली हिरव्यागार पानांनी व वेगवेगळ्या फुलांच्या रंगांनी नवरी सारखी सजलेली वाटतात त्यामुळे सगळीकडे हिरवंगार वातावरण छान वाटतं .फुलांमुळे वातावरण सुगंधित व चैतन्यमय वाटतं. इतक्या कडक उन्हाळ्यातही झाडांना पालवी फुटणं एक जादुई किंवा चमत्कार वाटतो व इतकं सुंदर, मनमोहक वातावरण होऊन गेल्यामुळे वसंताला *ऋतुराज* म्हणतात. कारण तो सर्जनशील आहे.

**कितनी खूबसूरत ये तस्वीर है**
**ये कश्मीर है ये कश्मीर है**

काश्मीरमध्ये तर वसंत ऋतूमध्ये वेगवेगळ्या प्रकारची, रंगाची ट्यूलिपची फुले खूपच फुलून येतात त्यामुळे तिथे जणू रंगोत्सव, पुष्पोत्सव आहे की काय असे वाटते त्यामुळे तेथील दृश्य फारच मनमोहक, सुंदर, आकर्षक दिसते म्हणून काश्मीरला नंदनवन असे म्हटले जाते . वसंत ऋतुला कुसुमाकर असेही म्हटले जाते आणि तेथे सिनेमाचे शूटिंगही होते. ही सर्व वसंत ऋतूची किमया.

झाडांना दाट पाने आल्यामुळे राघू मैना, बुलबुल, चिमण्या, कोकीळ इत्यादी पक्षीही झाडांवर घिरट्या घालतात, किलबिल करतात तसेच फुलांवरही भुंगे येतात, कोकीळ पक्षाचे कुहू कुहू बोल तर फारच मधुर वाटतात त्यामुळे वातावरण खूप प्रसन्न- अल्हाददायक वाटते.

**हृदयी वसंत फुलताना प्रेमात रंग यावे*
**प्रेमात रंग भरताना दुनियेस का लढावे*

म्हणजेच एकमेकांना रंग लावून, वेगवेगळ्या रंगांमध्ये बुडून लोकं आनंद व्यक्त करतात. गुलाबी रंग प्रेमाचा, लाल रंग क्रांतीचा ,पिवळा रंग शितलतेचा, हिरवा रंग समृद्धीचा, निळा रंग शांततेचा, पांढरा रंग शुभ्रतेचा पावित्र्याचा.या सर्वच रंगांचा जीवनामध्ये उपयोग होतो आणि हे सर्वच रंग त्या त्या रंगाची महती सांगतात आणि जीवनात सर्वच या रंगांची गरज असते व जीवन रंगीन किंवा चांगले बनते.

गुढीपाडव्यालाही लाकडाच्या काठीला विजयाचा ध्वज मानले जाते तर कडूलिंब हे भक्कम झाड असून लिंबाचा पाला हा कितीही संकटे किंवा समस्या आला तरी भक्कम राहायला सांगतो. काही राज्यांमध्ये वसंत पंचमीला ज्ञानाची देवता सरस्वतीची पूजा करतात. तर रामनवमी म्हणजे चैत्र शुद्ध नवमी ,श्रीरामांचा जन्मदिवस. जीवन हे अतिरंगीन न बनवता

**हृदयी वसंत फुलताना प्रेमात रंग यावे*

वसंत ऋतूत झाडे आनंदाने मोहरून येतात , संपूर्ण सृष्टी चैतन्यमय होऊन जाते त्यामुळे काही तरुण लोकांच्या मनातही प्रेमाची भावना निर्माण होते.

तर काय काही कवींच्या मनातही प्रतिभेला ही धुमारे फुटतात त्यामुळे त्यांनाही वसंत ऋतू मध्ये छान कविता सुचतात.

वसंत ऋतु आणि काही सण यांचा ही अगदी जवळचा संबंध आहे उदाहरणार्थ होळी, गुढीपाडवा, वसंत पंचमी, रामनवमी इ.वसंत ऋतू मध्ये जणू रंगांचा उत्सव सुरू झालेला असतो म्हणून वसंत ऋतुच्या स्वागतासाठी जणू होळी -रंगपंचमी साजरी करतात. निसर्गाने वसंत ऋतू मध्ये जे मुक्त हस्ताने रंग उधळलेले असतात त्या फुलांपासून बनवलेल्या रंगाच्या साह्याने होळीला रंगपंचमी खेळतात श्रीरामांप्रमाणे धार्मिक, मर्यादशील, आदर्शयुक्त व विवेकी किंवा संयमी जीवन जगायला हवे.जीवनात रंगांचा म्हणजेच वाणी आचार, विचार यांच्यात समतोल साधा यला हवा असे वसंत ऋतू जणू सूचित करतो.

मंगेश पाडगावकर म्हणतात की

**सहा ऋतूंचे सहा सोहळे**
**येथे भान हरावे**
**या जन्मावर या जगण्यावर**
**शतदा प्रेम करावे**

खरंच वेगवेगळे ऋतू असल्यामुळेच आपले जीवन हे आनंददायी वाटते. आणि त्या ऋतूंप्रमाणे वेगवेगळे सण उत्सव असल्यामुळे दिवस, महिने, वर्ष कधी संपते कळतही नाही आणि आयुष्यही उत्साही व चैतन्यमय वाटते त्यात वसंत ऋतूचा वाटा मोलाचा किंवा महत्त्वाचा आहे.

# शब्दझुला

## अशी चालविलीस तुम्ही तलवार कलाम!..

अशी चालविलीस तुम्ही तलवार कलाम
वार झेलणारेही आदरानं करिती सलाम!
अलौकीक महायोद्धा अहो, डॉ. भीमराया,
तुमच्या प्रज्ञाशौर्याला कोटी कोटी प्रणाम!।।धृ.।।
तोडल्या युगोयुगींच्या गुलामीच्या शृंखला
शृंखला तोडतांना थेंबही न रक्ताचा सांडला!
त्या शौर्याचा अवघ्या विश्वाला वाटे अभिमान!
डॉ. भीमराया, तुमच्या प्रज्ञाशौर्याला कोटी कोटी प्रणाम!।।१।।
महामानव प्रज्ञासूर्य होऊन आपण असे तळपलां
स्वातंत्र्यसमताबंधुता न्यायकिरणांनी देश प्रकाशला!
तुम्ही लिहिल्या संविधानाचे हे विश्व गाई गुणगान!
डॉ. भीमराया तुमच्या प्रज्ञाशौर्याला कोटी कोटी प्रणाम!।।२।।
स्त्रीया, सर्व जाती, धर्मीयांवर समत्वदृष्टी माया
आभाळाची माया होते डॉ. विश्वरत्न भीमराया!
देखणे राष्ट्रैक्य नांदते! संविधानाने देश स्वर्गसमान!
डॉ. भीमराया तुमच्या प्रज्ञाशौर्याला कोटी कोटी प्रणाम!।।३।।
अशी चालविलीस तुम्ही तलवार कलाम
वार झेलणारेही आदरानं करिती सलाम!
अलौकीक महायोद्धा अहो, डॉ. भीमराया,
तुमच्या प्रज्ञाशौर्याला कोटी कोटी प्रणाम!।।धृ.।।

-गुलाबराव धंजी मोरे,
धुळे, मो. ९४०४१९०४३२



## बाबा तुम्ही याना पुन्हा

बाबा तुम्ही ,
बुद्धीचा झंझावात
बाबा तुम्ही ,
ज्ञानाची प्रभात
बाबा तुम्ही ,
अन्यायावर प्रहार
बाबा तुम्ही ,
बहुजनांचा आधार
बाबा तुम्ही ,
दिली घटना
बाबा तुम्ही ,
कैवारी दीना
बाबा तुम्ही
ममतेचा पान्हा
बाबा तुम्ही
याना पुन्हा

-अरुण राठोड,
शहादा, ९४२२२६२४९५



## मी 'भारतरत्न' बोलतोय...

संविधानाला आपला श्वास मानणाऱ्या
प्रत्येक भारतीयांना 'जय भिम'
मी भारतरत्न बोलतोय....
किती सोसल्या यातना
किती जीवघेणी व्यथा...
सावुलीलाही आमुच्या टाळणारी
आजही आठवते कथा-
'घोटभर' पाण्यासाठी फिरणारे
चेहरा हरवलेले आम्ही...
त्यांना 'चेहरा' मिळवून देण्यासाठी
माझा आयुष्यभर जीवघेणा प्रयत्न...
तेव्हा मी गेल्यावर आपण दिला
मला पुरस्कार, 'भारतरत्न'
मी बुद्ध समजून घेतला...
म्हणून विचारांचे युद्ध
समर्थपणे लढु शकलो.
मला माहिती होते तलवारीपेक्षा
लेखणीचेच सामर्थ्य असते श्रेष्ठ
मी मन, मस्तक, मनगटाच्या
जोरावर ओले केले गळे
त्याची साक्ष आहे.
'महाड' चे चवदार तळे
मी माझ्यातल्या भीमरावामध्ये
जागी केली 'भीमाई'
म्हणून भारतीय संविधानाची
घडली ऐतिहासिक अपूर्वाई....
मी भारतरत्न बोलतोय
'गोलमेज परिषदेत' सारे माझ्यावर
आग ओकु लागले....म्हटलेत...
''तुम्हाला मातृभूमी विषयी
काही अभिमान आहे का?
मी तात्काळ उभा राहिलो, बोललो
व्हेअर इज माय मदर लँड?
जीने मला माझ्या माणसांना
त्यांच्या सावलीला त्यांच्या वस्तीला
नाकारले म्हणून तर माझ्या
माणसांनी, माणुस म्हणून जगण्यासाठी
'बौद्ध धर्म' स्वीकारला...
मी 'भिमाई' माझी सावुली 'रमाई'
आणि माझ्या मायबापांची पुण्याई
म्हणून तर मित्रहो....
माणसा-माणसातले कमी व्हावे अंतर
विचारपूर्वक केले मी 'धर्मांतर'
आता तर हरवलेल्या चेहऱ्यांना
ज्ञानाचा प्रकाश दिला
आज जयंतीच्या माझ्या म्हणूनच
सारा आसमंत 'निळसर' झाला..
सारेच म्हणतात हृदयापासून
जय भीम बोला.... जय भीम बोला....

-जगदीश देवपूरकर,
धुळे, मो.९८२२८५२९८३



# आदर्श विद्यालयाच्या विद्यार्थ्यांचे एनएमएमएस परीक्षेत नेत्रदीपक यश

**साक्री, दि.१३ (प्रतिनिधी)- विद्या विकास मंडळ साक्री संचलीत आदर्श माध्यमिक विद्यालय साक्रीच्या इयत्ता ८ वीच्या एकूण ८४ प्रविष्ठ विद्यार्थ्यांपैकी ९ (नऊ) विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक अर्थात एनएमएमएस या २०२३-२४ च्या स्पर्धा परीक्षेत मेरिट लिस्ट मध्ये स्थान पटकावले आहे, तर ३० विद्यार्थी मसारथी शिष्यवृत्तीफ साठी पात्र ठरले आहेत.**

राजश्री सतीश अहिरराव, कल्याणी प्रभाकर गांगुर्डे, नेहा दिलावरसिंग गिरासे, अनन्या रमेश सोनवणे, वैष्णवी राकेश दहिते, मेहुल मुकेश नांद्रे, दक्ष हरेश सूर्यवंशी, अनन्या भैय्यासाहेब साळवे, कल्याणी नामदेव सुर्यवंशी या विद्यार्थ्यांना ९ वी ते १२ वी या चार वर्षांसाठी प्रति वर्ष रुपये १२००० शिष्यवृत्ती मिळेल, तर सारथी साठी पात्र ९५०० रुपये शिष्यवृत्ती मिळेल. वरील यशस्वी विद्यार्थ्यांचे या यशाबद्दल संस्थेच्या अध्यक्षा मंगलाताई भामरे पाटील, सचिव सुरेश पाटील, उपाध्यक्ष चंद्रजित पाटील, प्राचार्य डी.एन.पाटील, पर्यवेक्षक एन के शिंदे यांनी अभिनंदन केले आहे. या विद्यार्थ्यांना शाळेत मोफत मार्गदर्शन वर्ग घेऊन सराव करून घेणाऱ्या मुख्याध्यापक, पर्यवेक्षक,सर्व शिक्षकांचे पालकांनी अभिनंदन केले आहे.

# इंडियन टॅलेंट ऑलिम्पियाड परीक्षेत आर.सी.पटेल विद्यालयातील तीन विद्यार्थी राज्यस्तरावर यशस्वी

**शिरपूर, दि.१३- शहरातील आर.सी.पटेल माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांना इंडियन टॅलेंट ऑलिम्पियाड परीक्षेत घवघवीत यश प्राप्त झाले. विद्यालयातील एकूण आठ विद्यार्थ्यांनी विशेष गुण प्राप्त करुन निवड झाली आहे. विद्यालयातील अनेक विद्यार्थी दरवर्षी इंडियन टॅलेंट ऑलिम्पियाड या परीक्षेस मोठ्या संख्येने सहभागी होतात. या वर्षीही एकूण सहभागी विद्यार्थ्यांपैकी काही पहिल्या, दुसऱ्या फेरीसाठी निवडीस पात्र ठरले आहेत. तर काही राज्य पातळीवर पात्र ठरले आहेत.**

राज्य पातळीवर पात्र विद्यार्थ्यांमध्ये एकूण तीन विद्यार्थ्यांचा समावेश आहे. त्यात कुलदीप प्रभाकर पाटील, लक्षवेधी सुधाकर माळी, हर्षदीप विलास भामरे या विद्यार्थ्यांचा समावेश आहे. त्यांना इंडियन टॅलेंट ऑलिम्पियाड कडून स्कॉलरशिप, मेडल, प्रमाणपत्र प्राप्त झाले आहे. या यशस्वी विद्यार्थ्यांना विद्यालयातील श्रीमती सी.एस.पाटील, अमोल सोनार, जे.डी.चौधरी, पी.डी. राजपूत यांचे मार्गदर्शन लाभले.



इंडियन टॅलेंट ऑलिम्पियाड संपूर्ण भारतात इयत्ता ते इयत्ता वी च्या विद्यार्थ्यांसाठी मोठ्या प्रमाणावर ऑलिम्पियाड परीक्षा आयोजित करते. यात राष्ट्रीय विज्ञान इंडियन टॅलेंट ऑलिम्पियाड, राष्ट्रीय गणित इंडियन टॅलेंट ऑलिम्पियाड, नॅशनल इंग्लिश इंडियन टॅलेंट ऑलिम्पियाड, नॅशनल नॉलेज इंडियन टॅलेंट ऑलिम्पियाड, राष्ट्रीय संगणक इंडियन टॅलेंट ऑलिम्पियाड, राष्ट्रीय कला इंडियन टॅलेंट ऑलिम्पियाड, राष्ट्रीय निबंध इंडियन टॅलेंट ऑलिम्पियाड, नॅशनल सोशल इंडियन टॅलेंट ऑलिम्पियाड अशा आठ परीक्षांचा समावेश असतो. इंडियन टॅलेंट ऑलिम्पियाड हे असेच एक व्यासपीठ आहे जे विद्यार्थ्यांना आणि त्यांच्या कलागुणांना योग्य मार्ग दाखविण्यास मदत करते. इंडियन टॅलेंट ऑलिम्पियाड ही शैक्षणिक कामगिरी सुधारण्यासाठी विद्यार्थ्यांच्या कलागुणांना ओळखून त्यांचे पालनपोषण करण्याच्या उद्देशाने देशातील आघाडीच्या शिक्षणतज्ञ आणि शास्त्रज्ञांनी मध्ये स्थापन केलेली एक शैक्षणिक संस्था आहे. गेल्या काही वर्षांपासून संस्थेने देशातील तरुण पिढीपर्यंत विज्ञान, गणित, इंग्रजी, सामान्य ज्ञान आणि संगणक या विषयांची योग्य माहिती पोहोचवण्याचा प्रयतक केला आहे. भविष्यातील स्पर्धा परीक्षेची तयारीच्या दृष्टीने हा यशस्वी उपक्रम संपूर्ण भारतात राबविला जात आहे.

या यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थाध्यक्ष माजी मंत्री आमदार अमरिशभाई पटेल, कार्याध्यक्ष भूपेशभाई पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, उद्योगपती चिंतनभाई पटेल, सर्व संचालक, संस्थेचे सीईओ डॉ.उमेश शर्मा, अकॅडमिक इन्चार्ज पी.व्ही.पाटील, मुख्याध्यापक पी.आर.साळुंखे, पर्यवेक्षक एस.डी.गाडीलोहार, समन्वयक बी.बी.अग्रवाल, एस.एस.चौधरी, एस.जे. पाटील, एस.के.पाटील यांनी कौतुक केले.

# एस.आर.बी इंटरनॅशनल स्कूल येथे विद्यार्थ्यांसाठी मोफत उन्हाळी क्रीडा प्रशिक्षण शिबिराचे आयोजन

**धुळे, दि.१३- एस.आर.बी इंटरनॅशनल स्कूल येथे दि.१५ ते ३० एप्रिलपर्यंत भव्य क्रीडा उन्हाळी प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.**

या क्रीडा प्रशिक्षण शिबीरामध्ये विद्यार्थी खेळाडूंनी सहभागी होऊन त्यांच्यातील सुप्त लढाऊ गुणवत्ता, जिद्द, चिकाटी,धाडस,लवचिकता, वेग,दमदारपणा व आत्मविश्वास वाढण्यास नक्कीच या शिबीरातून प्रोत्साहन मिळणार आहे. सदर शिबीर खेळाडूंसाठी मोफत आहे,तरी जास्तीत जास्त खेळांडूनी सहभाग घ्यावा. शिबीरातील क्रीडा प्रकार- व्हॉलीबॉल, कबड्डी, खो-खो, बास्केटबॉल, रिंगटेनिस,योगा, क्रिकेट, बॉक्सिंग, स्केटिंग, फुटबॉल आकर्षण-ट्रेकिंग, क्रीडा प्रदर्शन, चित्रकला, पॅराशुट, मिकी माऊस, स्विमिंग, परेड, विविध सब्जेक्ट ऍक्टिव्हिटी. उपक्रम वयोमर्यादा : वर्षाखालील मुला/मुलींसाठी आहे.

नर्सरी,ज्युनिअरकेजी,सिनियर केजीच्या मुला/मुलींसाठी मनोरंजक खेळांचे विविध उपक्रम आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरात क्रीडा तज्ञ व विषय तज्ञांचे मार्गदर्शन लाभणार आहे. एस.आर.बी इंटरनॅशनल स्कूल येथे उन्हाळी क्रीडा प्रशिक्षण शिबिरामुळे पुढील येणाऱ्या शालेय तालुका जिल्हा, विभाग, राज्य क्रीडा स्पर्धेसाठी नक्कीच विद्यार्थी खेळाडूंचा फायदा होईल. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी कला कौशल्य आणि खेळालाही तेवढेच प्राधान्य दिले पाहिजे. विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकासासोबत त्याची शारीरिक, मानसिक, सामाजिक व कलागुण जोपासण्यासाठी हे सर्व महत्त्वपूर्ण आहे, यासाठी एस.आर.बी इंटरनॅशनल स्कूलचे चेअरमन डॉ.धीरज बाविस्कर, संचालिका मानसी बाविस्कर, प्राचार्य सुभाष पटले यांनी या उन्हाळी क्रीडा शिबिरासाठी जास्त जास्त विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावे असे आव्हान केले आहे. शिबिरासाठी क्रीडाशिक्षक श्री.मयुर बोरसे शिक्षक अथक परिश्रम घेत आहेत.



# सप्तश्रृंगी गडावर जाणाऱ्या भाविकांच्या वाहनांना टोल माफी द्या : अंपळकर

**धुळे, दि.१३- चैत्र नवरात्रीनिमित्त सप्तश्रृंग गडावर दर्शनासाठी जाणाऱ्या वाहनांना टोल माफी द्यावी, अशी मागणी भाजपने केली आहे.**

सप्तश्रृंगी मातेचे दर्शन घेण्यास व नवस फेडण्यास हजारो भक्त पायी व वाहनाने जात असतात. त्यात समाजातील सर्व स्तरातुन भक्तगन आर्थिक मदत देणाऱ्या दात्यांच्या माध्यमातून सप्तश्रृंगी देवीच्या दर्शनास जा-तात. त्यांच्यावर टोलचा भार कमी व्हावा या उद्देशाने भारतीय जनता पार्टी, धुळे महानगराच्या वतीने भाजपा अध्यक्ष गजेंद्र अंपळकर व पदाधिकाऱ्यांच्या स्वाक्षरीने टोल व्यवस्थापनास भाविकांच्या वाहनांना टोल माफी द्यावी अशा आशयाचे निवेदन देण्यात आले. निवेदन देतांना महानगर सरचिटणीस यशवंत येवलेकर, जिल्हा प्रवक्ते शाम पाटील, भाजयुमो जिल्हाध्यक्ष आकाश परदेशी, युवा मोर्चा सरचिटणीस पंकज धात्रक, जिल्हा उपाध्यक्ष व माजी नगरसेवक विक्रम थोरात (छोटू थोरात), सोशल मिडिया प्रमुख पवन जाजू, इत्यादी पदाधिकारी उपस्थित होते.

# एसव्हीकेएम फार्मसीचे दह्याणे येथे एनएसएस शिबीर

**धुळे, दि.१३- श्री विले पार्ले केळवणी मंडळ मुंबई संचलित धुळे येथील एस.व्ही. के.एम. इन्स्टिटयूट ऑफ फार्मसी तर्फे राष्ट्रीय सेवा योजनेचे (एनएसएस) शिबीर धुळे जिल्ह्यातील दह्याणे येथे आयोजित करण्यात आले होते. या कॅम्पमध्ये तृतीय वर्ष व चतुर्थ वर्ष बी. फार्मसीचे एकूण ५० विद्यार्थी सहभागी झाले होते.**

नॉट मी बट यू असे बीद्रवाक्य असलेल्या एनएसएसच्या माध्यमातून चिरस्थायी ग्रामीण विकासफ ही या शिबिराची संकल्पना होती. या शिबिरात विद्यार्थ्यांमार्फत दह्याणे येथे जाऊन विविध प्रकारचे उपक्रम राबवण्यात आले. ज्यात सामाजिक समस्या, ग्रामस्वच्छता मोहीम, निसर्ग संवर्धन, शाळाबाह्य मुलांना शिक्षण प्रवाहात आणण्यासाठी समुपदेशन, योगासन सत्र, महिला सक्षमीकरण, ऐतिहासिक वास्तू स्वच्छता मोहीम, नदी स्वच्छता मोहीम, दंत तपासणी शिबिर, दंत तपासणी शिबिर, पुस्तक दान मोहीम, मतदार जागृती कार्यक्रम, वृद्धाश्रमातील श्रमसंस्कार, आयुष्मान भारत व अटल पेन्शन योजना या सारख्या विषयांवर जनजागृती करण्यात आली. सदर शिबीर यशस्वीपणे पार पाडण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. समीर गोयल यांच्या मार्गदर्शनाखाली समन्वयक प्रा.डॉ.भूषण द्रव्येकर, प्रा. महेंद्र खैरनार, क्रीडा समन्वयक गुंजन सानप यांनी संयोजन केले.


## जाहीर नोटीस

तमाम जनतेस, संबंधितांना, वित्तीय संस्था, बँका, पतसंस्थांना आणि सावकारांना सदर जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे धुळे ता. जि. धुळे येथील महानगरपालिका हद्दीतील.

७/१२ उताराप्रमाणे स. नं. ४४२/२ सेकंड पार्ट पैकी प्लॉट नं. १०९ चे एकूण क्षेत्र ६५ चौ. मी. बखळ प्लॉट.

सि. स. उताराप्रमाणे - सि. स . नं. १५७७२ चे एकूण क्षेत्र ६५ चौ. मी. बखळ प्लॉट हे १) अन्सारी मोहम्मद अजमल मोहियुद्दिन, २) मोहम्मद इमरान हाशिम हुसैन, ३) शोएब फजलुर्रहेमान अन्सारी सर्व रा. धुळे यांच्या मालकीची व प्रत्यक्ष ताबा उपभोगातील असून चतु:सिमा व मापे मंजूर नकाशा प्रमाणे.

मिळकतीचे मालक वरील १ ते ३ यांनी वर नमूद मिळकत कायमस्वरुपी विक्रीचा आमचे आशिलांन सोबत सौदे करार केलेला असून बयाणा पोटी रक्कम स्विकारलेली आहे.आमचे आशिल हे सदरील मिळकतीचा खरेदीचा व्यवहार लवकरच पूर्ण करणार आहे.

सबब वर नमूद मिळकतीबाबत इतर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हिस्सा, हितसंबंध, टाच, बोजा, वारसा, हक्क, हस्तांतरण व्यवहार, खरेदी, सौदा पावती, कोर्ट कचेरी, बक्षीसपत्र, गहाण, मृत्युपत्र,मुखत्यारपत्र, सरकारी अगर निमसरकारी आरक्षण वगैरे व्यवहार असल्यास त्यांनी जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून ०७ (सात) दिवसांचे आत खालील पत्त्यावर कायदेशीर कागदपत्रांसह लेखी हरकत कळवावी.

येणे प्रमाणे सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे आशिल सदर मिळकत निर्बोज म्हणून खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची तक्रार अगर हरकत सदर मिळकतीवर व आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. परस्पर वर्तमानपत्रात घेतलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही. कळावे.

सदरची जाहीर नोटीस आमचे पक्षकाराने दिलेल्या अधिकारावरुन, माहितीवरुन व सांगणेवरुन आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे. धुळे दि. १३/०४/२०२४

**ॲड.दानिश अहमद अ.रऊफ (शेख)**

पहिला मजला, अन्सार मस्जिद समोर, ८० फुटी रोड, तिरंगा चौक, धुळे

**मो. ९८८१९२९४२४** (नोटीस देणारतर्फे ॲडव्होकेट)




# डॉ.आंबेडकर जयंतीनिमित्त न्याहळोद येथे एकशेवीस महिलांना साड्या वाटप; शोभाताई आखाडेंचा उपक्रम

**धुळे, दि.१३- महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर व क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या संयुक्त जयंती निमित्त न्याहळोद येथे १२० महिलांना साड्या वाटपाचा कार्यक्रम संपन्न झाला. सामाजिक बांधिलकीतून मूळ धुळे जिल्हा मराठी पत्रकार संघाच्या सदस्या तथा सामाजिक कार्यकर्त्या शोभाताई आखाडे व बापू बाविस्कर यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमाचे सर्वच स्तरातून कौतुक होत आहे.**

अध्यक्षस्थानी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव न्या. श्री.संदीप स्वामी हे होते. त्यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून उपस्थितांना सखोल मार्गदर्शन केले. महापुरुषांची जयंती सामाजिक बांधिलकीतून साजरी करण्याचा मानस शोभाताई आखाडे यांनी व्यक्त केला होता. त्याच माध्यमातून त्यांनी न्याहळोद येथील १२० महिलांना साड्यांचे वाटप करून जयंती साजरी केली आहे. यावेळी उपस्थित महिलांनी देखील त्यांच्या या उपक्रमाचे तोंड भरून कौतुक केले आहे. कार्यक्रमाच्या सुरुवातीला महापुरुषांच्या प्रतिमाना पुष्पहार अर्पण करून सुरुवात करण्यात आली.

याप्रसंगी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव संदीप स्वामी, मूळ धुळे जिल्हा मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष यशवंत हरणे, माजी अध्यक्ष हेमंत मदाने, विशाल ठाकूर, शिवसेनेचे सहसंपर्कप्रमुख हिलाल माळी, सामाजिक कार्यकर्ते नाना साळवे, गौतम पगारे, बापू बागुल, ॲड. विशाल साळवे, न्याहळोदच्या सरपंच कविता वाघ, कुवर कढरे, संतोष कढरे, बापू कढरे, कविता माळी, जयवंत माळी, ज्ञानेश्वर रोकडे, राम माळी, सुनिल पुराणिक, राकेश पवार, अल्ताफ खाटीक, हनीफ खाटीक यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ड्राय डे रद्द करण्यास न्यायालयाचा नकार

मुंबई- डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त १४ एप्रिल रोजी ड्राय डे जाहीर करण्याच्या जिल्हाधिकारी यांच्या आदेशाला स्थगिती देण्यास हायकोर्टाने नकार दिला आहे. दारु विक्रेत्यांनी महापुरुषांचा आदर करायला हवा, असे खडे बोलही मुंबई उच्च न्यायालयाने सुनावले आहे. न्यायमूर्ती गिरीश कुलकर्णी व न्यायमूर्ती फिरदोश पुन्नीवाला यांच्या खंडपीठासमोर यावर सुनावणी झाली.

## आपला महाराष्ट्र
### वाचकांना विनम्र सुचना

**आपला महाराष्ट्र वृत्त पत्रातून प्रसिध्द होणाऱ्या विविध जाहीरातीतील मजकुराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबधी आर्थिक व्यवहार करावा जाहीरातीतील आपल्या उत्पन्नाच्या संदर्भात अथवा सेवेच्या संदर्भात जाहीरातदार जे दावे करतात त्याची आपला महाराष्ट्र वृत्तपत्र समुह कोणतीही हमी घेत नाहीत जाहीरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहीरातदारांकडून न झाल्यास होणाऱ्या परिणामास आपला महाराष्ट्र वृत्तपत्र समुहाचे मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक जबाबदार रहाणार नाहीत कृपया वाचकांनी यांची नोंद घ्यावी.**


## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या टायटल जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

मौजे महिंदळे येथील स.नं.७६/२ब पैकी प्लॉट नंबर ३९ चे एकूण क्षेत्र १५० चौ.मी. बखळ प्लॉट यासी चतु:सिमा

पुर्वेस- प्लॉट नं.४१, पश्चिमेच- ६ मी रस्ता, दक्षिणेस- प्लॉट नं.३८, उत्तरेस- प्लॉट नं.४०.

येणेप्रमाणे वर्णन असलेली मिळकतीचा आमचे अशिल यांनी मिळकतीचे मालक प्रियंका विजय सोनार रा.मु.पो.कुसुंबा ता.जि.धुळे यांचेशी कायम खरेदी करणेचा तोंडी सौदा केलेला आहे व बयाणा रक्कम दिलेली आहे.

सबब तमाम लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, सदर मिळकतीत कोणाचेही कोणत्याही स्वरूपाचे जसे सौदा, करार, बक्षीस, अदलाबदल, गहाण, लिज, लिन, लिव्ह ॲण्ड लायसन्स, भाडेपट्टा, वारस हक्क, मुखत्यार, मृत्यूपत्र, वहिवाट, बोजे, ऋणभार, ताबा, आरक्षण, जप्ती, खरेदी-विक्री, न्यायिक व इतर प्रकरणे अथवा इतर कोणत्याही स्वरूपाचे हक्क व अधिकार असतील तर त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ४ (चार) दिवसांच्या आत खालील नमूद पत्त्यावर पुराव्यानिशी लेखी हरकती नोंदवाव्यात. टपाल व फोनवर परस्पर हरकत मान्य होणार नाही. तसेच दिलेल्या मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत आमचे अशिलांनी खरेदी करण्यास कोणाचीही काही एक हरकत नाही, तसेच सदर मिळकत ही निर्बोज व हस्तांतरणीय आहे, असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील याची नोंद घ्यावी.

सदरची जाहीर नोटीस आमचे पक्षकाराने दिलेल्या माहितीवरून व सांगितलेवरून त्यांचे वतीने आमचेमार्फत प्रसिध्दीस दिली असे.

धुळे, दिनांक- १३/०४/२०२४.

**ॲड.रोहित राजकुमार छाबिडया**

ब्लॉक नं.आर/२, रूम नं.१, कुमार नगर, साक्री रोड, धुळे.

**मो.नं.९९२२८२८८८३ ७४९९९९८९५५**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसी द्वारे कळविण्यात येते की,

मौजे चितोड, ता.जि.धुळे येथील सर्व्हे नं. १०/१/१०/२/ब पैकी प्लॉट नं. २८/ब क्षेत्र १२३.७५ चौ.मी. ही मिळकत आमचे अशिल श्री.अंकित अविनाश जोशी, रा.प्लॉट नं.२९, वैभव नगर, गोळीबार टेकडी, धुळे यांचे मालकीची असून त्यांनी दि. ०१/१२/२०२२ रोजी सदर मिळकत खरेदीखत दस्त नोंद क्र. ५१९३/२०२२ अन्वये सदर मिळकत खरेदी केलेली आहे. मात्र सदर मिळकतीचा दि. ०१/१२/२०२२ रोजीचा रजि. खरेदीखताचा दस्त नोंद क्र.५१९३/२०२२ चा मुळ दस्त ठेवलेली फाईल दि. १०/०४/२०२४ रोजी फाशीपूल चौक धुळे येथून गावात जात असतांना सकाळी ११.०० वाजेचे सुमारास सदरचा मुळ दस्त ठेवलेली फाईल फाशीपुल चौकात रस्त्यात पडून सदरचा मुळ दस्ताची फाईल गहाळ झालेली/हरविलेली आहे.

तरी वर नमूद रजि. खरेदीखताचा मुळ दस्त कोणासही आढळून आल्यास खालील पत्यावर आणून देण्यात यावा, ही विनंती. कळावे. करीता जाहीर नोटीस दिली असे.

सदरची नोटीस आमचे अशिलाने दिलेल्या माहिती व अधिकारान्वये आमचे मार्फेत प्रसिध्दीस दिली असे.

**जाहिर नोटीस देणार**

श्री.अंकित अविनाश जोशी

रा.प्लॉट नं. २९, वैभव नगर, गोळीबार टेकडी, धुळे.

मो.नं.७९७२८७६३८३

सदरची नोटीस आमचे अशिलाने दिलेल्या माहिती व अधिकारान्वये आमचे मार्फेत प्रसिध्दीस दिली असे.

धुळे, दिनांक-१२/०४/२०२४.

**ॲड.सुभाष जी.विसपुते**

६-अ, ''यशोदाई'', विशाल इस्टेट, राष्ट्रवादी भवन जवळ, स्टेशनरोड, धुळे.

**मो.नं.९७३०८०३५००**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांना व जनतेस, सर्व वित्तीय संस्था, बँका, पतसंस्था यांना या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे नगांव (बुा), ता.जि.धुळे येथील महानगरपालिका हद्दीतील गट नंबर २९३/१+२ मधील प्लॉट नं.७८ पैकी दक्षिण भागाचे क्षेत्र ७५.०५ चौ.मी. त्यांस चतु:सिमा मंजुर नकाशाप्रमाणे असून सदर प्लॉट हा रूपाली विठ्ठल रोकडे रा.मुंबई यांचे मालकीचा व ताबेउपभोगातील बखळ प्लॉट असून सदर बखळ प्लॉट आमचे अशिल यांनी कायम खरेदीने विकत घेणेचा सौदा केलेला आहे. तरी सदर मिळकतीबाबतीत वरील मिळकत अन्य कोणासही गहाण, दान, खरेदी, विक्री, बक्षिस, अदलाबदल, लिज, कोणत्याही वित्त संस्थेचा बोजा, लिव्ह ॲण्ड लायसेन्स अथवा भाडे तत्वावर तबदील केली असल्यास अथवा कोणत्याही प्रकारचे खाजगी अगर सरकारी कर्ज, बोजा, तारण, वारस, भाऊबंदकी, वहीवाट व कोणत्याही प्रकारचे वाद, दावा वगैरे असल्यास सदर जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आंत खालील पत्यावर लेखी पुराव्यानिशी हरकत नोंदवावी.

अन्यथा वरील मिळकत निर्बोज वादरहित असे समजून आमचे पक्षकार मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील. वरील नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आंत कोणत्याही प्रकारे लेखी हरकत न आल्यास सदर मिळकत खरेदीचा व्यवहार आमचे पक्षकार पूर्ण करतील व ७ दिवसानंतर आलेल्या हरकतीची दखल घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी. कळावे.

सदर नोटीस पक्षकाराने दिलेल्या माहितीवरून व सांगणेवरून आमचे मार्फत प्रसिध्दीस दिली असे.

स्थळ- धुळे,

दिनांक- १३/०४/२०२४.

**ॲड.नेहा नितीन चौधरी**

ऑफिस- २४, नाशिककार शॉपींग सेंटर, स्वास्तिक सिनेमा समोर, राणा प्रताप चौक, धुळे.

**मो.नं.९४२१३८३१७५**

## जाहीर नोटीस

तमाम जनता, सर्व हितसंबंधिय, सर्व पतसंस्था, राष्ट्रीयकृत वित्तीय संस्था व शासकीय व निमशासकीय कार्यालये, खरेदी विक्री नोंदणी कार्यालय, खाजगी अर्थसहाय्य कर्ता, महसूल विभाग तसेच गृहनिर्माण सोसायट्या आदी यांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

आमचे पक्षकार यांनी पंडीत सखाराम बोरसे, विजय सोनु महाले, संजय सोनु महाले, प्रदीप वसंतराव पगारे, रेखा पंडीत बोरसे, संगीता राजेंद्र सैंदाणे यांचे मालकीचे व कब्जे उपभोगातील मौजे देवपूर पोट तुकडी तालुका धुळे जि. धुळे, धुळे महानगर पालिका हद्दीतील नगर भुमापन क्र. ८६०५ पैकी प्लॉट नं. १०० चे क्षेत्र २७०० ची चौ. फु. व त्यावरील लोडबेरींगचे घर त्याची चतु:सिमा मंजूर नकाशाप्रमाणे वर्णनाची प्लॉट हा आमचे पक्षकार यांनी कायमस्वरुपी खरेदी करण्याचे ठरविले.

वर नमूद मिळकतीबाबत कोणाचेही कोणत्याही प्रकारची मालकी हक्क, हिस्सा, हितसंबंध, गहाण, बोजा, टांच, जप्ती, भाडेपट्टा हक्क, अथवा वित्त संस्था बँका पतसंस्था यांचा सदर मिळकतीवर बोजा असल्यास मुळ कागदपत्रासह खालील दिलेल्या पत्त्यावर ७ दिवसांच्या आत आपली लेखी हरकत नोंदवावी.परस्पर जाहीर हरकत घेवू नये, अन्यथा आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही. सदर मिळकतीबाबत कोणाचीही काही हरकत नाही आल्यास सदर मिळकत ही निर्बोज निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल सदर व्यवहार पूर्ण करतील. सदर मुदतीनंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. त्यामुळे होणाऱ्या खर्चास व परिणामास आमचे अशिल जबाबदार राहणार नाही यांची नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस असे.


येणेप्रमाणे जाहीर नोटीस आमचे अशिलाने दिलेल्या माहितीवरुन व सांगितल्यावरुन त्यांचे तर्फे आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे.

धुळे दिनांक : १३/०४/२०२४

**ॲड. भवेश भगवान वाघमारे**

ऑफिस ब्लॉक नं. ४, डिस्ट्रीक्ट स्टेडीयम, गोंदूर रोड, धुळे

मो. नं. ९४२३२४५८७२



# धुळ्यात भव्य दुचाकी रॅलीने महामानवास अभिवादन
## डॉ.आंबेडकरांच्या जयजयकाराने दुमदुमले शहर

**धुळे, दि.१३– भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीच्या एक दिवस आधी रविवारी डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक, डॉ.बाबासाहेब आंबेडकर युवक मंडळ व विजय व्यायामशाळेतर्फे शहरात भव्य बाईक रॅली काढण्यात आली. या रॅलीद्वारे महामानवास अभिवादन करण्यात आले.**

डिजेच्या तालावर व डॉ.बाबासाहेबांचा जयघोष करत निघालेल्या या रॅलीत महिला व तरुणींची संख्या लक्षणीय होती. रॅलीला डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौकापासून सुरवात झाली. प्रारंभी त्रीशरण पंचशिल घेण्यात आले. त्यानंतर छत्रपती शिवाजी महाराज स्मारकमार्गे पाच कंदील, कराचीवाला खुंट, महानगरपालिकेकडून डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यापर्यंत आल्यानंतर रॅलीचा समारोप करण्यात आला. या रॅलीदरम्यान डीजेवरील भीमगीते साऱ्यांची स्फुर्ती चेतवत होते. यावेळी तरुणी व महिलांनी निळे फेटे तर पुरुषांनी निळे गमछे परिधान केले होते. तसेच हातात निळा ध्वज घेवून डॉ.बाबासाहेबांचा जयघोष केला जात होता. रॅलीमध्ये जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष प्रभाकर खंडारे, देविदास जगताप, हर्ष शिंदे, दिलीप खोब्रागडे, आनंद देवरे, योगेश पगारे, मयुर गरुड, नानासाहेब मोरे, रमाकांत खंडारे, अशोक तायडे, अविनाश वाघ, भिमराव निकम, मयुर निकम, अनिकेत थोटे आदींसह परिसरातील युवक, युवती सहभागी संख्येने सहभागी झाले होते.

# प्रकाशा येथे संगीतमय भीम गीतांचा सांस्कृतिक कार्यक्रम



**शहादा, दि.१३ (प्रतिनिधी)– तालुक्यातील प्रकाशा येथे सिद्धार्थ नवयुवक मंडळातर्फे डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समितीच्यावतीने १३३ व्या भीम जयंती उत्सवाच्या पूर्वसंध्येला संगीतमय बुद्ध भीम गीतांचा सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.**

यावेळी उत्सव समितीचे अध्यक्ष सौरभ अहिरे, भावेश अहिरे, अक्षय अहिरे, स्वराज सामुद्रे, भुषण महिरे यांनी तथागत भगवान गौतम बुद्ध व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे प्रतिमा पूजन करून कार्यक्रमाचे उद्घाटन केले. या सांस्कृतिक कार्यक्रमामध्ये अनेक बाल कलाकारांनी भाग घेऊन बुद्ध भीम गीतांचे जल्लोषात सादरीकरण केले. अनेक बालकलाकारांनी बाबासाहेबांच्या जीवनावर आधारित बुद्ध भीम गीतांवर योग्य असे पोशाख परिधान करून नृत्य सादर केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समितीचे सर्व पदाधिकारी तसेच सिद्धार्थ नवयुवक मंडळाचे सर्व कार्यकर्ते यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन व आभार ॲड.तुकाराम चित्ते यांनी मानले.

## अंधारेंविरुद्ध निवडणूक आयोगाकडे तक्रार

मुंबई– उद्धव ठाकरे गटाच्या नेत्या सुषमा अंधारे यांच्या अडचणी चांगल्याच वाढल्या आहेत. राजकीय फायदा उचलण्यासाठी आणि निवडणूक प्रचारादरम्यान त्यांनी लहान मुलाचा वापर केल्याप्रकरणी त्यांच्या विरोधात कारवाई करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाच्या वतीने केंद्रीय निवडणूक आयोगाकडे अंधारे यांच्या विरोधात तक्रार करण्यात आली आहे.

## निधन वार्ता

### शशिप्रभा वाघ



धुळे, दि.१३– नेर ता.धुळे येथील मुळ रहिवाशी व धुळे येथील इंदिरा उद्यान परिसरातील ज्येष्ठ नागरिकशशिप्रभा गुलाबराव वाघ (वय ७३) यांचे आज दि१३ रोजी सकाळी ८ वाजता वृध्दापकाळाने निधन झाले. त्यांची अंत्ययात्रा त्यांच्या आनंद नगर, इंदिरा उद्यान परिसरातील राहत्या घरापासून काढण्यात आली. त्या उद्योजक व सामाजिक कार्यकर्ते भारत वाघ यांच्या मातोश्री होत. त्यांच्या मागे पती, दोन मुले, स्नुषा, एक मुलगी, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

### प्रभावती बडगुजर



धुळे, दि.१३– येथील जुने धुळ्यातील बडगुजर वाड्यामधील रहिवासी प्रभावती लक्ष्मण बडगुजर (वय ८७) यांचे वृध्दापकाळाने बुधवारी (दि.१०) दुपारी दोनला निधन झाले. त्यांनी शिवसेनेच्या पहिल्या नगरसेविका होण्याचा बहुमान मिळविला होता. तसेच त्या प्रजापिता ब्रह्मकुमारी विश्व विद्यालयाच्या साधक होत्या. त्या अभियंता वासुदेव बडगुजर, चंद्रवदन बडगुजर, शाम फोटो स्टुडिओचे श्याम बडगुजर, कलाकार विनोद बडगुजर यांच्या मातोश्री होत.

### उद्धव पाटील



शहादा, दि.१३– तालुक्यातील पाडळदा येथील रहिवासी तथा वीज महावितरण कंपनीचे सेवानिवृत्त कर्मचारी उद्धव श्याम पाटील (८४) ह. मु. शहादा यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात पतनी, दोन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. ते नंदुरबार जिल्हा परिषद पंतप्रधान ग्रामसडक योजना विभागाचे सेवानिवृत्त अभियंता जितेंद्र पाटील व सेवानिवृत्त मुख्याध्यापक राजेंद्र पाटील यांचे वडील होत.

### विजय जोशी



धुळे, दि.१३– आग्रारोडवरील युनायटेड हार्डवेअरचे संचालक व विश्व हिंदु परिषदेचे ज्येष्ठ कार्यकर्ते विजय विष्णू जोशी (वय ८३) यांचे अल्पश: आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. धुळे येथील सुप्रसिद्ध डॉ.अनिल जोशी यांचे ते मोठे बंधू होत.

### देविदास पाटील

शहादा, दि.१३–शहादा तालुक्यातील डोंगरगाव येथील प्रगतिशील शेतकरी देविदास रूपला पाटील (६९) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. ते शिक्षण विस्तार अधिकारी सुभाष रूपला पाटील यांचे बंधू तर शरद भगवान पाटील यांचे काका व नरेंद्र पाटील, जितेंद्र पाटील यांचे वडील होत.

## पान १ वरुन

पान १ वरुन

### काँग्रेस पक्ष सत्तेत आल्यास..

यांनी काही निवडक करोडपती उद्योगपती अदानी यांच्यासाठी सरकार चालवले. मोदीचे सरकार आले तर अदानींचे शेअरचे भाव वाढतात, हे अदानीचे सरकार आहे. सीबीआय, ईडीचा दबाव आणून मुंबईचे विमानतळ अदानींकडे दिले आहे. भारतातील सर्व पोर्ट यांच्या हातात आहेत. त्यांनी सांगितले की, देशातील आज २२ असे लोकांकडे जेवढी संपत्ती आहे. तेवढीच संपत्ती या देशातील ७० टक्के लोकांकडे आहे. मोदी धर्म आणि हिंदू मुस्लीम यांच्यावर चर्चा करतात. जीएसटीच्या रुपाने तुमच्याकडील पैसे जातात. तुम्ही तेवढा कर देता, जेवढे गौतम अदानी देतात, असेही त्यांनी सांगितले.

### डॉ.शेवाळेंचा राजीनामा मंजूर

मतदार संघाचे मतदान २० मे रोजी होणार आहे. काँग्रेस पक्षातर्फे माजी महापौर व मा.मंत्री डॉ.शोभाताई बच्छाव यांच्या उमेदवारीची घोषणा झाली आहे. या मतदार संघातील त्या नाही या मुद्यावरुन काँग्रेसचे तिकिट मागणारे काँग्रेसचे धुळे जिल्हाध्यक्ष शामकांत सनेर व नाशिकचे डॉ.तुषार शेवाळे यांनी राजीनामा दिला आहे. ही मागणी विकोपाला गेल्याने काँग्रेस विधीमंडळ पक्षाचे नेते बाळासाहेब थोरात यांनी नाशिक येथे शुक्रवारी नाराज जिल्हा अध्यक्षांची भेट घेतली. नाशिक येथील एका इंजिनिअरींग कॉलेजमधील या भेटीत पक्षाच्या नेत्यांनी निष्ठावंत कर्यकर्ते म्हणून सबुरीने घ्या. पक्ष भविष्यात आपला विचार करेल असे समजुतीचे शब्द सांगितल्याचे वृत्त आहे. यावर सनेर यांनी आपण विचार करु असे सांगितले अशी माहिती मिळते. मात्र, शाम सनेर यांच्यानुसार उमेदवारीच्या प्रश्नावरुन पक्षश्रेष्ठींना आपली नाराजी आपण परखड शब्दामध्ये सुनावली. कोणालाही उमेदवारी द्या पण मतदार संघातील उमेदवाराला द्या या मुद्यावर त्यांनी ठाम मत व्यक्त केले असे शामकांत सनेर यांनी सांगितले. यावेळी धुळे तालुक्याचे आ.कुणाल पाटील देखील उपस्थित असल्याचे वृत्त आहे. काँग्रेस जिल्हा अध्यक्षपदाचा राजीनामा अद्याप मंजूर करण्यात आला नसल्याचे वृत्त आहे. शाम सनेर यांनी आपण पक्ष सदस्यत्वाचा राजीनामा दिला नसल्याचे स्पष्ट केले आहे.

नाशिक जिल्ह्यातील काँग्रेसचे अध्यक्ष डॉ.तुषार शेवाळे यांचा राजीमाना मंजूर करण्यात आला आहे. नाशिक येथील पक्षश्रेष्ठींच्या इंजिनिअरींग कॉलेजमधील बैठकीत ते उपस्थित नव्हते. त्यांनी देखील पक्ष सदस्यत्वाचा अद्याप राजीनामा दिलेला नाही. त्यांचे जागी प्रभारी अध्यक्ष म्हणून शिरीष कोतवाल यांची नेमणूक करण्यात आली आहे. उमेदवार बदला या मुद्यावर आपण ठाम असल्याचे डॉ. शेवाळे यांनी सांगितले.

### पत्नीचा गळा चिरुन निर्घृण खून

त्यानंतर तो जवळील एका मंदिरात लपून बसला होता. घटनेची माहिती मिळताच प.देवपूर पोलिसांनी मंदिरातून त्याला ताब्यात घेतले. घटनेचे वृत्त कळताच डीवायएसपी एस.ऋषिकेश रेड्डी, पश्चिम देवपूरचे पीआय सुरेश शिरसाठ, एलसीबीचे एपीआय श्रीकांत पारधी व कर्मचाऱ्यांनी धाव घेत मृतदेह शवविच्छेदनासाठी जिल्हा रुग्णालयात हलविला. याप्रकरणी प.देवपूर पोलीस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### असलोद गावाजवळ कारचा अपघात

गेले. अपघात एवढा भीषण होता की त्या आवाजाने असलोद गावातील नागरिक व पोलीस प्रशासन तात्काळ धाव घेत पलटी झालेली गाडी सरळ करून गाडीच्या काचा फोडून तिघांना बाहेर काढले व त्यांना तात्काळ शहादा येथील ग्रामीण रूग्णालय दाखल केले  असता नंदुरबार–धुळे तलाठी पतसंस्थेचे चेअरमन तसेच नंदुरबार जिल्हा तलाठी संघटनाचा माजी पदाधिकारी प्रदीप नथ्थू पाटील शहादा यांना वैद्यकीय अधिकारी डॉ.राजेद्र वळवी यांनी मयत घोषित केले. तर नायब तहसीलदार विजय साळवे व तळोदा तहसील येथील मंडळ अधिकारी शिरीष परदेशी हे जखमी झाले आहेत. रात्री घटनेची माहिती कळताच उपविभागीय अधिकारी सुभाष दळवी, तहसिलदार दीपक गिरासे व महसुल विभागाचे कर्मचारीऱ्यांनी दवाखान्यात गर्दी केली होती. दरम्यान मयत नायब तहसीलदार प्रदीप पाटील यांच्यावर शोकाकुल वातावरणात अंतिम संस्कार करण्यात आले.

### कर्नाटकात पन्नास खोके प्रयोग?

असाही आरोप सिद्धरामय्या यांनी या मुलाखतीमध्ये केला. भाजपाने माझे सरकार पाडण्यासाठी याआधीही प्रयत्न केले. आमच्या आमदारांना  पन्नास कोटींचे आमिष दाखविले गेले. मात्र गतकाळात त्यांना अपयश आले होते, असेही सिद्धरामय्या मुलाखतीत म्हणाले. लोकसभेत जर काँग्रेसचा पराभव झाला तर कर्नाटकमधील सरकार टीकेल का? असा प्रश्न विचारला असता सिद्धरामय्या म्हणाले की, ते शक्य नाही. आमचे आमदार काँग्रेसला सोडून जाणार नाही. एकही आमदार बाहेर जाणार नाही, असे ते म्हणाले.

### पिकअप उलटून युवती ठार

आढळले. जखमींमध्ये साजन पावरा (वय १०), कविता पावरा (वय ६ वर्ष), सायना पावरा (वय १०),  रेखा पावरा (वय ३०), रोशनी पावरा (वय १६),  टिल्या पावरा (वय ७ वर्ष),  रितीक पावरा (वय २४), भाईसिंह पावरा (वय २४),  सपना पावरा (वय १५),  सजनी पावरा (वय दीड वर्ष), पूजा पावरा (वय ३०), साजन पावरा (वय ४ वर्ष), पिंकी पावरा (वय ३५), ईचल्या पावरा, पार्वती पावरा, रेखाबाई पावरा, अश्विन पावरा (वय चार वर्ष), रुमालसिंह पावरा, दिनेश पावरा (सर्व रा.कोलकी)  यांचा समावेश आहे.

### नुकसानीची खा.गावितांकडून पाहणी

शेत पिकांचे झालेले नुकसान पाहताना खासदार डॉ.हिना गावित यांनी मन व्यथित झाल्याचे सांगितले. या भागातील शेतकऱ्यांना अवघ्या काही दिवसाच्या अंतराने दुसऱ्यांदा अवकाळी पावसाचे संकट झेलावे लागत आहे आणि त्यांचे प्रचंड आर्थिक नुकसान झाले आहे. याविषयी शासकीय स्तरावरून मदत मिळवून देण्याचे प्रयतन निश्चितपणे केले जातील असे त्यांनी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आश्वस्त केले. त्याचबरोबर वीज पडून जखमी झालेल्या शेतकऱ्याच्या कुटुंबीयांची भेट घेऊन सांत्वन केले. फेस ता.शहादा येथील आपल्या शेतात काम करीत असताना अनिल ओंकार पाटील या शेतकऱ्यावर वीज पडून गंभीर जखमी झाले आहेत. त्यांच्या घरी जाऊन त्यांच्या वृद्ध आई–वडील यांना भेटून सांत्वन केले तसेच धुळे येथील खाजगी रुग्णालयाचे डॉ.यांच्याशी तब्येतीविषयी चर्चा करून वरिष्ठ पातळीवर संपर्क करण्याच्या सूचना खासदार संसद रतन डॉ.गावित यांनी केल्या.

### धुळे बार असो.ची निवडणूक

दि.२६ एप्रिल सकाळी ८ ते सायंकाळी पाच वाजेपर्ययत, मतमोजणी दि.२७ रोजी सकाळी ८ ते मतमोजणी पूर्ण होईपर्यंत, यानंतर लागलीच निकाल जाहीर होतील. मतदान व मतमोजणी धुळे जिल्हा बार असो.च्या सभा हॉलमध्ये होईल, असे निवडणूक अधिकारी ॲड.आनंद जगताप व ॲड.मनोज देवरे यांनी कळविले आहे.


**अनंत आठवणीचे २२ वर्ष**



कै. गणपतराव भिकाजी येलमामे

अस्तित्व विरले तरी, साथ सदैव आहे
हात हरविले तरी, आशिर्वाद अक्षय आहे.

श्री. भिकनराव भिमाजी लहामगे
सौ. हर्षा भिकनराव लहामगे,वैजापूर
श्री. शरदराव माणिकराव कापकर
सौ.पुनम शरदराव कापकर, अ.नगर.
श्री.सचिन अरुणराव वराडे
सौ. श्वेता सचिनराव वराडे
श्री. कमलेशजी दिपकराव वराडे
सौ.गायत्री कमलेशजी वराडे धुळे.

**बंगला विकणे आहे**

प्लॉट 5000 sq.ft. बांधकाम 3000 स्के.फूट R.C.C. प्लॉट नं.४०, सम्राटनगर, जमनागिरी रोड, धुळे
किंमत : २.२५ cr.
बंगल्यावर अधिकृत परवानगी मोबाईल टॉवर, मासिक भाडे– २०,०००/– २४ तास पाणी, स्वतंत्र विहीर
–: संपर्क :–
9822574117

**उठावणा**



बडे दु:ख के साथ सुचित करते हैं की, बोदवड निवासी राजेंद्र प्रल्हादजी अग्रवाल के पिताश्री धुलिया निवासी गोपाल बसंतीलाल मोदी, गोवर्धन बसंतीलाल मोदी,नितिन श्रीनिवास मोदी के जिजाजी बोदवड निवासी **श्री.प्रल्हादजी मोहनलालजी अग्रवाल** का शुक्रवार दि१२/४/२०२४ को स्वर्गवास होगया है जिणका उठावणा रविवार दि.१४/४/२०२४ को अग्रवाल भुवन ऊसगल्ली, धुलिया मे शाम ४ बजे का रखा है।
–: शोकाकुल :–
गोपाल बसंतीलाल मोदी        नितीन श्रीनिवास मोदी
एवम् समस्त मोदी परिवार, धुलिया
फर्म : श्रीनिवास मुखजी मोदी, नटराज टॉकीज के पास, ८० फुटी रोड, धुलिया. मो.–९४२२७८६७१०

**दुकान भाड्याने देणे आहे**

ग.नं.४, रथ गल्ली, गजानन टी हाऊस समोरील दुकान भाड्याने देणे आहे.
9420439886
8329799386

**दुकाने भाड्याने देणे आहे**

८० फुटी रोड अे.आय. टी. हायस्कूल समोर चौकातील दुकाने भाड्याने देणे आहे.
–: संपर्क :–
9850556357

**पाहिजे**

दुकानात कामासाठी हुशार व अनुभवी माणूस पाहिजे.
मॉर्डन फर्निचर्स
विर सावरकर रोड, देवपूर, धुळे
9403432214

**पाहिजेत**

कन्स्ट्रक्शन कंपनीसाठी अनुभवी स्टाफ पाहिजे.
१) ऑफिस बॉय
२) कार ड्रायव्हर/हायवा ड्रायव्हर
३) सुपरवायझर
४) इंजिनिअर– डिप्लोमा/डिग्री, अनुभवी
५) Tally अकाऊन्टंट
६) JCB व पोकलॅन ऑपरेटर
संपर्क : संजय पाटील मो.9765552556

**प्लॉट विकणे आहे**

महिंदळे शिवारात SRPF कॅम्प जवळ प्लॉट विकणे आहे.
–: संपर्क :–
राकेश अग्रवाल
9588485587
राकेश अग्रवाल
9766611456

**पाहिजेत**

रिटेल मेडीकल दुकानासाठी कामाचा अनुभव असलेले सेल्समन लावणे आहेत. समक्ष भेटा!
भगत मेडीकल स्टोअर्स
पारोळारोड, धुळे

**वेटर पाहिजे**

रात्रपाळीसाठी वेटर लावणे आहे. समक्ष भेटा!
–: संपर्क :–
आदर्श लॉज
जेलरोड, धुळे

**घर विकणे आहे**

मौलवी गंज येथील दुमजली घर विकणे आहे. साईज 11x30
–: संपर्क :–
9850556357

**पाहिजेत**

BAMS / BHMS डॉक्टर्स
MBA मार्केटींग
–: संपर्क :–
7588517991

**विकणे आहे**

Activa-2008 RTO पासिंग व पूर्ण काम केलेली. अपेक्षित किंमत– २७०००/–
–: संपर्क :–
9423390451




**भाड्याने देणे आहे**

ग.नं.४, नगरपट्टी येथील २०० चौ. फु.दुकान भाड्याने देणे आहे.
–: संपर्क :–
9284236171

**पाहिजेत**

दुकान कामासाठी होतकरु मुले अर्जंट पाहिजेत.
–: संपर्क :–
अनमोल पुस्कालय
फुलवाला चौक, धुळे

**पाहिजेत**

रेडीमेड कापड दुकानासाठी हुशार व अनुभवी सेल्समन/हेल्पर पाहिजेत. आकर्षक पगार व इतर सवलती दिली जाईल.
ईश्वर गारमेन्ट्स, धुळे
9423917461

**ऑफिस जागा विकणे आहे**

स्वतंत्र पाण्याची व्यवस्था व w/c (Toilet) वेल व्हेन्टीलेटेड, भरपूर नेचरल लाईट, फुल्ली furnished असे 625 sq.ft. Office सत्यम आर्केड, पहिला मजला, नगरपट्टी, संतोष मेडीकल समोर, सुभाष पुतळ्याजवळ, धुळे येथे ऑफिससाठी, छोटे Hospital साठी विकणे आहे.
संपर्क :–9422705939

**पाहिजेत**

फोनवर ऑर्डर घेण्यासाठी माणूस पाहिजे. वय अंदाजे १८ ते ४०. पार्टटाईम जॉब वाल्यांनी संपर्क करु नये.
सुपर ॲल्यु हाऊस
मनमाड जीन, पारोळारोड, धुळे
7020469216

**पाहिजेत**

नामांकित कपड्यांच्या दुकानासाठी हुशार व अनुभवी सेल्समन/हेल्पर पाहिजेत. आकर्षक पगार व इतर सवलती दिली जाईल.
किलर शोरुम
गल्ली नं.५, धुळे
9421562724
9422289756

**पाहिजेत**

बिलींगसाठी अनुभवी माणूस पाहिजे – १
किचन हेल्पर – २
समक्ष भेटावे!
हॉटेल शेरे पंजाब
पाचकंदिल जवळ, आग्रारोड, धुळे

**पाहिजेत**

1) Computer Opretor - 1
२) कुलर फिटींग वायरमन–१
३) सेल्समन/सेल्सगर्ल
४) अकाऊन्टंट
५) हेल्पर, ६) ड्रायव्हर
राजु भावसार फेटेवाले
तळघरात, ग.नं.४, हिंगलाज निवास, धुळे
9422286386



**श्री नेत्रालय हॉस्पिटल नवीन जागेत**

विश्वकर्मा कॉम्प्लेक्स, १ ला मजला, दत्तमंदिर चौक, देवपूर, धुळे
- कॉम्प्युटरच्या सहाय्याने डोळे तपासणी व उपचार
- फेको पद्धतीने व बिनटाक्याच्या पद्धतीने माफक दरात मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात येईल.
- तपासणी वेळ : संध्या. ४ ते रात्री ९ पर्यंत

मो.नं.९५१८३९७५९२ / ८४४६५१७६६३


हे पत्र संपादक, मालक, प्रकाशक, हेमंत सुधाकर मदाने यांनी हेमंत प्रिंटींग प्रेस, वीर सावरकर मार्ग, धुळे येथे मुद्रित करून आपला महाराष्ट्र, जनशक्ती, वीर सावरकर मार्ग, धुळे–४२४००१ येथे प्रकाशित केले. दुरध्वनी मुख्य कार्यालय, धुळे (०२५६२) २३५३९६, २३८३९६, aplamaha@gmail.com नंदुरबार २२३४४४ aplamahashd@gmail.com शहादा–२५६९३९, मालेगाव–२४३१३३६, नाशिक–२५७५९८९, पुणे–४००४११५, आपला महाराष्ट्र–रजि.नं.एम.एच.डी.आय.ए.१७ र.नं.११२२२/६०